सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २७ नोव्हेंबर २०२४। युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक २१ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com




## महत्त्वाचे

### रश्मी शुक्लांची पुन्हा पोलिस महासंचालकपदी नियुक्ती



**मुंबई :** विरोधकांच्या वारंवार मागणीनंतर विधानसभा निवडणुकीदरम्यान राज्याच्या पोलिस महासंचालक पदावरुन निवडणूक कार्यक्रम पूर्ण होईस्तोवर दूर करण्यात आलेल्या आयपीएस रश्मी शुक्ला यांची महासंचालकपदी पुनर्नियुक्ती करण्यात आली. शुक्ला यांनी मंगळवारी पदभार स्वीकारला. निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर केल्यानंतर, अनेक पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. मात्र, रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली नव्हती. त्यांच्या बदलीवरून विरोधक वारंवार आग्रही दिसले होते. त्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी शुक्ला यांना पदावरून दूर करीत, त्यांना निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले होते. निवडणूक आयोगाने सोमवारी आचारसंहिता संपविण्याबाबतची अधिसूचना जारी केली. त्याचवेळी शुक्ला यांचा रजेचा कालावधी संपुष्टात आला. गृहविभागाने हा पदभार विद्यमान पोलिस महासंचालक संजय कुमार वर्मा यांच्याकडून स्वीकारण्याबाबतचे परिपत्रक जारी केले. त्यानंतर शुक्ला यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली आणि पदभार स्वीकारला.

### सिक्कीमच्या शांती राय यांना सुवर्णपदक



**गंगटोक :** सिक्कीमच्या शांती राय यांना गिर्यारोहण क्षेत्रातील योगदानाबद्दल इंडियन माऊंटेनियरिंग फाऊंडेशनतर्फे (आयएमएफ) सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले. २३ नोव्हेंबर रोजी आयएमएफच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत राय यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळवणाऱ्या राय पहिल्या सिक्कीमी आहेत. १९६१ मध्ये स्थापन करण्यात आलेले आयएमएफ सुवर्ण पदक भारतीय नागरिकांना दिले जाते, ज्यात हिमालयीन शेर्पांचा समावेश आहे. निवड समितीने शांती राय यांचा पर्वतारोहण मोहिमांमध्ये सातत्यपूर्ण सहभाग, ८००० मीटर उंचीवरील शिखरांवर यशस्वी चढाई आणि पर्वतारोहण व आयोजित उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा हा गौरव आहे. हा पुरस्कार साहसी लोकांच्या पुढच्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी आणि भारतातील खेळांच्या विकासात योगदान देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो.

### शिक्षक भरती घोटाळा प्रकरणात तृणमूलच्या नेत्याला अटक

**कोलकाता :** शिक्षक भरती घोटाळ्यात सहभाग असल्याच्या आरोपाखाली बंगालमधील माजी मंत्री पार्थ चॅटर्जी यांचा निकटवर्तीय आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्याला सीबीआयने अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. राज्य सरकारच्या प्राथमिक शाळांमधील भरती प्रकरणात सीबीआयने येथील कार्यालयात चौकशी केल्यानंतर सोमवारी सायंकाळी बेहाला येथील तृणमूल काँग्रेसचा नेता संतू गांगुलीला अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्याने सांगितले. घोटाळ्यात त्याचा सहभाग असल्याचे तसेच आर्थिक सौदेबाजीतही तो असल्याचे पुरावे आढळले, असे अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले. सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी बेहाला येथे गांगुलीच्या घरावर केलेल्या छापेमारीत या प्रकरणाशी संबंध असलेले बँकेचे काही दस्तावेज जप्त केले होते. गांगुली हा माजी उद्योग मंत्री पार्थ चॅटर्जीचा निकटवर्तीय आहे. गांगुलीला चौकशीसाठी बोलवण्यात आले होते. मात्र, त्याने सहकार्य केले नाही. तपासाचा भाग म्हणून त्याला कोठडीत घेण्याची गरज होती, असे सीबीआयच्या अधिकाऱ्याने सांगितले.

### अरबस्तानला अमली पदार्थ पुरविण्याचा मार्ग बनला भारत

**नवी दिल्ली :** भारतात अमली पदार्थांच्या तस्करीचा व्यवसाय वाढत आहे. भारतात येणाऱ्या ड्रग्जपैकी ४० टक्के ड्रग्ज स्थानिक बाजारपेठेत वापरली जातात, तर उर्वरित ६० टक्के ड्रग्ज भारतातून अरबस्तान आणि आफ्रिकेत जाते. आयएनसीबी (इंटरनॅशनल नार्कोटिक कंट्रोल ब्युरो) नुसार, भारत हा ड्रग्ज पुरवठ्याचा प्रमुख मार्ग म्हणून उदयास आला आहे. आतापर्यंत युरोप आणि अमेरिका ही सर्वांत मोठी खपाची बाजारपेठ मानली जात होती; परंतु अरब देश उदयोन्मुख बाजारपेठ म्हणून उदयास आले आहेत. भारतातून सुमारे २ लाख कोटी रुपयांच्या ड्रग्जचा पुरवठा होतो. मात्र, भारतात एनसीबी आणि इतर केंद्रीय संस्था सातत्याने कारवाई करीत आहेत. अरब देशांमध्ये सक्रिय असलेले भारतीय आणि पाकिस्तानी गुन्हेगारी सिंडिकेट हे ड्रग्ज तिथे विकतात आणि नंतर आफ्रिकन देशांमध्ये त्यांचा पुरवठा करतात. या व्यवसायातून आफ्रिकेतही नार्को टेरर चालवला जात आहे. राजकीयदृष्ट्या अस्वस्थ असलेल्या अनेक आफ्रिकन देशांमध्ये ड्रगच्या पैशातून सशस्त्र बंडखोरी चालवली जात आहे.

# महाराष्ट्रातील तीन रेल्वे प्रकल्पांना केंद्राची मंजुरी

## अश्विनी वैष्णव यांनी दिली माहिती

**◆ नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्रातील तीन महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती रेल्वे तसेच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिली.

रेलभवनात आयोजित पत्रपरिषदेत वैष्णव म्हणाले की, यातील पहिला प्रकल्प हा मनमाड-जळगाव दरम्यानच्या चौथ्या रेल्वेमार्गाचा आहे. १६० किमी लांबीच्या या रेल्वेमार्गाच्या कामावर २,७७३ कोटी २६ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या मार्गावरील या चौथ्या रेल्वेलाईनमुळे मुंबई-हावडा तसेच मुंबई-प्रयागराज हा रेल्वमार्ग अधिक कार्यक्षम होणार आहे. यामुळे मालवाहतुकीलाही गती मिळणार आहे.

दुसरा प्रकल्प भुसावळ आणि खांडवा दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वेमार्गाचा आहे. या मार्गाची एकूण लांबी १३१ किमी असून, रेल्वेरुळाची लांबी ३२१.८० किमी आहे. या कामावर ३,५१३ कोटी ५६ लाख रुपये खर्च येणार आहे. या प्रकल्पामुळे मुंबई-प्रयागराज मार्ग अधिक कार्यक्षम होणार आहे. यामुळे मालवाहतुकीलाही वेग येणार आहे.

माणिकपूर-इरादतगंज मार्गावर तिसऱ्या रेल्वेमार्गाला मंजुरी देण्यात आली. हा रेल्वेमार्ग मुंबई-प्रयागराज दरम्यानचा महत्त्वपूर्ण भाग आहे. ८४.४० किमी लांबीच्या रेल्वेमार्गावर १,५०७ कोटी ७३ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या नव्या रेल्वे वाहतुकीवरचा ताण कमी होणार आहे तसेच १५.९४ मिलियन टन अधिक मालवाहतुकीलाही प्रोत्साहन मिळणार आहे. या तिसऱ्या मार्गामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी होणार असून, दरवर्षी ३ कोटी लिटर हायस्पीड डिझेलची बचत होणार आहे, असे वैष्णव म्हणाले. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

### प्रवासी, मालवाहतुकीची सांगड घालण्याचा प्रयोग यशस्वी

प्रवासी वाहतूक आणि मालवाहतूक यांची सांगड घालण्याचा पहिला यशस्वी प्रयोग नाशिक-पाटणा दरम्यान करण्यात आला. या दोन शहरांदरम्यान धावणाऱ्या गाडीला दहा डबे प्रवाशांचे तर, दहा डबे मालवाहतुकीचे आहेत. या प्रयोगाला चांगलेच यश मिळाले आहे. असा प्रयोग देशाच्या अन्य भागांतही करून पाहिला जाणार आहे, अशी माहिती वैष्णव यांनी दिली.

# विधानसभा निवडणुकीत महायुतीने मोडले सर्व विक्रम

## ● १३८ उमेदवारांनी मिळवली ५० टक्क्यांहून अधिक मते



**मुंबई, २६ नोव्हेंबर**

राज्य विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीने दमदार विजय मिळवत २३५ जागा जिंकल्या. हा विजय मिळवताना महायुतीने राज्यभरातून ४९.०६ टक्के मते मिळवली आहेत. तर, महाविकास आघाडीच्या वाट्याला अवघ्या ४९ जागा आणि ३५.०३ टक्के मते आली. मतांची टक्केवारी आणि मताधिक्याचे विश्लेषण केल्यानंतर महायुतीने किती मोठा विजय मिळवला, हे लक्षात येते. महायुतीने जिंकलेल्या जागांपैकी १३८ जागांवर त्यांच्या उमेदवारांना ५० पेक्षा अधिक मते मिळाली आहेत.

राज्यात २०१४च्या विधानसभा निवडणुकीत अवघ्या ५५ उमेदवारांनी ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळवली होती. आमदारांनी इतकी मते मिळवण्याची ही सख्या २०१९ मध्ये १२९, तर यंदा १५४ वर पोहोचली आहे. यावेळी महाविकास आघाडीने फक्त १६ जागांवर ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळवली. महायुतीचे नेतृत्व करणाऱ्या भाजपाने लढवलेल्या जागांपैकी १३२ जागा जिंकत २६.८ टक्के मते मिळवली. यात पक्षाच्या ८४ उमेदवारांनी ५० टक्क्यांहून अधिक मतांनी विजय मिळवला. भाजपाने ६० टक्क्यांपेक्षा जास्त मतांसह २६ जागा जिंकल्या आणि साताऱ्यात सर्वाधिक ८०.४ टक्के मते मिळविली. भाजपाने त्यांच्या सर्व जागा किमान ३० टक्के मतांसह जिंकल्या आहेत, राजुरा येथे त्यांना सर्वांत कमी ३०.५ टक्के मते मिळाली आहेत.

### १६ उमेदवार १ लाखांहून अधिक मतांनी विजयी

या निवडणुकीत महायुतीने सरासरी ४,१०० मतांच्या फरकाने विजय मिळवला आहे. हा विजय महाविकास आघाडीच्या सरासरी १९,२०० मतांच्या फरकाच्या दुप्पट आहे. एकूणच सरासरी विजयाचे अंतर ३६,२३० मते होते, जे २०१९ मध्ये २८,४४० आणि २०१४ मध्ये २२,८१० इतके होते. शिरपूरमध्ये भाजपाने सर्वाधिक १.४६ लाख मतांनी विजय मिळवला. केवळ ४४ जागांवर सत्ताधारी महायुतीचे मताधिक्य १० हजारांच्या खाली आणि २४ जागांवर ५ हजारांच्या खाली आहे. भाजपाने सर्वांत कमी फरकाने बेलापूरमधून विजय मिळवला, तिथे त्यांच्या उमेदवाराचे मताधिक केवळ ३७२ इतके होते. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा एकही उमेदवार १ लाखांहून अधिक मतांनी जिंकला नाही. ५० हजाराहून अधिक मताधिक्यांसह आघाडीने ५ जागांवर विजय मिळवला. त्यांनी २२ जागा १० हजारांहून कमी मतांनी आणि १० जागा पाच हजारांपेक्षा कमी मतांनी जिंकल्या. महाविकास आघाडीतून काँग्रेसचे नाना पटोले यांनी सर्वांत कमी २०८ मतांनी विजय मिळवला.

# स्वातंत्र्य दुसऱ्यांदा संकटात आल्याशिवाय राहणार नाही

## जगदीप धनकड यांचा इशारा

**◆ नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

राजकीय पक्ष धर्माला देशापेक्षा जास्त महत्त्व देत असतील, तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा संकटात आल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा राज्यसभेचे अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी दिला.

संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संसदेच्या केंद्रीय कक्षात आयोजित भाषणात धनकड म्हणाले की, ठरवून संसदेच्या कामकाजात अडथळा आणणे लोकशाहीसाठी धोकादायक आहे. रचनात्मक संवाद, वादविवाद आणि सार्थक चर्चेच्या माध्यमातून लोकशाहीच्या मंदिराला त्याचे पावित्र्य बहाल करण्याची ही वेळ आहे, जेणेकरून देशातील सर्वसमान्य माणसाची आम्हाला सेवा करता येईल, असे धनकड यांनी स्पष्ट केले.



संविधानाने अतिशय कौशल्याने न्यायपालिका, विधिपालिका आणि कार्यपालिका यांची निर्मिती केली. प्रत्येकाचे कार्य आणि जबाबदारी निश्चित करून दिली. लोकशाहीतील हे तिन्ही स्तंभ आपल्या अधिकारक्षेत्राचे पालन करीत समन्वय, ताळमेळ आणि एकजुटतेने काम करायला लागले तरच लोकशाही अधिक मजबूत होऊ शकते, याकडे धनकड यांनी लक्ष वेधले.

### संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन

संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त एका विशेष नाण्याचे तसेच डाक तिकिटाचे विमोचन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय संविधानाच्या संस्कृत तसेच मैथिली भाषेतील पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले. भारतीय संविधानाचा प्रवास दर्शवणाऱ्या लघुपट यावेळी दाखवण्यात आला, राष्ट्रपतींनी संविधानाच्या प्रस्तावनेचे उपस्थित मान्यवरांसह सामूहिक वाचन केले. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

### मर्यादांचे पालन करा : ओम बिर्ला

सभागृहात कोणत्याही मुद्यावर आपली सहमती वा असहमती व्यक्त करताना मर्यादा आणि संयमाचे पालन करण्याचे आवाहन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी केले. संविधानसभेत वेगवेगळ्या विचारधारेच्या सदस्यांनी एकेका मुद्यावर सखोल चर्चा करताना, आपली सहमती वा असहमती व्यक्त करताना ज्या संयमाचे आणि मर्यादेचे दर्शन घडवले, त्याचेच अनुसरन सदस्यांनी सभागृहातील चर्चेत सहभागी होताना केले पाहिजे. आमचे संविधान हे दूरदृष्टी असलेल्या नेत्यांच्या अनेक वर्षांच्या तप, त्याग, विद्वता, सामर्थ्य आणि क्षमतेचे प्रतीक आहे, असे ते म्हणाले.

### मान्यवरांची उपस्थिती

**या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथसिंह, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गृहमंत्री अमित शाह, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह अनेक मंत्री आणि सर्वपक्षीय खासदार उपस्थित होते.**

# पुन्हा एकदा ईव्हीएमचे रडगाणे

## शरद पवार, ठाकरे उभारणार आंदोलन



**◆ मुंबई, २६ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीत मविआचा दारुण पराभव झाल्यानंतर आता पुन्हा एकदा विरोधकांनी ईव्हीएमचे रडगाणे सुरू केल्याचे चित्र बघायला मिळत आहे. यासाठी आंदोलन उभारण्याचे सूतोवाच शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी केले आहे.



विधानसभा निवडणुकीत उबाठा गटाचा दारुण पराभव झाला. त्यांच्या पदरात केवळ २० जागा पडल्या. हे सर्व अनाकलनीय आणि अनपेक्षित असल्याची प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली होती. त्यानंतर नवनिर्वाचित आमदार आणि पराभूत उमेदवारांसोबत उद्धव ठाकरे यांनी चर्चा केली व पराभवाची कारणे जाणून घेतली. आता ठाकरे यांनी ईव्हीएम विरोधात आंदोलन उभारण्यासंदर्भात सुतोवाच केले. दुसरीकडे, शरद पवारांचा गटही ईव्हीएमबाबत न्यायालयीन लढाई लढण्याची भाषा करीत आहे.

महाविकास आघाडीचा झालेला पराभव अजूनही आघाडीच्या नेत्यांच्या पचनी पडत नाही. त्यातून पराभूत उमेदवारांनी ईव्हीएमबाबत शंका उपस्थित केली आहे. ईव्हीएममुळेच गोंधळ झाला आहे. त्यातच, आता उद्धव ठाकरे महाविकास आघाडीतील इतर नेत्यांशी बोलून ईव्हीएम विरोधात सामाजात भ्रम निर्माण करण्यासाठी काहीतरी फेक नॅरेटिव्ह पसरविण्याच्या प्रयत्नात दिसत आहे. त्यासाठी ठाकरे नेहमीप्रमाणे माध्यमे, समाज माध्यमांद्वारे बोंबाबोंब करतील तर, पवार गटाच्या बैठकीत उमेदवारांनी केलेल्या तक्रारींवर कायदेशीर पावले उचलण्यासाठी वकिलांची टीम तयार करण्याचा शरद पवारांनी निर्णय घेतला.



राज्यपातळीवर एक आणि केंद्रीय पातळीवर कायदेशीर लढाई लढण्यासाठी वकिलांची टीम तयार केल्याचे समोर आले आहे.

केवळ आरोप करण्यापेक्षा ईव्हीएम बाबत जे आक्षेप आहेत किंवा निवडणूक प्रक्रियेत ज्या चुकीच्या बाबी घडल्या, ते सर्व पुरावे गोळा करण्याच्या सूचना शरद पवार यांनी उमेदवारांना केल्या आहेत. २८ तारखेपर्यंत व्हीव्हीपॅट तपासणीसाठी वेळ असल्याने उमेदवारांनी तत्काळ व्हीव्हीपॅट तपासणी करावी, अशी सूचनाही त्यांनी केल्याचे समजते. अर्थात, शरद पवार देखील नुसती नौटंकीच करीत असल्याचे स्पष्ट असले तरी, ते कायदेशीर या शब्दाच्या प्रभावात बुचकाळ्यात टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यावेळी उद्धव ठाकरे तर, ते फडणवीस असतील तर आपण वीस आहोत, अशा टोमण्यांच्या नंदनवनात वावरताना दिसत आहेत. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

# मतपत्रिकांच्या माध्यमातून निवडणुका घ्या : खडगे

**◆ नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

संविधानाच्या मुद्यावर संसदेत दोन दिवस चर्चा घेण्याची तसेच देशात पुन्हा मतपत्रिकांच्या माध्यमातून निवडणुका घेण्याची मागणी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी आज केली.



भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त काँग्रेसतर्फे तालकटोरा स्टेडियममध्ये आयोजित कार्यक्रमात खडगे बोलत होते. यावेळी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि अन्य काँग्रेस नेते उपस्थित होते.

मतपत्रिकांच्या माध्यमातून देशात निवडणुका घेण्यात याव्या, या मागणीसाठी आम्ही राहुल गांधी यांच्या नेतृत्वात भारत जोडो यात्रेसारखी दुसरी यात्रा काढू आणि देशभर जनजागरण करू. या मुद्यावर देशातील अन्य विरोधी पक्षांनाही आपल्यासोबत घेण्याचा प्रयत्न आम्ही करू, असे खडगे म्हणाले.

अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, आणि समाजातील दुर्बल वर्गातील लोक प्रत्येक निवडणुकीत काँग्रेसला मोठ्या प्रमाणात मतदान करतात, पण त्यांचे मत वाया जाते. निकालात त्याचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसत नाही. ईव्हीएमवर आमचा विश्वास नाही, त्यामुळे मतपत्रिकांच्या माध्यमातून निवडणुका घेण्याची आमची मागणी आहे. यामुळे आपण कुठे आहे, हे त्या लोकांना समजून येईल. अहमदाबादमध्ये खूप गोदाम आहेत, त्याठिकाणी ईव्हीएम ठेवता येतील, असे ते म्हणाले. महाराष्ट्रातील निवडणुकीत अदानी यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती, असा आरोपही त्यांनी केला.

जातीय जनगणनेच्या मागणीचा पुनरुच्चार करताना खडगे म्हणाले की, पंतप्रधान मोदी जातीय जनगणना करायला घाबरत आहेत. असे झाले तर समाजातील प्रत्येक वर्गाला त्यांच्या संख्याबळानुसार सत्तेत वाटा द्यावा लागेल, अशी भीती त्यांना वाटत आहे. ◀ *(तभा वृत्तसेवा)*



# महाकुंभ स्वच्छतेचे नवे मानदंड प्रस्थापित करेल : योगी आदित्यनाथ

**लखनौ, २६ नोव्हेंबर**

प्रयागराजमध्ये होणारा आगामी महाकुंभ केवळ स्वच्छतेच्या बाबतीत नवीन मानदंड स्थापित करणार नाही, तर 'डिजिटल कुंभ' सादर करण्यासाठी तंत्रज्ञानाचा स्वीकार देखील करेल, असे उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मंगळवारी सांगितले.

एका कार्यक्रमात उपस्थितांना आदित्यनाथ यांनी संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. भारतीय राज्यघटनेचे तीन मूलभूत स्तंभ संवाद, संवाद आणि संवाद यावर भर दिला.आगामी महाकुंभसाठी सरकारच्या तयारीची माहिती देताना आदित्यनाथ यांनी गेल्या साडेसात वर्षांत राज्यात झालेल्या परिवर्तनीय बदलांची माहिती दिली. हा महाकुंभ केवळ एक स्वच्छ आणि भव्य कार्यक्रम नसून, परंपरा आणि तंत्रज्ञानाचा मिलाफ असलेला 'डिजिटल कुंभ' ठरणार आहे. एकेकाळी कुंभ म्हणजे घाण, चेंगराचेंगरी आणि अनागोंदीचा समानार्थी शब्द होता. याचे कारण, कुंभाचे व्यवस्थापन अनेकदा श्रद्धा, परंपरा, संस्कृती किंवा वारसा यांचा आदर नसलेल्या व्यक्तींकडे सोपविले गेले. या कुंभमेळ्याच्या वारसाबद्दल आदराची भावना आणि परंपरेची जाण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आहे. त्यामुळेच २०१९ मध्ये प्रयागराज कुंभच्या व्यवस्थेने मानवतेचा अमूर्त सांस्कृतिक वारसा म्हणून युनेस्कोची मान्यता मिळवली आहे, असे आदित्यनाथ म्हणाले. हा महाकुंभ १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या कालावधीत ४५ दिवस चालणार आहे. मुख्य स्नानाच्या तारखांमध्ये पौष पौर्णिमा, मकर संक्रांतीचे शाही स्नान, मौनी अमावास्या, वसंत पंचमी, माघ पौर्णिमा आणि महाशिवरात्री यांचा समावेश असतो. तो जगातील सर्वांत मोठ्या धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक संमेलनांपैकी एक आहे. या महाकुंभासाठी सरकारच्या व्यापक तयारीवर प्रकाश टाकत, त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नांवर भर दिला.



मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या स्मृतिदिनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन्, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी मंगळवारी हुतात्मा स्मारकाला भेट देऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | बुधवार, २७ नोव्हेंबर २०२४
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**विनम्र अभिवादन**



साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे दैनिक तरुण भारतचे संस्थापक संपादक ग. त्र्यं. माडखोलकर यांची आज पुण्यतिथी.



राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापिका वंदनीय मावशी केळकर यांचा आज तिथीनुसार स्मृतिदिन



संविधान सदनात मंगळवारी आयोजित संविधान दिवस कार्यक्रमात एका विशेष नाण्याचे तसेच डाक तिकिटाचे विमोचन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील राहुल गांधी आदी उपस्थित होते

# संवैधानिक आदर्श आचरणात आणा

## • मौलिक कर्तव्याचे पालन करा • अमृतमहोत्सवी कार्यक्रमात राष्ट्रपती मुर्मू यांचे आवाहन

**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

संवैधानिक आदर्श आचरणात आणण्याचे तसेच मौलिक कर्तव्याचे पालन करण्याचे आवाहन करीत, असे केले तरच २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट आपण गाठू शकतो, असे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केले.

देशाने संविधान स्वीकारण्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने संविधान सदनात म्हणजे जुन्या संसदभवनातील केंद्रीय कक्षात आयोजित विशेष कार्यक्रमात मुर्मू संबोधित करीत होत्या. यावेळी उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश नारायणसिंह, राज्यसभेतील सत्ता पक्षनेते जे. पी. नड्डा, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू उपस्थित होते.

७५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी संविधानसभेने याच सभागृहात देशासाठी संविधान बनवले. आमचे संविधान देशाच्या लोकशाही गणराज्याचा मजबूत असा पाया आहे. आमचे संविधान आमची व्यक्तिगत आणि सामूहिक प्रतिष्ठा कायम ठेवते. आमचे संविधान जिवंत आणि प्रगतिशील असा दस्तावेज आहे. संविधानाच्या माध्यमातून आम्ही सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासासह अनेक महत्त्वपूर्ण उद्दिष्टे गाठली आहेत, असे राष्ट्रपती म्हणाल्या.

> संविधानाच्या प्रस्तावनेतून न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा समावेश आहे. कार्यपालिका, न्यायपालिका आणि विधिपालिकेसोबत नागरिकांच्या सक्रिय भागीदारीतून संवैधानिक आदर्शांना बळ मिळते. संविधानाने माणसाला जसे मूलभूत अधिकार दिले तसेच कर्तव्याचीही जाणिव करून दिली आहे.
>
> **द्रौपदी मुर्मू,** राष्ट्रपती

संविधान लागू झाल्यानंतर आम्हाला जे शिकता आले, त्याचा वारसा आम्ही नव्या पिढीपर्यंत पोहोचवला पाहिजे. २०१५ मध्ये २६ नोव्हेंबरला दरवर्षी संविधान दिवस पाळण्याचा निर्णय घेतल्यानंतर संविधानाबद्दल युवकांमध्ये मोठी जागृती निर्माण झाली आहे. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आम्ही आजादी का अमृत महोत्सव साजरा केला होता, पुढील वर्षी २६ जानेवारीला देश भारतीय प्रजासत्ताकाचा अमृतमहोत्सव साजरा करणार आहे. अशा कार्यक्रमातून आमची राष्ट्रीय एकता मजबूत होतेच, राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी आम्ही सर्व एकसंध असल्याचा संदेशही मिळतो, असे मुर्मू यांनी सांगितले. *(तभा वृत्तसेवा)*

# आज स्पष्ट होणार मुख्यमंत्रिपदाचे चित्र

### शिवसेनेच्या नेत्याची माहिती

**मुंबई, २६ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा धुव्वा उडवल्यानंतर महायुतीचा मुख्यमंत्री कोण, हे रहस्य अद्याप कायम आहे. मात्र, मुख्यमंत्रिपदाबाबतचे चित्र बुधवारी स्पष्ट होण्याची शक्यता आहे, अशी माहिती शिवसेनेचे नेते आणि प्रवक्ते संजय शिरसाट यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाच्या इतर वरिष्ठ नेत्यांसोबत चर्चा केल्यानंतर एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार मुख्यमंत्रिपदाबाबत निर्णय घेतील. या मुद्यावर एकनाथ शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांची बैठक होणार आहे. हा निर्णय बुधवारी सकाळपर्यंत माध्यमांना कळवण्यात येईल, असे संजय शिरसाट यांनी सांगितले.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात विधानसभा निवडणुका लढल्यानंतर सामान्य नागरिकांत शिंदे यांनीच मुख्यमंत्री व्हावे, अशी भावना निर्माण झाली आहे. मात्र, मुख्यमंत्रिपदाबाबत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची कोणती भूमिका आहे, हे मला माहिती नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

**भाजपाला कोणतीही घाई नाही**

भाजपाला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करण्याची कोणतीही घाई नाही. नवीन सरकारमधील खातेवाटप निश्चित झाल्याशिवाय भाजपा कोणतीही घोषणा करणार नाही, अशी माहिती पक्षातील सूत्रांनी दिली. एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी राजीनामा दिल्यानंतर, नवीन सरकार अस्तित्वात येईपर्यंत हंगामी मुख्यमंत्रिपदी कायम राहावे असे राज्यपालांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*



# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचा राजीनामा; विधानसभा विसर्जित

### शिंदे काळजीवाहू

**मुंबई, २६ नोव्हेंबर**

महायुती सरकारचा कार्यकाळ मंगळवारी संपुष्टात आल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी आपला राजीनामा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांच्याकडे सोपवला. त्यानंतर १४ वी विधानसभा विसर्जित करून नवे सरकार स्थापन होईपर्यंत राज्यपालांनी काळजीवाहू मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी एकनाथ शिंदे यांच्याकडेच सोपविली.

१४ व्या विधानसभेचा कालावधी २६ नोव्हेंबर रोजी संपुष्टात आल्याने, ती विसर्जित करणे क्रमप्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने राजभवन येथे एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार पोहोचले. यावेळी या तिघांनीही आपापले राजीनामे राज्यपालांकडे सुपूर्द केले. राज्यपालांनी राजीनाम्याची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करीत या तिघांचे राजीनामे स्वीकारले. मात्र, नवे सरकार स्थापन होईपर्यंत राज्याच्या काळजीवाहू मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी एकनाथ शिंदे यांच्याकडे सोपवली.

### महत्त्वाचे

## आता आले क्यूआर कोडवाले पॅनकार्ड

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने १,४३५ कोटी रुपयांच्या पॅन २.० प्रोजेक्टला मान्यता दिली आहे. सरकारी संस्थांच्या सर्व डिजिटल प्रणालींसाठी परमनंट अकाऊंट नंबर हा 'कॉमन बिजनेस आइडेंटिफायर' बनवणे हा या प्रोजेक्टमागील प्रमुख हेतू आहे. पॅन २.० प्रोजेक्ट अंतर्गत पॅन कार्ड क्यूआर कोडसह विनामूल्य अपग्रेड केले जाणार आहे. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत आर्थिक व्यवहारावरील कॅबिनेट समितीने आयकर विभागाच्या पॅन २.० प्रोजेक्टला मंजुरी दिली. प्रकल्पावर १,४३५ कोटी रुपये खर्च केले जातील. देशात ७८ कोटी पॅनकार्ड जारी करण्यात आले आहेत. त्यापैकी ९८ टक्के पॅन वैयक्तिक स्तरावर जारी करण्यात आले.

# 'वन नेशन-वन सब्स्क्रिप्शन' योजनेला मंजुरी

**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

संशोधन आणि नवनिर्मितीला चालना देण्यासाठी सरकारने आणखी दोन नवीन घोषणा केल्या आहेत. यापैकी पहिली 'वन नेशन-वन सब्स्क्रिप्शन' योजना आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांना जगभरातील शोधनिबंध आणि जर्नल्समध्ये प्रवेश करणे सोपे जावे तसेच शोधनिबंध आणि जर्नल्सच्या शोधात जगभर भटकावे लागणार नाही, यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

दुसरी घोषणा म्हणजे अटल इनोव्हेशन मिशनच्या नवीन टप्प्याची सुरुवात होणार आहे. या अंतर्गत अशी नवीन इनोव्हेशन सेंटर्स स्थापन केली जाणार आहेत, ज्यात भाषेचे बंधन असणार नाही. याचा अर्थ असा की, कोणताही विद्यार्थी येथे स्थानिक भाषेतही काम करू शकेल, असे माहिती व प्रसारण मंत्री अश्विन वैष्णव यांनी सांगितले. या दोन्ही उपक्रमांमुळे विद्यार्थी आणि तरुणांना संशोधन आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात वेगाने पुढे जाण्यास मदत होईल. देशातील सर्व उच्च शैक्षणिक संस्था आणि संशोधन संस्था 'वन नेशन-वन सबक्रिप्शन' योजनेशी जोडल्या जातील. या योजनेंतर्गत जगभरातील सर्व शोधनिबंध आणि जर्नल्स विद्यार्थ्यांना पुरविण्यात येईल. यात एकूण ३० प्रमुख आंतरराष्ट्रीय मासिक प्रकाशकांचा समावेश करण्यात आला आहे. हे जर्नल्स उच्च शिक्षण संस्था आणि केंद्र सरकारच्या संशोधन आणि विकास संस्थांमध्ये उपलब्ध असतील.

# चिन्मय प्रभूंच्या अटकेचा भारताकडून निषेध

**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

बांगलादेशातील न्यायालयाने इस्कॉनचे चिन्मय प्रभू यांना जामीन नाकारल्यानंतर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने या मुद्यावर टीका करीत हिंदू तसे इतर अल्पसंख्यकांचे रक्षण करा,असे आवाहन केले आहे.

आम्ही हिंदू आणि इतर सर्व अल्पसंख्यकांच्या शांततापूर्ण सभा आणि अभिव्यती स्वातंत्र्याच्या अधिकारासह त्यांची सुरक्षा निश्चित करण्याचे आवाहन करतो. अल्पसंख्यकांची घरे, व्यावसायिक प्रतिष्ठानांची जाळपोळ आणि मंदिरांची विटंबना अशी अनेक नोंद झालेली प्रकरणे बांगलादेशात घडली आहेत, असे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले. हिंदू व अल्पसंख्यकांवर मोठ्या प्रमाणात हल्ले झाले असताना शांततापूर्ण सभा घेऊन न्याय्य म ागण्या मांडणाऱ्या धार्मिक नेत्यावर आरोप ठेवण्यात आले.

# तुम्ही जिंकल्यास ईव्हीएम चांगले, अन्यथा खराब

### सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला झापले

**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

हरयाणात काँग्रेसचा आणि महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाल्यानंतर ईव्हीएमवर पुन्हा एकदा शंका घेत, पुन्हा पतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान करण्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात पोहोचला. या प्रकरणी दाखल याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने याचिकाकर्त्याला चांगलेच झापून काढले. तुम्ही जिंकल्यास ईव्हीएम चांगले आणि पराभव झाल्यास ते खराब हे कसे, अशा शब्दांत खडसावत न्यायालयाने याचिका फेटाळून लावली.

'हे काय सुरू आहे. तुमच्या विजय आणि पराभवावर ईव्हीएम चांगले किंवा वाईट, हे तुम्ही कसे ठरवू शकता, असा सवाल न्या. विक्रम नाथ आणि न्या. पी. बी. वराळे यांच्या न्यायासनाने उपस्थित केला. चंद्राबाबू नायडू, जगनमोहन रेड्डी यांचा पराभव झाल्यानंतर त्यांनीही ईव्हीएममध्ये गडबड केली जाऊ शकते, असे म्हटले होते, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. *(वृत्तसंस्था)*



### न्यायालयातील संभाषण

**याचिकाकर्ता के. ए. पॉल :** ही याचिका मी दाखल केली आहे.

**न्यायालय :** तुम्ही अतिशय मजेदार याचिका दाखल केली आहे. तुम्हाला अशा कल्पना सुचतात तरी कशा?

**पॉल :** मी एका अशा संस्थेचा अध्यक्ष आहे, ज्याने तीन लाख अनाथांची आणि ४० लाख विधवांची मुक्तता केली आहे.

**न्यायालय :** मग तुम्ही या राजकारणात का पडता?

**पॉल :** मी १५० देशांचा प्रवास केला आहे.

**न्यायालय :** त्यातील किती देशांमध्ये तुम्हाला मतपत्रिका आणि ईव्हीएमने मतदान दिसले? आपला देश जगापेक्षा वेगळा असावा, असे का वाटत नाही?

**पॉल :** ईव्हीएमच्या वापरात भ्रष्टाचार होतो. यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत ९ हजार कोटी रुपये जप्त करण्याची निवडणूक आयोगाची आकडेवारी आहे.

**न्यायालय :** मग, मतपत्रिकेचा वापर केल्यानंतर भ्रष्टाचार होणार नाही, असे तुम्हाला वाटते का?

# संभलमधील परिस्थिती सामान्य, शाळा उघडल्या

**संभल, २६ नोव्हेंबर**

दोन दिवसांपूर्वी न्यायालयीन आदेशानुसार जामा मशिदीच्या सर्वेक्षणादरम्यान संभल येथे झालेल्या हिंसाचारानंतर मंगळवारी येथील परिस्थिती सामान्य झाली आहे. येथील शाळा पुन्हा सुरू झाल्या, तर जीवनावश्यक वस्तूंची दुकाने उघडण्यात आलीत मात्र, येथी इंटरनेट सेवा बंद ठेवण्यात आली आहे.



पोलिस आणि प्रशासकीय अधिकारी परिस्थितीवर नजर ठेवून आहेत. संवेदनशील परिसरांत शीघ्र कृती दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत. बाहेरील लोकप्रतिनिधींना संभलमध्ये ३० नोव्हेंबरपर्यंत प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यातील बहुतांश भागांमध्ये परिस्थिती सामान्य शांत असली, तरी शाही जामा मशिदीचा परिसर निर्मनुष्य होता.

जामा मशिदीच्या ठिकाणावर हरिहर मंदिर होते, असा दावा असलेल्या याचिकेवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने मशिदीत पहिले सर्वेक्षण करण्याचा आदेश दिल्यानंतर १९ नोव्हेंबरपासून संभलमध्ये तणाव होता. दरम्यान, हिंसाचाराच्या काळात गोळीबार करणाऱ्या समाजकंटकाचे छायाचित्र समोर आले आहे.









सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# मोदींनी दाखविला आरसा...

आपल्या लोकशाहीने भारतीय संविधानासह सुरू केलेल्या यात्रेचा अमृत महोत्सव सुरू झालेला आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान स्वीकारले गेले आणि २६ जानेवारी १९५० पासून अमलात आले. ते आजतागायत अमलात आहे. जगातील अनेक देशांच्या घटना या काळात आल्या-गेल्या. पण, भारतीय संविधान कायम आहे आणि त्यामुळेच भारताची लोकशाही कायम आहे. मध्येच कुणाला तरी संविधानाचा बचाव करण्याची हुक्की येते आणि तो त्याबद्दल प्रचार किंवा अपप्रचार सुरू करतो. पण, अशा सर्व प्रचारांना गेल्या अनेक निवडणुकांच्या माध्यमातून लोकांनी उत्तर दिलेले आहे. ज्यांनी आणिबाणीच्या स्वरूपात भारतीय संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्यासह अनेक घटनात्मक मूल्यांना पायदळी तुडविले, त्यांनी महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीदरम्यानही संविधान बचावचा नारा दिला होता. संविधानाची पुस्तके वाटली होती. संविधानाची पुस्तके वाचणाऱ्यांनी ते वाचलेच असेल असे नव्हे आणि वाचले असेल तरी ते त्यांना समजले असेल असेही नव्हे! भारतीय संविधान समजून घेण्यासाठी नुसती भाषिक समज लागत नाही. त्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांप्रति असलेली आपली निष्ठाही महत्त्वाची असते. आम्ही म्हणू तो मुख्यमंत्री, आम्ही म्हणू तो कायदा, अशा पद्धतीने काँग्रेसने दीर्घकाळ भारतात कारभार चालविला. देशावर आणिबाणी लादणाऱ्या इंदिरा गांधी काँग्रेसच्या नेत्या होत्या. पंतप्रधान होत्या. आता त्यांची स्नुषा आणि नातू मिळून संविधानाचा जागर करण्याचे ढोंग करतात. अशा सर्व ढोंग्यांचे वस्त्रहरण भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. मतदार, संविधान आणि जगाच्या भारताकडून अनेक अपेक्षा आहेत. त्यांच्या कसोट्यांवर सिद्ध होण्याची गरज असताना मूठभर लोक स्वार्थासाठी संसदेला वेठीस धरत आहेत, अशा शब्दांत मोदींनी विरोधकांना कानपिचक्या दिल्या. भारतीय संविधानाच्या दृष्टीने संसद आणि संसद सदस्य हे भारतीय लोकशाहीचे महत्त्वाचे घटक आहेत. संसदेत चर्चा होणे अपेक्षित असताना गोंधळ होतो आणि त्यामुळे मनमोकळी चर्चा होत नाही. नवीन खासदारांना बोलण्याची, चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळत नाही, असे अनेक मुद्दे मांडून पंतप्रधानांनी विरोधकांचे पितळ उघडे पाडले. खरे तर पंतप्रधानांनी भारतीय जनतेचे मत मांडले आहे. संसदेत असो वा राज्य विधिमंडळात, गोंधळ करण्याची मुभा नाही. चर्चेची मुभा आहे. बऱ्याच प्रमाणात आरोप-प्रत्यारोप करण्याचीदेखील आहे. याही पलीकडे जाऊन विरोधकांना हे माहिती असायला हवे की, राज्य घटनेनुसार भारत हे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकतांत्रिक गणराज्य आहे आणि त्याने संसदीय पद्धत स्वीकारलेली आहे. संसदीय पद्धतीचा स्वीकार केल्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे संसदीय तरतुदींच्या योगे अस्तित्वात येणारी संसद आणि राज्यांची विधिमंडळे. भारतीय गणराज्याचा कारभार भारतीय संविधानानुसार चालतो. त्या पवित्र संविधानातील तरतुदींचे विस्मरण विरोधकांना सतत होत असते. घटनेनुसार स्थापन झालेल्या निवडणूक आयोगामार्फत घेतल्या गेलेल्या निवडणुकांचा निकाल आपल्या बाजूने लागला तर ईव्हीएम निर्दोष आणि आपल्या विरोधात गेला तर ईव्हीएम सदोष, अशी त्यांची भूमिका असते. झारखंडचा निकाल बरोबर असतो तर महाराष्ट्राचा संशयास्पद असतो. याच विषयावरील एका याचिकेमार्फत बॅलेट पेपरचा वापर करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली होती. ती मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्याची घटना ताजी आहे. खरे तर मोदी आणि भाजपाच्या विरोधकांना सूर गवसेनासा झालेला आहे. त्यामुळे ते सैरभैर झालेले आहेत.

अमृत महोत्सवाच्या निमित्ताने विरोधकांनी एक गोष्ट समजून घेतली पाहिजे. ती अशी की, भारतीय राज्यघटना ही केवळ एक दस्तावेज नव्हे; ही घटना म्हणजे जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीला मार्गदर्शन करणारी गुरुकिल्ली होय. राष्ट्राच्या बहुलतावादी जडणघडणीचे रक्षण करताना ते न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांना मूर्त रूप देईल, याची खातरजमा भारतीय संविधानाच्या मार्फत केली जाते. गेल्या दशकभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घटनात्मक आदर्शांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यातील अत्यंत लक्षणीय बाब म्हणजे, मोदींच्या सरकारने पारदर्शकता, जबाबदारी आणि सर्वसमावेशकता यावर भर देऊन लोकशाही व्यवस्थेचे पुनरुत्थान केले आहे. 'MyGov' सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे नागरिकांना थेट धोरण ठरवणाऱ्यांशी संपर्क साधता येतो. सूचना करता येतात. मोदींच्या काळात लागू झालेल्या योजना, उदा. डिजिटल इंडिया, डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर यासारखी उदाहरणे अद्याप जगात सर्वत्र सापडणारी नाहीत. अनेक योजना व सेवा आता एका क्लिकनिशी मिळविता येतात. नियोजन आयोगाचे नीती आयोगात रूपांतर झाल्यामुळे राज्यांना विकासात्मक नियोजनात अधिक भूमिका वठवणे शक्य झाले आहे. 'टीम इंडिया' ही कल्पना मोदी सरकारची. सामाजिक न्याय हा भारतीय राज्यघटनेचा सर्वांत महत्त्वाचा आदर्श आहे. मोदी सरकारने समाजातील उपेक्षित घटकांचे उत्थान करण्याच्या उद्देशाने अनेक उपक्रम राबविले. संविधानाच्याच अनुषंगाने बोलायचे तर १०३ व्या दुरुस्तीचे उदाहरण पाहिले पाहिजे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) १० टक्के आरक्षणाची तरतूद करणारी ही घटना दुरुस्ती २०१९ मध्ये म्हणजे मोदींच्या काळात झाली. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी सरकारने आर्थिक साहाय्य, शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात देणे सुरू केले आहे. 'मिशन वन धन'सारखे विशेष उपक्रम वनसंपत्तीचा वापर करून आदिवासी उद्योजकतेला प्रोत्साहन देणारे आहेत. महिला सक्षमीकरण हे मोदी प्रशासनाच्या सामाजिक न्यायाच्या धोरणांचे वैशिष्ट्य आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या कार्यक्रमांनी लैंगिक समानतेबद्दल जागरूकता निर्माण केली आणि महिला साक्षरता आणि आरोग्य निर्देशकांमध्येही सुधारणा घडवून आणल्या. 'प्रधानमंत्री उज्ज्वला योजने'मुळे कोट्यवधी ग्रामीण कुटुंबांना एलपीजी कनेक्शन मिळाले. 'आयुष्मान भारत' हा जगातील सर्वात मोठा आरोग्य विमा कार्यक्रम आहे. लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करणारी पीएम-किसान योजना, सिंचनासाठी मदत करणाऱ्या योजना इत्यादी कित्येक उदाहरणे संविधान बचावचे ढोंग करणाऱ्यांच्या तोंडावर फेकून मारता येतील. 'प्रधानमंत्री जन धन योजना' ही आर्थिक समावेशकतेला चालना देण्यासाठी परिवर्तनकारी पाऊल ठरली. कोट्यवधी भारतीयांनी झिरो बॅलन्सवर बँकेचे खाते सुरू केले. 'स्टार्ट अप इंडिया' उपक्रमाने तरुण भारतीयांमध्ये उद्योजकीय मानसिकता निर्माण केली. 'स्किल इंडिया' आणि 'स्टॅण्ड-अप इंडिया' यांसारख्या कार्यक्रमांतून महिला आणि मागासवर्गीय उद्योजकांसह उपेक्षित गटांना कर्ज, मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळू लागले आहे. त्यांचे जीवन बदलते आहे. 'स्वदेश दर्शन'सारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून सांस्कृतिक आणि धार्मिक स्थळी पर्यटन पायाभूत सुविधा विकसित करणे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देऊन वारसा जतन करण्यास प्रोत्साहन देणे सुरू आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' हा मंत्र सुसंवाद वाढविण्याच्या सरकारच्या कटिबद्धतेला अधोरेखित करणारा. अल्पसंख्यक समुदायांना मुख्य प्रवाहात विकासात आणण्याच्या प्रयत्नांमध्ये विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आणि आऊटरीच उपक्रम यांचा जाणीवपूर्वक समावेश केलेला आहे. मुद्दा असा की, संविधान बचाव म्हणजे नेमके काय, याचे उत्तर विरोधकांकडे नाही. त्यांनी आणिबाणी लावली. त्यांनी जातीयता वाढविली. त्यांनी लांगूलचालन केले. ते सारे घटनाविरोधी होते तरी ते आता संविधानाच्या रक्षणाचे ढोंग करतात. मोदींनी त्यांचे वस्त्रहरण करून त्यांना आरसा दाखविला आहे. त्या आरशात स्वतःचा चेहरा बघून संसदीय योगदान देण्याची संधी विरोधकांना अजूनही आहे, एवढेच त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे.

## चिंतन

### गुरुदत्त दिनकर वाकदेकर

# जीवन संपवणारी आग की...!

उत्तरप्रदेशातील झाशी जिल्ह्यात महाराणी लक्ष्मीबाई वैद्यकीय महाविद्यालयातील विशेष नवजात अर्भक विभागामध्ये शुक्रवार, १५ नोव्हेंबरच्या रात्री १० च्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत ११ मुलांचा मृत्यू ही घटना दुःखदच नाही तर रुग्णालयांमधील सुरक्षेबाबतच्या त्रुटी आणि घोर निष्काळजीपणावरही प्रकाश टाकते. देशात 'राष्ट्रीय नवजात सप्ताह' (१५ ते २१ नोव्हेंबर) सुरू असताना ही दुर्घटना घडली आहे. सर्व मुले ८० टक्के जळालेली आढळून आली आणि त्यांची हाडेही उघडी पडली. यावरून आगीच्या तीव्रतेचा अंदाज लावता येतो. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या अर्धा डझन गाड्यांना पाचारण करावे लागले आणि त्यानंतरच आग आटोक्यात आणण्यात आली. रुग्णालयाच्या वार्डाच्या खिडक्या तोडून ३९ मुलांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरमध्ये स्पार्किंगमुळे ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. आजूबाजूला धुराचे लोट पसरले होते, त्यामुळे विशेष नवजात अर्भक विभागामध्ये ठेवण्यात आलेल्या मुलांना बाहेर काढणे कठीण झाले होते. तेथे ठेवण्यात आलेल्या अग्निशमन यंत्राची मुदत चार वर्षांपूर्वीच संपल्याचे समोर आले आहे.



अग्निशमन यंत्राची मुदत संपली नसती तर आगीवर नियंत्रण मिळविणे सोपे झाले असते आणि आगीत ११ अर्भकांचा बळी गेला नसता. आता या निष्काळजीपणाला जबाबदार असणाऱ्यांना कठोर शिक्षा होणार का, हा मोठा प्रश्न आहे. चांगली बाब म्हणजे या अपघाताच्या तपासाची जबाबदारी आयबीकडे सोपविण्यात आली आहे. आता फक्त आयबीच्या तपासातच आग कशी लागली? ही घटना निष्काळजीपणाचा परिणाम आहे की काही कटाचा भाग आहे? हे स्पष्ट होईल. मात्र, रुग्णालयांना आगीपासून वाचवायचे कसे, हा प्रश्न उरतो. अर्थात, केंद्र आणि राज्य सरकारने पीडितांना भरपाई देणे ही चांगली बाब आहे. परंतु, मृत आणि जखमींच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देऊन सरकार आपले कर्तव्य पार पाडते, हे पुरेसे नाही. रुग्णालये आणि इतर सार्वजनिक ठिकाणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडणार नाहीत, याची काळजी सरकारला घ्यावी लागेल. त्यांच्या सुरक्षेसाठी भक्कम व्यवस्था असायला हवी. कारण रुग्णालय आणि इतर ठिकाणी आगीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. क्वचितच एखाद्या वर्षी रुग्णालयातील आगीमुळे रुग्णांच्या मृत्यूची बातमी वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध होत नाही. जर रुग्णालयेच सुरक्षित नसतील आणि सुविधांनी सुसज्ज नसतील, तर तेथे काम करणारे कर्मचारी, डॉक्टर आणि रुग्ण कसे सुरक्षित असतील, यावर नक्कीच चिंतन करण्याची गरज आहे.

हॉस्पिटलमध्ये लागलेल्या आगीत जीव गमावण्याची ही पहिलीच वेळ नाही. उत्तरप्रदेशची राजधानी लखनौ येथील किंग जॉर्ज मेडिकल कॉलेज (केजीएमयू) च्या ट्रॉमा सेंटरमध्ये शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत सहा रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला तसेच गुजरात राज्यातील अहमदाबाद येथील एका खाजगी रुग्णालयात लागलेल्या भीषण आगीत आठ रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्या रुग्णालयात दाखल झालेले रुग्ण कोरोनाग्रस्त होते आणि जगण्यासाठी धडपडत होते. मात्र, रुग्णालयाच्या गलथान कारभारामुळे लोकांना जीव गमवावा लागला. गेल्या वर्षी ओडिशाची राजधानी भुवनेश्वर येथील इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस आणि एसयूएम हॉस्पिटलच्या आयसीयू वार्डमध्ये शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती; ज्यामध्ये दोन डझनहून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. त्याचप्रमाणे कोलकाता येथील प्रख्यात खाजगी हॉस्पिटल ॲडव्हान्स्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट (एएमआरआय) मध्ये दुर्दैवी आग लागली; ज्यात ९० हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला. मागच्या वर्षीच मध्यप्रदेश राज्यातील सतना जिल्ह्यातील एका खाजगी रुग्णालयात लागलेल्या भीषण आगीत ३२ नवजात बालके जळून राख होण्यापासून वाचली होती. आपल्या लक्षात येते की, सुप्रसिद्ध रुग्णालयेच नाही तर संकुले, विवाह सभागृह, हॉटेल्स, कोचिंग इन्स्टिट्यूट, मंदिरे, जत्रेची ठिकाणे, इमारती, शाळा, रेल्वे स्टेशन्स आणि इतर सार्वजनिक ठिकाणेही सुरक्षित नाहीत.

या घटनांमध्ये एक गोष्ट समान दिसून येते; ते म्हणजे आग रोखण्यासाठी कुठेही योग्य व्यवस्था नाही. गेल्या वर्षी गुजरातच्या सुरत येथील तक्षशिला कॉम्प्लेक्समध्ये भीषण आग लागली होती; ज्यात २३ जणांचा मृत्यू झाला होता. तेथेही आग विझविण्यासाठी योग्य व्यवस्था नव्हती. गेल्या वर्षी राजकोटमधील टीआरपी गेम झोनमध्ये लागलेल्या आगीत अनेक मुलांना आपला जीव गमवावा लागला होता. उन्हाळ्याच्या सुट्टीत मुले तिथे खेळायला गेली होती. मात्र, आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. डिसेंबर १९९५ मध्ये हरयाणात शाळेच्या कार्यक्रमादरम्यान एका पंडालला आग लागल्याने सुमारे ४४२ मुलांचा मृत्यू झाला तसेच ६ जुलै २००४ रोजी तामिळनाडूतील कुंभकोणम जिल्ह्यात लागलेल्या आगीत ९१ शाळकरी मुलांचा मृत्यू झाला होता. गेल्याच वर्षी देशाची राजधानी दिल्लीतील तीन मजली व्यावसायिक इमारतीला लागलेल्या भीषण आगीत २७ जणांचा मृत्यू झाला होता. जानेवारी २०२१ मध्ये महाराष्ट्रातल्या भंडारा जिल्हा रुग्णालयातील विशेष नवजात केअर युनिटमध्ये लागलेल्या आगीत १० नवजात बालकांचा मृत्यू झाला होता.

२०१९ मध्ये राणी झाशी रोडवरील धान्य बाजारामध्ये लागलेल्या भीषण आगीत ४३ जणांचा मृत्यू झाला होता. दिल्लीच्या औद्योगिक क्षेत्रातील सेक्टर ५ मधील एका इमारतीत बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या फटाक्यांच्या कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत सुमारे १७ जणांचा मृत्यू झाला. गेल्या वर्षी दिल्लीत झालेल्या किन्नरांच्या संमेलनादरम्यान एका पंडालला आग लागली; त्यात १६ किन्नरांना आपला जीव गमवावा लागला होता. जोपर्यंत रुग्णालयांचा प्रश्न आहे, सर्व राज्य सरकारांनी, सरकारी रुग्णालयांना अधिक चांगल्या सुरक्षेसह सुसज्ज सुरक्षिततेशिवाय सर्व बेजबाबदार खाजगी रुग्णालयांनाही भक्कम सुरक्षा व्यवस्था सुसज्ज करणे योग्य ठरेल. गरज भासल्यास त्यासाठी कठोर कायदे करा. नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांच्या चालकांना शिक्षा करा. कारण रुग्णालयातील आगीच्या घटना कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. सरकारी असो की खाजगी रुग्णालये सुरक्षा व्यवस्थेबाबत डोळेझाक करत असल्याचे अनेक सर्वेक्षणातून समोर आले आहे. परिणामी रुग्णांचे जीवन देवाच्या कृपेवर आहे. अशा स्थितीत देशातील सर्व सरकारी आणि खाजगी रुग्णालयांनी आगीपासून बचावासाठी आवश्यक त्या वेळी वापरण्यासाठी सुरक्षा उपकरणांसह व्यवस्था करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची तातडीने नियुक्ती करणे आवश्यक आहे. आगीपासून बचाव करण्यासाठी रुग्णालयांमध्ये सुरक्षा उपकरणे असतात; मात्र आग लागल्यास ती उपकरणे बचावासाठी वापरली जात नसल्याचे अनेकदा दिसून येते. याचे कारण रुग्णालयांमध्ये अग्निशामक प्रशिक्षित कर्मचारी नाहीत. ही उपकरणे वेळीच वापरली तर लोकांचे प्राण वाचू शकतात. केवळ सुरक्षा व्यवस्थेबाबत रुग्णालये उदासीन नाहीत, हे दुर्दैव आहे. आता येथे विविध प्रकारचे घोटाळेही उघडकीस येत आहेत. खाजगी रुग्णालयांतून नवजात अर्भकांची चोरी करण्यापासून मानवी अवयवांची तस्करी करण्यापर्यंत अनेक वेळा वृत्तपत्रांमध्ये बातम्या येतात. आता रुग्णालये सेवेची केंद्रे बनण्याऐवजी अवैध पैसे कमविण्याची केंद्रे बनू लागली आहेत. ही परिस्थिती अत्यंत दुर्दैवी आणि मानवतेला लज्जास्पद आहे. यावर वेळीच अंकुश लावणे गरजेचे आहे.

९९८७७४६७७६

## वेध

### विजय निचकवडे

# मज फूलही रुतावे...

*'काटा रुते कुणाला आक्रंदतात कोणी;*
*मज फूलही रुतावे हा दैवयोग आहे!'*

पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या या नाट्य गीताची अनुभूती आज महाराष्ट्राच्या राजकारणात येऊ लागली आहे. राज्यात 'कमळ' दिमाखात फुलले आणि अनेकांची भांबावल्यागत अवस्था झाली. अनेकांची वाचाळी सुरू झाली. मग काय, 'मज फूलही रुतावे' या नाट्य गीताच्या ओळी सहज आठवून गेल्या. हे कमळाचे फूल इतके रुतू लागले की, आलेले बहुमत राक्षसी म्हणण्यापर्यंत केविलवाणी अवस्था होऊन बसली. आत्मविश्वास कसा असावा तर महायुतीच्या नेत्यांसारखा! निवडणुकांआधी आणि मतदान झाल्यानंतर निकाल लागण्यापूर्वी जणू काही विरोधकांचे मंत्रिमंडळ तयार आहे, असाच आविर्भाव महायुतीतील सर्वच नेत्यांमध्ये दिसून येत होता. विशेष म्हणून बोलण्याला प्रचंड ऊत आलेले 'रा'ऊतही हेच बोलत सुटले होते. नक्कीच लोकसभा निवडणुकीत मिळालेले यश त्यांना हे करण्यास भाग पाडत असावे. वाढलेला आत्मविश्वासही याच जोरावर असावा, कदाचित! सत्तेतील नेत्यांना अगदी खालच्या पातळीवर जाऊन बोलण्याइतपत धारिष्ट्य झाले होते. आणि हो, लोकसभेत त्यांचे खासदार अधिक निवडून आले, तेव्हा ईव्हीएम पण एकदम 'राईट' होते.

महाविकासचे सर्व जण बाशिंग बांधून तयार होते अन् अगदी वेळेवर मतदारांनी महायुतीच्या डोक्यावर अक्षदांचा पाऊस पाडत प्रचंड विश्वास टाकला. निकाल आले आणि कालपर्यंत मुख्यमंत्री आमचाच, सत्ता आल्यावर मिंध्यांपासून फडणवीसांपर्यंत सर्वांना तुरुंगात टाकू म्हणणारे बावचळले. ज्या ताकदीने कमळ राज्यात फुलले, ते यश विरोधकांच्या डोळ्यांपुढे अंधारी आणणारे होते. तेव्हापासून भांबावलेले राऊतांपासून पवारांपर्यंत सर्वच असंबद्ध बोलू लागले. एकीकडे कमळ फुलले, पण तेच कमळाचे फूल विरोधकांना रुतल्याचे त्यांच्या अवस्थेवरून स्पष्ट दिसत होते.



राऊत म्हणतात, मिळालेले बहुमत लोकशाही मार्गाने नाही. हे राक्षसी आहे. म्हणजे तुम्ही लोकांनी दिलेल्या निर्णयाचा अपमान करता असेच ना. एकीकडे लोकशाही सांगायची आणि दुसरीकडे जनमताचा अनादर करायचा, म्हणजे कमळाचे फुलणे जिव्हारी लागले असेच ना! पटोले यांनी तर निकाल आधीच ठरला होता, केवळ मतदान घेऊन दिखावा केला, असे बोलून टाकले. आता प्रदेशाध्यक्ष असे बोलले म्हणजे त्यांच्या मनावर किती आघात झाला, हे स्पष्ट होते. उद्धवाने तर महाराष्ट्राची दिशाच बदलल्याचे सांगितले. आता त्यांच्या पारड्यात मतं पडली असती तर महाराष्ट्र योग्य दिशेने आणि धोबीपछाड मिळाली तर दिशा बदलली म्हणणे म्हणजे महाराष्ट्र यांच्याच मालकीचा असल्याचे सांगणे नव्हे का? गुजरातला शपथ घ्या, बहुमत आलं तर काय तीर मारला या वक्तव्यातून विरोधकांची बाजू सावरण्याची केविलवाणी धडपडच दिसत आहे. आज लोकशाही संपली, असे म्हणणारे विरोधकांच्या मते ते जिंकले म्हणजेच लोकशाही जिवंत राहते, असे म्हणायचे आहे का?

निकाल लागून आज पाच दिवस होऊनही पराभवाचे समर्थन करण्यासाठी कारणे शोधली जात आहेत. हे करून केवळ त्यांच्याकडून स्वतःचे मानसिक समाधान करण्याचा प्रयत्न होत आहे, हे तेवढेच खरे! मात्र, एवढ्या दिवसात कायम गरळ ओकणाऱ्या एकाही नेत्याने मिळालेल्या विजयासाठी सत्ताधाऱ्यांचे अभिनंदन करण्याचे मोठे मन दाखविले नाही. आम्ही लोकशाही मानणारे आहोत. संविधान घेऊन आम्ही जाहीर सभांमध्ये भाषणे देत असू तर त्याच लोकशाही मार्गाने झालेल्या निवडणुकांच्या निकालाचा स्वीकार का करीत नाही? लोकांनी महायुतीच्या बाजूने दिलेला कल तुम्हाला राक्षसी वाटतो. निकालाला नावं, बोट ठेवून तुम्ही मतदारांच्या जनमताचा अनादर करताय, याचे तरी थोडे भान ठेवले गेले पाहिजे?

माणूस पराभवाने व्यथित होतो. पण राजकारण्यांना त्यातून सावरून समोरच्याचे यशही तेवढ्याच मोठ्या मनाने स्वीकारता यायला हवे. याची प्रचीती नागपूरचे काँग्रेसचे उमेदवार बंटी शेळके यांनी दिली. पराभूत होऊनही विजयी प्रवीण दटके यांचे तोंड गोड करीत शाल घालून कौतूक केले. एक लहान कार्यकर्ता हे करू शकत असेल तर त्यांच्या शिरस्थ नेत्यांना हे कळू नये, याचे नवल आहे. सत्तेच्या स्वप्नात रंगलेल्या विरोधकांपुढे अचानक फुलून आलेले कमळ चांगलेच रुतल्याचे वेगवेगळ्या वक्तव्यांमधून उघड होते. आता फूलही जर रुतत असेल तर त्याचे सामर्थ्य किती हे जाणूनच वागावे ना...


९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

### प्रा. दिलीप जोशी

# रिती होत चालली मने आणि माणसे!

आजकाल आपले जीवन धर्माधिष्ठित, नीतिमूल्याधिष्ठित राहिले नाही त्यामुळे आता कोणाच्याच जवळ नैतिक बळ राहिलेले दिसत नाही. सर्वांचेच जीवन अस्थिर, अविवेकी आणि स्वअर्थी झाले आहे. रोज सकाळी नवा प्रश्न घेऊन तांबडं फुटते. दिवसभर त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी धडपड सुरू असते. दिवसभरात तो प्रश्न सुटतो न सुटतो तोच रात्री नवा प्रश्न आ वासून तयार असतो. प्रश्नांची सोडवणूक करताना आयुष्य केव्हा निघून जाते, हे आपले आपल्यालाच कळत नाही. आयुष्याच्या अडचणी सोडविण्याच्या नादात स्वतःकडे लक्ष द्यायलाही वेळ मिळत नाही आपल्याला. 'बी.ए. हुये, नोकर बने, पेन्शन ली और मर गये!' हेच आपले जीवन झाले. काव्य, शास्त्र, विनोद, विरंगुळा या बाबींना स्थानच नाही. भजन-पूजन, संगीत-साधना यांचा तर दूर दूर संबंध नाही आपला. एखादे गणेश किंवा दुर्गा मंडळ, सामाजिक संस्था, संघटना यात सहभाग घ्यायचा नाही; फार नाही, पण एखाददुसरा मित्रही नसतो इतके आपण एकाकी झालो आहोत. समाजातील प्रत्येक बाबींत 'मला काय त्याचे?' किंवा 'माझा काय फायदा?' हीच भूमिका आपली. सतत 'मी आणि माझे' हा विचार पोखरून टाकतो आपल्याला. बहुतेकांना मरणाची भीती वाटते. कसं होईल? आणि काय होईल? या कायम निवासी भीतीमुळे सर्वांनाच रक्तदाब किंवा मधुमेह आहेच. जरासे संकट किंवा अडचण आली की, शरीर घामघूम, चित्त अस्थिर, मन विचलित, पोटात गोळा आणि हातपायात थरथरी. त्यामुळे चिडचिड होऊन घरातील वातावरण खराब होते. नेहमीच नाही, पण कधी कधी नाईलाजाने पोलिस स्टेशन, न्यायालयाला सामोरे जावे लागते. स्वतःचे नुकसान झाले तरी चालेल; आपला गुन्हा नसेल तरी अन्याय निमूटपणे सहन करणे या बाबीदेखील अंगवळणी पडल्या आहेत.



हे केवळ व्यक्तिगत विचार करण्याचे लक्षण आहे.

कोण निवडून आले पाहिजे? या साध्या आणि सोप्या प्रश्नाचे उत्तर द्यायला घाबरतात माणसे. रस्त्यात अपघातात तडफडणाऱ्या माणसाला पुढील ताप नको म्हणून मरू देणारेच अधिक आहेत. त्याला कारणही असते म्हणा! त्यांच्या स्वतःच्याच छोट्या छोट्या प्रश्नांनी ते इतके हैराण होतात की, इतर प्रश्न त्यांना पर्वताएवढे वाटतात. कुणाच्या मयताला, बारसे-तेरशाला, लग्न समारंभालाही न जाणारी संवेदनाशून्य माणसे भरपूर आहेत. मुकी होत आहेत माणसे. जराही मनाविरुद्ध झाले की आक्रस्ताळेपणा आणि मनाप्रमाणे झाले की हुरळून जाणे दोन्हीही घातक आहे. मनाचे हे संतुलन सांभाळता न येणाऱ्यांचे हे प्रमाण वाढते आहे. सतत विचारात राहणे हाही रोगच म्हणावा लागेल. खरं सांगू; सततचे विचार एकट्यात गर्दी करतात आणि गर्दीत एकटे पाडतात. अशी माणसे दिसतात आपल्याला नेहमी की जे आपल्याच तालात असतात. म्हणजे ना संसार नीटनेटका ना परमार्थविवेक फक्त ऐहिक सुखाच्या मृगजळामागे धावता धावता देह रिता होतोय फक्त देव-देश-धर्म यासाठी माणसे बोथट होत चालली.

'हम दो हमारे दो' म्हणजे आम्ही दोघे आणि आमची दोघे या व्यतिरिक्त इतरांना स्थानच नाही जीवनात. मायबाप, स्नेहीजन आपोआप गेलेत घराबाहेर. हा एकाकी राहण्याचा विचार जीवनाचा भाग बनला. आयुष्यात एकदाही रक्तदान न केलेली माणसेच आहेत सर्वत्र. जीवन म्हटले की चढउतार येणारच. संकटांना सामोरे जायचे असेल तर मन, मस्तिष्क आणि मनगट मजबूत हवे. त्यासाठी स्वतः व्यायाम, ध्यान, प्राणायाम करणे अत्यावश्यक आहे. स्वतःचा विचार झाल्यावर काही सामाजिक कार्यात सहभाग, मित्रमंडळी असणे आवश्यक आहे. गप्पाटप्पांमुळे मन मोकळे होते, मेंदू ताजा होतो आणि शरीरातील ऊर्जा वाढते. काही मिनिटे आपल्या इष्टदेवतेसमोर बसा, एखादा मंत्र, स्तोत्र नित्यनेमाने म्हणा. तुळशीला पाणी, गाईला नैवेद्य, कुत्र्याला भाकरी एखादं वेळेस करून तर पाहा. मंदिरात किंवा बाजारहाटसाठी सपत्नीक जाऊन तर पाहा; मग ऐश्वर्याचा विवेक, आहे त्यात समाधानी वृत्ती, अंथरूण पाहून पाय पसरणे, इतरांची सुखे पाहून अस्वस्थ न होणे शक्य होईल. असे केल्याने 'व्यष्टी'चा 'समष्टी' होतो. 'अहं'चा 'वयं' होतो. मनाचा विकास होतो, हृदय विस्तारित होते. बुद्धी, शक्ती आणि पराक्रम वाढीस लागतो. कुठलेही संकट येऊ द्या; हिमतीने सामोरे जाण्याचे कौशल्य येते. शरीर सशक्त तर मन सशक्त. मन सशक्त तर जीवन सशक्त. जीवनाचे हे युद्ध आपल्याला लढावेच लागेल.

'तस्मात् उत्तिष्ठ कौन्तेय, युद्धाय कृतनिश्चयः।'

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### महाराष्ट्रातील जनतेला त्रिवार वंदन

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी महाविकास आघाडीला धोबीपछाड देऊन महायुतीला भरघोस जागांनी विजयी केले. खोट्या आश्वासनांना बळी न पडता बंधू-भगिनींनी वास्तवाचा विजय केला यातच शिवरायांना मानवंदना दिली. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जनतेच्या मनात सत्याचे प्रबोधन केले त्यालाही मतदारांकडून प्रतिसाद मिळाला. कारण शेवटी हिंदुराष्ट्र हा महत्त्वाचा मुद्दा आहे हे नक्कीच. ज्यांनी महायुतीच्या मंडळींना प्रचारात सातत्याने शिव्याशापच देण्याचे काम केले त्यांना मतदारांनी योग्य जागा दाखवून आपली प्रतिष्ठा अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

यातच खरी शिवसेना आणि खरी राष्ट्रवादी कोणाची याचाही निकाल लागला हेही नसे थोडके. माझा बाप, आमदार, चिन्ह चोरले असा गवगवा करणारे माझे मतदारही चोरले म्हणाले तर नवल नाही. शब्द हे शस्त्र आहे, जपून वापरा हा सुविचार अजूनही अनेकांच्या लक्षात का येत नाही? अशा वागण्याने अनर्थ घडतात याचा महाभारतातील ज्वलंत घटनेवरूनही बोध का होत नाही? नियती आपल्या मनाप्रमाणे चालते. कर्माची फळे भोगावीच लागतात. द्रौपदीने केलेला दुर्योधनाचा अपमान, कुंतीने दिलेल्या आदेशाचे पालन, दुर्योधनाच्या वर्मावर शब्दांनी घातलेला घाव यातून तर महाभारत प्रखर झाले आणि त्याचे दुष्परिणाम संपूर्ण परिवाराला भोगावे लागले म्हणूनच बेलगाम बोलणे, लिहिणे टाळले नाही तर प्रपंचात आणि जनमानसात महाभारत घडते हेच निवडणुकांच्या निकालाने दाखवून दिले आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### देव, देश आणि धर्मासाठी....

कालपासून, आपण निवडणुकांचे निकाल बघतो आहोत. आनंदाने उत्साहित आहोत. गेली दीड वर्ष, भटके विमुक्त विकास/ कल्याणकारी परिषद मार्फत घेतल्या गेलेल्या प्रयत्नांना अखेर यश आलं. वस्त्यावस्त्यांवर जाऊन सर्वेक्षण असो, शासनाच्या विविध योजनांची शिबिरे असोत या माध्यमातून भटके विमुक्त समाज बांधवांसोबत प्रत्यक्ष निरंतर संवाद होत राहिला. शासनाच्या विविध योजना भटके समाज बांधवांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य परिषदेतर्फे झाले. हे सारे प्रत्यक्ष लाभार्थी आहेत. गेल्या दोन महिन्यात समाज मेळावे, वस्ती बैठकांचे आयोजन, पत्रक/पुस्तिका वितरण प्रत्येक संपर्कित वस्त्यांवर झाले. कशाचाही गवगवा नाही की गाजावाजा नाही. प्रत्यक्ष उमेदवारांना सुद्धा माहिती नसेल की त्यांच्यासाठी कोण कुठून काम करतोय्. अगदी शिस्तबद्ध, सुनियोजित आणि प्रचंड सूक्ष्म नियोजन करून केलेलं हे कार्य १०० टक्के मतदान होण्यास कारणीभूत आहे, असं म्हटलं तर ते वावगं होणार नाही. अदृश्य शक्ती कार्यरत आहे असं म्हणणाऱ्या आमच्या सन्माननीय ताईंनी, हीच ती अदृश्य शक्ती हे अवश्य समजून घ्यावं. देव, देश आणि धर्माच्या रक्षणासाठी जगण्याचा वारसा, ज्यांना प्राप्त झाला आहे तो, आमचा भटके-विमुक्त समाज बांधव जागृत झाला आणि आपल्या बहुमूल्य मतांचे भरभरून दान युतीच्या पारड्यात टाकलं. आम्ही केवळ घेणारे नाही, देणारेही आहोत, हेच मुळात आमच्या या समाजबांधवांनी दाखवून दिले हे वास्तव आहे. महायुतीच्या या अतिप्रचंड विजयात, आमच्या भटके विमुक्त समाज बांधवांचा खारीचा वाटा आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रात अभूतपूर्व यश विद्यमान सरकारला मिळालं, त्यात विविध योजनांचा झालेला लाभ, सुशासन आणि धर्म रक्षणासाठी कटिबद्ध असणार सरकार ही मूळ भावना होती असं वाटतं. आज एक है तो सेफ है हा नारा धार्मिक वाटत असला तरी विविध पक्षांच्या मतदारांनी आपली मतं अधिकृत उमेदवारांनाच देऊन, वरील नारा किती समर्पक होता, हेच दाखवून दिलं आहे.

**श्रीकांत तिजारे**/९४२३३८३९६६

### लाडक्या बहिणींनी उचलून धरले

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पीछेहाटीनंतर महायुतीने त्या निकालाचे आत्मपरीक्षण करून त्यातील चुका आणि उणिवा दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. याउलट महाविकास आघाडी लोकसभेच्या यशाने हुरळून गेली. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही आपल्याला सहानुभूती मिळेल या भ्रमात महाविकास आघाडीचे नेते राहिले त्यामुळे त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर महायुती खडबडून जागी झाली आणि त्यांनी अनेक लोकाभिमुख योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक होती. ही योजना महायुतीसाठी गेमचेंजर ठरेल असा अंदाज होता आणि तो खरा ठरला. यावेळी महिला मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या. महिला मतदारांची टक्केवारी पाच टक्क्यांनी वाढली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पदरात भरभरून मतांचे दान टाकले कदाचित त्यामुळेच महायुतीला इतका विराट विजय मिळवता आला. राज्यातील महिला मतदारांनी महायुतीला तारलेच नाही तर अक्षरशः उचलून धरले या सर्वांचा परिपाक म्हणजे महायुतीला मिळालेले हे घवघवीत यश.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## निधन वृत्त...

### केरबा क्षीरसागर



**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**
केरबा यशवंत क्षीरसागर (४६, रा. बार्शी) यांचे गुरूवार २६ नोव्हेंबर २०२४ रोजी हदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार भाऊ, एक बहिण असा परिवार आहे. ते बी.पी. सुलाखे महाविद्यालय, बार्शी येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांच्यावर मंगळवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

### चंद्रकांत ढेपे



**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**
बाळे येथील प्रतिष्ठित नागरिक व महाराष्ट्र शासनाच्या भूमी अभिलेख खात्यातील भूमापक पदावरून सेवानिवृत्त झालेले चंद्रकांत बाळाराम ढेपे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बाळेगावातील स्मशानभूमीत आज बुधवार, दिनांक २७ रोजी संध्याकाळी ५ वाजता अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा, मुली, सुना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे.

### रमेश इरकुल



**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**
गोदूताई विडी घरकुल कुंभारी येथील रहिवासी रमेश इरकुल (वय ४२) यांचे आकस्मिक निधन झाले आहे. आज दि.२६ नोव्हेंबर रोजी पहाटे ४ वाजता आज सकाळी ११ वा त्यांच्या पार्थिवावर शांती धाम, अक्कलकोट रोड पाणी टाकी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

### सरुबाई मदने



**पिलीव, दि. २६ नोव्हेंबर -**
माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील सरुबाई रामचंद्र मदने यांचे वयाच्या १०५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, सात मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर कुसमोड येथे राहत्या घराजवळ शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना कॉपीराईटबद्दल कोर्टाचे समन्स

**खाशाबा जाधव चित्रपट वाद**

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**पुणे, दि.२६ नोव्हेंबर-**
प्रसिध्द दिग्दर्शक नागराज मंजुळे यांचा खाशाबा जाधव हा आगामी चित्रपट प्रदर्शनापूर्वीच वाताच्या भौऱ्यात सापडला आहे भारताचे पहिले ऑलिम्पिक पदक विजेता खाशाबा जाधव यांच्या जीवनावर आधारित असलेल्या या चित्रपटाची कथा आपण लिहिलेल्या पुस्तकातून घेण्यात आली असल्याचा दावा लेखक संजय दुधाणे यांनी केला आहे. कॉपीराईट केल्याबद्दल त्यांनी न्यायालयात दाखल केला असून कोर्टाने नागराज मंजुळे यांच्यासह सर्व संबंधिता विरोधात समन्स बजावला आहे.

दुधाणे यांची मंजुळे यांच्यासह जिओ स्टुडियो, आटपाट प्रोडक्शन, निर्माती ज्योती देशपांडे यांच्या विरोधात पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात दावा दाखल केला आहे. याबाबत न्यायालयाने दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्यासह सर्वांना समन्स पाठवले आहे. खाशाबा जाधव यांच्या चरित्र पुस्तकाचे हक्क २००१ पासून संजय दुधाणे यांच्याकडे आहेत. भारत सरकारच्या कॉफी राईट कार्यालयाचे प्रमाणपत्रही दुधाणे यांच्याकडे आहे. चित्रपटाच्या निर्मिती व प्रदर्शन करण्यास निरंतर मनाई व ठरावासाठी दुधाणे यांच्याकडून ॲड. रविंद्र शिंदे व ॲड. सुवर्णा शिंदे यांनी पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात दावा दाखल केला आहे. याबाबत जातीने हजर रहाण्याचे समन्स न्यायालयाने दिग्दर्शक नागराज मंजुळे व ज्योती देशपांडे यांना पाठवले आहेत.

गेल्या चार वर्षांत स्वतः नागराज मंजुळे यांच्यासोबत २ बैठक तर त्याच्या वकिलांसोबत २ समझोता बैठक अश्या एकूण ४ बैठकीत निर्णय न झाल्याने अखेर लेखक संजय दुधाणे यांनी कॉफीराईट कायद्याचा भंग झाल्याचा दावा दाखल केला आहे. पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाने समन्स पाठवून नागराज मंजुळे, निर्माती ज्योती देशपांडे, जिओ स्टुडियो व आटपाट प्रोडक्शन यांना आपली बाजू मांडण्यासाठी समन्स पाठविण्यात आले आहे.





खाशाबा चित्रपटाची मूळ कथा लेखक संजय दुधाणे यांची असताना नागराज मंजुळे यांनी रणजीत जाधव यांच्याशी बेकायदेशीर करार केल्याने हा वाद निर्माण झाला आहे. कोरोनापूर्वी २०१९ मध्ये दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी चित्रपटाबाबत खाशाबा जाधव यांचे पुत्र रणजीत जाधव यांच्याशी करार केला होता. मूळात रणजीत जाधव यांनीच ३० ऑगस्ट २०१३ रोजी कराड येथे पत्रकार परिषद घेऊन खाशाबांच्या चित्रपटाची कथा ही संजय दुधाणे यांची असल्याचे घोषित केले होते. आता रणजीत जाधव यांनी दुधाणे यांना डावलून संमती करार केल्याने हा वाद निमर्ाण झाला आहे. ही बाब लेखक संजय दुधाणे यांच्या लक्षात येताच त्यांनी मंजुळे यांची २०२० मध्ये खाशाबा जाधव यांचे पुत्र रणजीत जाधव यांच्यासोबत पुणे भेट घेतली होती. त्यावेळी वाईमधील पट कथालेखक तेजपाल वाघही उपस्थित होते. चर्चेत लेखक म्हणून तुमचे नाव दिले जाईल व रणजीत जाधव यांच्याप्रमाणेच सम ान वाटा देऊन तुमचा मान राखला जाईल, असा शब्द नागराज मंजुळे यांनी दिला होता. रणजीत जाधव यांनी या प्रस्तावाला होकार दिला होता. पुण्यातील बैठकीनंतर सकारात्मक प्रतिसाद न आल्याने २६ डिसेंबर मध्ये संजय दुधाणे यांनी नागराज मंजुळे यांना नोटिस पाठवली. कथालेखकाच्या वादामुळे मी चित्रपट करणार नाही असे मंजुळे यांनी रणजीत जाधव यांना कळवले होते. त्यानंतर ५ जानेवारी २०२३ रोजी रणजीत जाधव यांनी त्यांच्या व नागराज मंजुळे यांच्या वकिलांसोबत दुधाणे यांची पुणे येथे भेट घेऊन सहकार्य करण्याची विनंती केली होती.

### अमरसिंग डाळवाले यांचे निधन



**पिलीव, दि. २६ नोव्हेंबर-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील अमरसिंग भगवान डाळवाले यांचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, सून, नातवंडे असा परिवार आहे.


## CHANGE IN NAME

I HERE BY DECLARE THAT MY OLD NAME **RUPESH PUNDLIK SONKAMBALE** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **RUPESH PUNDLIK SONKAMBLE** KINDALY NOTE THE SAME.
**AFFI NO. 55110**
**DATE : 22/10/2024**

## जाहीर निवेदन

आम्हाला कळविण्यास आनंद होतो की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय; भारत सरकार, नवी दिल्ली, यांच्या दि. 21/11/2024 रोजीच्या पत्र.क्र. EC24B2412MH5855730N द्वारे मे. रेलिकॉन फार्मास्युटिकल्स् प्रायव्हेट लिमिटेड, यांच्या प्लॉट नं. बी-107, चिंचोली एम.आय.डी.सी., तालुका-मोहोळ, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र येथील प्रस्तावित हाय-टेक अमाईन उत्पादन क्षमता 2280.1 मेट्रिक टन प्रति माह प्रकल्पास 'पर्यावरण मंजुरी' मिळाली आहे. संबधित कागदपत्रांच्या प्रती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कारखाना आणि पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**http://parivesh.nic.in**

**मे. रेलिकॉन फार्मास्युटिकल्स् प्रायव्हेट लिमिटेड करीता**
**सही/- कार्यकारी संचालक**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज कं. ३३/२०२४
निशाण क. -७

### मोहोळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

**१) सौ. यशोदा सुभाष शिंदे,**
वय - ५८ वर्षे, धंदा शेती,
रा. वाघोली, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
**२) काशिबाई उर्फ लक्ष्मी शंकर डोंगरे,**
वय ४९ वर्षे, धंदा घरकाम,
रा. सिध्दार्थ नगर, कोपरी कॉलनी,
गोकूळधाम शेजारी, आऊट हाऊस, ठाणे. **- अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही - सामनेवाला**

ज्याअर्थी हणमंत कृष्णा जाधव (वडर) यांचे दि. २१/०८/२०१५ रोजी निधन झाले असून त्यास अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. हणमंत कृष्णा जाधव (वडर) याचे मृत्यूपश्चात त्याचे वारस म्हणून त्याचे मालकीच्या मिळकतीस वारस नोंद करण्यासाठी आपले नावे वारसप्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार यांचे हक्कात सदरचे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वतः अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून अर्जदार यास रीतसर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दि. १२/११/२०२४

**सही/-**
**लिपीक**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क. स्तर, मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण

सिव्हील एम. ए. नं. ३१/२०२४
निशाण क. -६

### अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात

**१) श्रीमती विद्या मोहन मोरे**
रा. लक्ष्मी मार्केट शेजारी, जुना अडत बाजार, अक्कलकोट
**२) रोहीत मोहन मोरे**
रा. लक्ष्मी मार्केट शेजारी, जुना अडत बाजार, अक्कलकोट
**३) जान्हवी मोहन मोरे**
रा. लक्ष्मी मार्केट शेजारी, जुना अडत बाजार, अक्कलकोट **-अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही - सामनेवाल**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३१/२०२४ हा दि. बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे हेअरशिप सर्टीफिकेट मिळणेसाठी दाखल केला असून अर्जदार १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ चे वडील मोहन शिवाजी मोरे यांचा मृत्यू ता. ०३/०७/२०२३ रोजी झाला आहे. अर्जदार हेच मयत मोहन शिवाजी मोरे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत हेअरशीप सर्टीफिकेट मिळावे म्हणून यातील अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत मोहन शिवाजी मोरे यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक ०४/०१/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे, कोर्टातर्फे देण्यात येईल,

आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने हे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. २५/११/२०२४

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय अक्कलकोट**

## Classifieds

**पाहिजेत**
डॉक्टरांच्या घरी, घरगुती कामासाठी गरीब होतकरु अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. भेटण्याची वेळः- ९-५/६
फोन नं : ७०२०१४८४२६
८६५२७५१९०२

**पाहिजेत**
अकलूज येथे आयुर्वेदिक कारखाना व नर्सरीत (शेती) काम करणारे जोडपे पाहिजेत. पगार २० हजार ते २६ हजार महिना. जोडीला
संपर्क : ९८९०१४३४३२

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## जाहिर पब्लिकेशन

बदल अर्ज क्र. १५९२/२४
किरकोळ अर्ज क्र. १५९३/२४

### सोलापूर येथील मे. धर्मादाय उपआयुक्त साहेब / सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब यांच्या न्यायालयात

श्री विरशैव विकास मंडळ, सोलापूर रजि नं. एफ ८६४ सोलापूर या संस्थेचे पत्यात, उद्देशात, घटना नियम नियमावली वाढ व बदल करण्या बाबत घटना दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे. अर्जदार **श्री. दयानंद मन्मथप्पा वारद** यांनी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय येथे दाखल केलेले आहे. सदर संस्थेच्या पत्यात, उद्देशात, घटना नियम नियमावली मध्ये बदल व वाढ करण्यात आले आहे. सदर प्रकरणामध्ये कुणालाही कुठल्याही विश्वस्तांना किंवा सभासदांना जर हरकत घ्यायचे असेल त्यांनी सदरची जाहिर पब्लिकेशन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसाच्या आत स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत सदर अर्जास उत्तर देणे कामी मे. कार्यालयात हजर व्हावे अन्यथा सदरचे मे. कार्यालय हे वर नमुद संस्थेचे संस्थेच्या पत्यात, उद्देशात, घटना नियम नियमावली मध्ये बदल व वाढ बाबतचे प्रकरण एकतर्फा चालवुन सदरचा अर्ज निकाली काढतील. त्यानंतर कोणतेही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. हे जाहिर पब्लिकेशन केले ता. २५/११/२०२७

(शिक्का)

**सही/-**
**(एस.एस. कुमठेकर)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सोलापूर विभाग, सोलापूर**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः बाळे, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील जनतेस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील मौजे बाळे येथील सर्व्हे नं. १८/२/१ पैकी प्लॉट नं. ११ याचे एकूण क्षेत्र १११.४८ चौ.मी. यांसी बांधकाम क्षेत्र २३.०० चौ.मी. यासी चतुःसिमा :- पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - सर्व्हे नं. १८/अे चे क्षेत्र, दक्षिणेस - प्लॉट नं. १२, उत्तरेस प्लॉट नं. १० येणेप्रमाणे चतुःसिमेतील दगड, माती व वहिवाटीचे इजमेंट हक्कासह तसेच इतर तदंगभूत वस्तुसहची मिळकत.

वर नमूद मिळकत ही सौ. अंजली राजेंद्र बाड्गंडी यांनी दि. २४/०९/२००९ रोजी नोंदणीकृत दस्त क. ६३४८/२००९ अन्वये खरेदी केलेली असुन त्यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असुन त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना योग्य तो मोबदला स्विकारुन कायम खुष खरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलांकडून इसारापोटी रक्कम स्विकारुन वर नमूद मिळकतीबाबत आमचे अशिलांच्या हक्कात इसारापावतीचा दस्त दि. २५/११/२०२४ रोजी सोलापूर येथील पब्लिक नोटरी यांचेसमोर साक्षीदारांसमक्ष लिहून दिला आहे. त्याअनुषंगाने वर नमूद मिळकत ही निर्वेध, बिनबोजाची व निजोखमी असल्याबाबत सदरहू मिळकतीचे मालकांनी आमचे अशिलास खात्री व हमी दिलेली आहे. तरी परंतू सदर मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, लिज, बक्षीस, वारसाहक्क, कोर्ट प्रकरण वा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसांच्या आंत लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत अगर तक्रार खालील नमूद पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाची ही कसल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार न आल्यास आमचे अशिल सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. २६/११/२०२४.

**सही/-**
**ॲड. आकाश बी. निकम,**
**बी.ए., एलएल.बी.**
**रा. ब्लॉक न. १०१/१०२, कित्तुर चन्नमा नगर,**
**सैफुल, विजापूर रोड, सोलापूर**
**मो नं. ९५६११०६२५९/ ८६६८२८३१४७**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट.**

## जाहीर नोटीस / समन्स

रे.मु.नं.१००/२०१२

### मे.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, बार्शी यांचे न्यायालयात

**तानाजी शाहु पवार - वादी**
विरुध्द
**शाहु दत्तात्रय पवार वगैरे ७ - प्रतिवादी**

प्रति,
**प्रतिवादी नं. ६- अंकुश सदाशिव वाघमारे, (मयत)**
वारस- नियोजित प्रतिवादी नं. ६अ) सलिल अंकुश वाघमारे,
६ब) सुधिर अंकुश वाघमारे,
६क) सचिन अंकुश वाघमारे,
सर्व रा. व्हनकळस प्लॉट अलिपूर रोड बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
-- यांसी

ज्याअर्थी, यातील वादी तानाजी शाहु पवार यांनी हल्लीचा दावा रे.मु.नं. १००/२०१२ हा प्रतिवादी नं. ६ अंकुश सदाशिव वाघमारे व इतर यांचे विरुध्द डिक्लेरेशन व वाटपासाठी आणलेला आहे. प्रतिवादी नं. ६ हे मयत झाल्यानंतर वारस रेकॉर्डवर घेणेसाठी अर्ज केलेला असुन त्या अर्जावर नियोजित प्रतिवादी नं. ६ अ) ब) व क) यांना नोटीस काढण्याचे आदेश झालेले आहेत. त्याअर्थी, वर नमुद नियोजित प्रतिवादी नं. ६ अ), ब), व क) यांना याद्वारे जाहीर नोटीस / समन्स देण्यात येते की, नियोजित प्रतिवादी नं. ६ अ), ब), व क) हे वर नमुद ठिकाणी अगर जेथे कोठे असतील त्यांनी या जाहीर नोटीस / समन्सची दखल घेवुन या दाव्याकामी सदर जाहीर नोटीस / समन्स प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमलेली तारीख दि. ०६/०१/२०२५ रोजी दाव्याकामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा स्वतः अगर विधिज्ञांमार्फत समक्ष हजर राहुन वारस अर्जावर म्हणणे द्यावे, तसेच दाव्यात कागदपत्रानिशी त्यांनी त्यांची कैफियत, म्हणणे अगर हरकत द्यावी. सदर विहित मुदतीमध्ये नियोजित प्रतिवादी नं. ६ अ), ब), व क) हजर न झालेस अथवा त्यांनी त्यांचे म्हणणे, कैफियत सादर न केल्यास त्यांचे विरुध्द वारस अर्जाची, दाव्याची एकतर्फी चौकशी होवुन त्यांचे अपरोक्ष वारस अर्जाचा व दाव्याचा गुणदोषावर निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी. कळावे. हे जाहीर नोटीस / समन्स दिले ता. १८/११/२०२४

**सही/-**
**क. लिपीक**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**व. स्तर बार्शी**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्ताचे जाहिर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर ही संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक २०/१०/२०२२ रोजी मागणी नोटीस कर्जदार गंगाधर भीमाशंकर ढंगापुरे चे प्रो.प्रा श्री गंगाधर भीमाशंकर ढंगापुरे रा.१०२क/७५ब/२, भवानी पेठ, सोलापूर व जामिनदार १) श्री अविनाश मनोहर बनसोडे रा. ३५, मंत्रीचंडक अंगण, हैद्राबाद रोड, सोलापूर, २) श्री नागेश बसवंत म्हेत्रे रा. बी ११३, मंत्रीचंडक अंगण, हैदराबाद रोड, सोलापूर व ३) श्री संगमेश्वर सिद्राम कलशेट्टी रा- ४,५,६ सग्गम नगर, मुळेगांव रोड, विडी घरकूल, सोलापूर यांना पाठवून रक्कम रूपये ४५,३६,०४९.०९/- या वर दिनांक ०१/१०/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे १५% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कम ची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीर रित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमे पोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जहिर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परिस्थीती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

| अं. क्र. | कर्जदाराचे व जामीनदार यांचे नाव व पत्ता | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत | कर्ज रक्कम बाकी दिनांक ३१/१०/२०२४ अखेर | लिलाव तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार - गंगाधर भीमाशंकर ढंगापुरे चे प्रो.प्रा श्री गंगाधर** भीमाशंकर ढंगापुरे रा.१०२क/७५ब/२, भवानी पेठ, सोलापूर **जामिनदार १) श्री अविनाश मनोहर बनसोडे** रा. ३५, मंत्री चंडक अंगण, हैद्राबाद रोड, सोलापूर, | सोलापूर महानगरपलिका हद्दीतील रविवार पेठ येथील फायनल प्लॉट नं ९२/ए/२/३/१६ क्षेत्र २४१.९० चौ मी व त्यावरील १२५.८५ चौ मी आर.सी.सी असलेली बांधकामा ची मिळकत. | ७७,५४,७००/- | ६४,१६,६७३/- | ०२/०१/२०२५ व वेळ सकाळी ११.३० वाजता |
| २ | **२) श्री नागेश बसवंत म्हेत्रे** रा. बी ११३, मंत्री चंडक अंगण, हैद्राबाद रोड, सोलापूर व **३) श्री संगमेश्वर सिद्राम कलशेट्टी** रा- ४,५,६ सग्गम नगर, मुळेगांव रोड, विडी घरकूल, सोलापूर | सोलापूर महानगरपलिका हद्दीतील रविवारपेठ येथील फायनल प्लॉट नं ९२/ए/२/३/१७ क्षेत्र २४७.०० चौ मी व त्यावरील २६.९५ चौ मी पत्रा शेड असलेली बांधकामा ची मिळकत. | ३३,९२,४००/- | | |

**लिलावाचे ठिकान व वेळ : श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि सोलापूर**
**मुख्य शाखा - ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर**
**वेळ - सकाळी ११:३० वाजता**

**टिप-**
१. लिलावात भाग घेणाऱ्यांना बयाणा रक्कम रु १,००,०००/- (अक्षरी एक लाख रूपये फक्त) लिलाव सुरू होण्यापुर्वी भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
२. लिलावाच्या शर्ती व अर्टी लिलावाच्या दिवशी लिलावापुर्वी वाचून दाखविण्यात येथील आणि त्या बँकेच्या सूचनापत्रकामध्य दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकवाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा..

**दिनांक : २७/११/२०२४**
**स्थळ : सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

X10/5516-Rec/SRFESI/2024-25 Date: 25.11.2024

### मागणी सूचना

खालील कर्जदारांनी आमच्या शाखेतून कर्ज घेतले ज्यासाठी त्यांनी विविध कागदपत्रांची अंमलबजावणी केली. त्यांनी आमच्या बँकेच्या बाजूने सुरक्षा व्याज निर्माण करून मालमत्ता गहाण ठेवल्या आहेत. कर्जदारांनी मुद्दल, व्याज इत्यादीचे हप्ते भरण्यात चूक केली आहे आणि खाते NP झाले आहे. सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेट्स ॲन्ड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 च्या 13 (2) अंतर्गत डिमांड नोटीस खालील कर्जदारांना 60 दिवसांच्या आत रक्कम अदा करण्यासाठी पाठवली आहे आणि म्हणून कर्जदारांना या मार्गाने अंतिम मागणी केली आहे. खाली तपशीलवार देय रक्कम भरण्यासाठी प्रकाशन.

| अ.क्र. | कर्जदार / जामीनदारांचे नाव शाखा - फलठन गल्ली | नोटीस तारीख आणि दावा रक्कम | सुरक्षित मालमत्तेचा तपशील | कर्जाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | **A/c क्रमांक: 60417279969** **कर्जदार** **1.M/s बालाजी ॲग्रो इंडस्ट्रीज** **प्रोप श्री. पद्माकर माधवराव पाटील** पत्ता: प्लॉट क्रमांक F-98, चिंचोली औद्योगिक क्षेत्र, चिंचोली, तालुका- मोहाळ, जिल्हा- सोलापूर **2.जमीनदार** **श्री.आशिष पद्माकरराव पाटोदेकर** पत्ता: शनि मंदिर 204A दक्षिण कसबा दत्त चौक सोलापूर. मंजूरी रक्कम: -रु. 4,75,00,000/- (रु. चार कोटी पंचाहत्तर लाख फक्त) CERSI मालमत्ता आयडी: 200065425500 200063677050 | दि. 16/11/2024- रु. 4,99,98,091.00 (रु. चार कोटी नव्याण्णव लाख अठ्याण्णव हजार एक्याण्णव रुपये) | 1. प्लांट आणि मशिनरी, इलेक्ट्रिकल आयटम, डीजी सेट आणि बँक फायनान्समधून खरेदी केलेल्या इतर फिक्स्चरवर हायपोथेकेशन. 2. प्लॉट क्रमांक F-98, चिंचोली औद्योगिक क्षेत्र, चिंचोली, तालुका- मोहाळ, जिल्हा- सोलापूर येथे स्थित प्लॉट क्रमांक १००० चौरस मीटर येथे असलेल्या कारखान्याची जमीन आणि इमारतीचे न्याय्य तारण. पूर्वेकडे सीमा- भूखंड क्रमांक F-99 दक्षिणेकडे- MIDC रोड पश्चिमेकडे- प्लॉट नं. F-97 उत्तर दिशेने- जड क्रमांक 18 | ATL- MKSY- |

वरील कर्जदारांना याद्वारे सूचित केले जाते की, SRFESI कायदा, 2002 च्या तरतुदींनुसार अधिकृत अधिकारी ताबा घेतील आणि नंतर गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा/सुरक्षित मालमत्तेचा लिलाव करतील आणि वरील नमूद थकबाकी असल्यास तुमच्याकडे कोणताही सहारा न घेता बँकेकडे उपलब्ध असलेल्या इतर कायदेशीर कारवाई सुरू करतील. नोटीसच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत बँकेच्या समाधानासाठी पैसे दिले जात नाहीत. तुम्हाला कलम 13(13) अंतर्गत विक्री, भाडेपट्टी किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्तेद्वारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदीकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात आले आहे.

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 25/11/2024**

**सही/- मुख्य व्यवस्थापक अधिकृत अधिकारी**
**ARC, बँक ऑफ महाराष्ट्र-सोलापूर.**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

### नियम - 8 (1)
### ताबा सूचना

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अन्वये बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि कलम 13 च्या उप-कलम (१२) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करत आहेत. सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, 2002, डिमांड नोटिस जारी केली 27/06/2024 खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि जामीनदारांना नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचे आवाहन.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारणपणे सार्वजनिक आहे की खाली स्वाक्षरीने येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा भौतिक ताबा घेतला आहे. कायद्याच्या कलम 13 च्या पोटकलम (4) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना खाली नियम 8 बरोबर वाचले 19.11.2024 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002.

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार येथे नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- तुळजापूर** **कर्जदार - श्री. सचिन दत्ता भोसले** पत्ता: फॅक्टरी मु.- वडगाव लाख, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथील गट क्रमांक 186, कार्यालयाचा पत्ता- शिवछत्रपती नगर, तुळजापूर 413601. | **1. सचिन दत्ता भोसले,** शिवछत्रपती नगर, तुळजापूर, 413601 येथे वनस्पती आणि यंत्रसामग्रीचे हायपोथेकेशन 2. सिंदफळ, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथील गट क्रमांक 178 मधील प्लॉट क्रमांक 02, 03, 07 मधील मालमत्तेवर नोंदणीकृत गहाण ठेवून शुल्क आकारणे. भूखंड क्रमांक २,३ च्या खालील सीमा:- जमिनीचे ते सर्व तुकडे आणि पार्सल नोंदणी जि. उस्मानाबाद उप-जिल्हा सिंदफळ गावात आहे. तुळजापूर भूखंड क्रमांक 2, 326.00 चौ. गट क्र. 178 चा माउंट्स आणि बेअरिंग भाग खालीलप्रमाणे बांधलेला आहे- पूर्व:- गट क्र. 178. दक्षिण :-प्लॉट क्रमांक 4 पश्चिम:- 12. मीटर. रस्ता उत्तर :- भूखंड क्रमांक 1 प्लॉट क्र.7 च्या हद्दी, गट क्र. 178, एकूण क्षेत्रफळ -227.12 चौ.मीटर :- पूर्व :- गट क्रमांक 178, दक्षिण :- खुली जागा, पश्चिम :- 09 मीटर रस्ता, उत्तर :- भूखंड क्रमांक 6 मालमत्तेचे मालक सचिन दत्ता भोसले. | **मागणी सूचना:** दि. 27/06/2024 रु.25,84,980.43 पंचवीस लाख चौऱ्याऐंशी हजार नऊशे ऐंशी रुपये आणि त्रेचाळीस पैसे) तसेच पुढील व्याजासह 12.20% मासिक विश्रांती फॉर्म 27.06.2024 कर्जाची वसुली होईपर्यंत भौतिक ताबा तारीख: 19.11.2024. |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 26/11/2024**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

## महत्त्वाचे

### सात्त्विक -चिरागची सय्यद मोदी स्पर्धेतून माघार



**लखनौ :** भारताची वलयांकित पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी मंगळवारी सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेतून माघार घेतली. माजी जागतिक क्रमवारीतील एक जोडी येथे विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानली जात होती परंतु सात्त्विकला दुखापत झाल्याने त्यांना स्पर्धेतून माघार घ्यावी लागली. खांद्याच्या दुखापतीमुळे पॅरिस ऑलिम्पिकनंतर सात्त्विक बराच काळ स्पर्धेपासून दूर राहिला. त्याने गेल्या आठवड्यात चायना मास्टर्स सुपर ७५० स्पर्धेत पुनरागमन केले आणि उपांत्य फेरी गाठली. चायना मास्टर्सपूर्वी भारतीय जोडीला प्रशिक्षण देत असलेले बी सुमित रेड्डी म्हणाले की, सात्त्विकला पूर्णपणे सावरण्यात अडचण येत आहे. सात्त्विक नुकताच दुखापतीतून सावरत आहे. बऱ्याच दिवसांनी ते एकत्र खेळत आहेत. शेन्झेनमध्ये उपांत्य फेरीपर्यंत त्याला मोहिमेत विश्रांती घेण्याची संधी मिळाली नाही, असे सुमित रेड्डी म्हणाले.

### गुकेशची दुसऱ्या गेममध्ये लिरेनसोबत बरोबरी

**सिंगापूर :** भारतीय ग्रँडमास्टर डी. गुकेशने मंगळवारी येथे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या दुसऱ्या गेममध्ये गतविजेत्या डिंग लिरेनसोबत बरोबरी साधली. याआधी सोमवारी गुकेशला १४ सामन्यांच्या पहिल्या सामन्यात पांढऱ्या सोंगट्यांसह खेळताना लिरेनकडून पराभव स्वीकारावा लागला होता. पहिला सामना जिंकणाऱ्या लिरेनकडे आता १.५-०.५ अशी आघाडी आहे. या स्पर्धेत , जो खेळाडू ७.५ गुणांपर्यंत पोहोचेल तो विजेता होईल. त्याची बक्षीस रक्कम २.५ दशलक्ष डॉलर्स आहे. अठरा वर्षांचा गुकेश हा जागतिक विजेतेपदाचा सर्वात तरुण दावेदार आहे आणि विश्वनाथन आनंदनंतर जेतेपद पटकावणारा तो पहिला भारतीय होण्याचा प्रयत्न करत आहे. आनंदने आपल्या शानदार कारकीर्दीत पाच वेळा हे विजेतेपद पटकावले आहे.

### 'पीएसपीबी इंटर-युनिट' स्पर्धेत बोपण्णा, नागलचा सहभाग



**पुणे :** येथील डेक्कन जिमखाना टेनिस कोर्टवर २७ ते ३० नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या ४३ व्या 'पीएसपीबी इंटर-युनिट' लॉन टेनिस स्पर्धेत रोहन बोपण्णा आणि सुमित नागल हे खेळाडू आकर्षण ठरणार आहेत. प्रार्थना ठोंबरे, अंकिता रैना, युकी भांब्री आणि विष्णू वर्धन यांसारखे अव्वल भारतीय खेळाडूही या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे आयोजित या स्पर्धेत १०० हून अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. यामध्ये खेळाडू इंडियन ऑईल, ऑईल ॲण्ड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लिमिटेड, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड, ऑईल इंडिया, नुमालीगड रिफायनरी लिमिटेड, इंजिनीयर्स इंडिया लिमिटेड, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि यजमान बीपीसीएल यांसारख्या प्रमुख तेल आणि वायू महामंडळांच्या संघांचे प्रतिनिधित्व करतील. या स्पर्धेत पुरुष, महिला आणि दिग्गज गटात वैयक्तिक आणि सांघिक स्पर्धा होतील. हे सामने आयटीएफच्या नियमानुसार खेळवले जातील.

### आशियाई महासंघाच्या निर्मितीस आयबीएचा पाठिंबा

**बँकॉक :** जागतिक बॉक्सिंग संघटनेने नव्याने स्थापन केलेल्या स्वतंत्र आशियाई बॉक्सिंग महासंघाच्या स्थापनेचे समर्थन केले आहे. बँकॉकमध्ये शनिवारी झालेल्या बैठकीत सध्याच्या आशियाई बॉक्सिंग कॉन्फेडरेशन (एएसबीसी) सदस्य फेडरेशनच्या बहुमताने (३६ पैकी २५) निलंबित आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग असोसिएशन (आयबीए) सोडून जागतिक बॉक्सिंगमध्ये सामील होण्याच्या विरोधात मतदान केल्यानंतर ही घोषणा करण्यात आली. या मतदानानंतर एएसबीसीचे अध्यक्ष पिचाई चुन्वाजीरा आणि सरचिटणीस अली सलामेह यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला. थायलंडच्या चुन्वाजिराने लवकरच जागतिक बॉक्सिंगच्या आश्रयाखाली एक नवीन आशियाई बॉक्सिंग प्रशासकीय मंडळ तयार करण्याची योजना सांगितली. जागतिक बॉक्सिंगने त्याच्या अधिकृत 'एक्स' खात्यावर आपला पाठिंबा व्यक्त केला. आम्ही आशियातील राष्ट्रीय महासंघांचा एक गट नवीन जागतिक बॉक्सिंग कॉन्फेडरेशन स्थापन करणार असल्याच्या बातमीचे स्वागत करतो. आम्ही थायलंड बॉक्सिंग असोसिएशनच्या पिचाई चुन्वाजिरा यांचे या विषयावर मजबूत नेतृत्व आणि ऑलिम्पिक बॉक्सिंगसाठी वचनबद्धतेबद्दल आभार मानतो, असे पोस्टमध्ये म्हटले आहे.

# आपण भविष्यात पुन्हा एकत्र येऊ

## दिल्ली कॅपिटल्स सह-मालकाचे पंतला भावुक पत्र




**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

दिल्ली कॅपिटल्सचे सहमालक पार्थ जिंदाल यांनी मंगळवारी ऋषभ पंतच्या संघापासून वेगळे झाल्याबद्दल दुःख व्यक्त केले आणि भविष्यात ते पुन्हा एकत्र येतील अशी आशाही व्यक्त केली.

आयपीएलच्या मेगा लिलावापूर्वी दिल्लीने कर्णधार पंतला सोडले होते. पंतला लखनौ सुपरजायंट्सने विक्रमी २७ कोटी रुपयांना विकत घेतले. दिल्लीनेही राईट टू मॅच वापरून पंतला परत घेण्याचा प्रयत्न केला पण लखनौच्या शेवटच्या बोलीशी बरोबरी साधता आली नाही.

जिंदाल यांनी 'एक्स'वर एक भावनिक पोस्ट लिहिली. त्यात ते म्हणाले, ऋषभ, तू माझा लहान भाऊ आहेस आणि नेहमीच राहशील. मी तुझ्यावर मनापासून प्रेम करतो. तू आनंदी आहेस आणि तुला माझ्या कुटुंबाप्रमाणे वागवण्याचा मी नेहमी प्रयत्न केला. जेएसडब्ल्यू स्पोर्ट्स आणि जीएमआर हे संघाचे सह-मालक आहेत. संघाशी मतभेद झाल्यानंतर पंतने लिलावात स्वतःचा समावेश केला.

जिंदाल म्हणाले, तुला जाताना पाहून वाईट वाटले आणि मी याबद्दल खूप भावुक झालो आहे. तू नेहमी दिल्ली कॅपिटल्सचा एक भाग राहतील आणि आशा आहे की एक दिवस आम्ही पुन्हा एकत्र असू. धन्यवाद ऋषभ. आम्ही तुमच्यावर नेहमीच प्रेम करू. दिल्ली कॅपिटल्सकडून हार्दिक शुभेच्छा, असेही पोस्टमध्ये नमूद केले आहे

दिल्ली कॅपिटल्सने कुलदीप यादव, अक्षर पटेल, ट्रिस्टन स्टब्स आणि अभिषेक पोरेल यांना कायम ठेवले. संघाने पुन्हा जेक फ्रेझर मॅकगर्कला ९ कोटी रुपयांना खरेदी केले तर केएल राहुलवर १४ कोटी रुपये खर्च केले. (वृत्तसंस्था)

# आत्मविश्वासाने भरलेल्या भारताचा सामना आज थायलंडशी

### ज्युनियर पुरुष आशिया चषक हॉकी

**मस्कत (ओमान), २६ नोव्हेंबर**

प्रशिक्षक पीआर श्रीजेश यांच्या कुशल प्रशिक्षणात तयार झालेला आणि आत्मविश्वासाने भरलेला भारतीय संघ बुधवारी ज्युनियर आशिया चषक पुरुष हॉकी स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात थायलंडविरुद्ध खेळेल.

कोरिया, जपान, चायनीज तैपेई आणि थायलंडसह भारताला अ गटात स्थान देण्यात आले आहे. या स्पर्धेत दहा संघ सहभागी होत आहेत. उर्वरित पाकिस्तान, मलेशिया, बांगलादेश, ओमान आणि चीन हे पाच संघ ब गटात आहेत.

भारताने २००४, २००८, २०१५ आणि २०२३ मध्ये विक्रमी



चार वेळा विजेतेपद पटकावले आहे. गेल्या वर्षी अंतिम फेरीत भारताने परंपरागत प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा २-१ गोलने पराभव केला.

कर्णधार आमिर म्हणाला, आमचा संघ कठोर परिश्रम करत आहे आणि आम्हाला चांगल्या कामगिरीचा विश्वास आहे. थायलंड, जपान आणि कोरियासारख्या बलाढ्य संघांशी खेळणे आव्हानात्मक असेल पण आम्ही आमची सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न करू. जेतेपद कायम राखून देशाचे नाव उंच करू, असे आमिर म्हणाला.

भारताचा सामना २८ नोव्हेंबरला जपानशी आणि ३० नोव्हेंबरला चायनीज तैपेईशी होणार आहे. भारताचा शेवटचा गट सामना १ डिसेंबरला कोरियाशी होणार आहे.

प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ ३ डिसेंबर रोजी उपांत्य फेरी खेळतील. एक दिवसानंतर अंतिम सामना होईल. (वृत्तसंस्था)

# हॉकीपटू अशोक कुमार यांची प्रकृती स्थिर

**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

माजी भारतीय हॉकीपटू आणि मेजर ध्यानचंद यांचे पुत्र अशोक कुमार यांची शहरातील रुग्णालयात ॲन्जिओप्लास्टी करण्यात आली. आता त्यांची प्रकृती स्थिर आहे, अशी माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी मंगळवारी दिली.

सोमवारी त्यांची अँजिओग्राफी करण्यात आली. अशोक कुमार यांना रविवारी छातीत दुखू लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. एस्कॉर्ट्स हॉस्पिटलमध्ये त्यांची यशस्वी अँजिओप्लास्टी करण्यात आली. त्याच्या धमनीत ब्लॉकेज आढळल्याने डॉक्टरांनी काही स्टेंट टाकले आहेत. त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. दोन-तीन दिवसांत त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात येईल, असे डॉक्टरांनी सांगितले.

अशोक कुमार हे १९७५ मध्ये क्वालालम्पूर येथे विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचे सदस्य होते. त्यांनी पाकिस्तानविरुद्ध विजयी गोल केला. म्युनिक ऑलिम्पिक १९७२ मध्ये कांस्यपदक विजेत्या संघातही ते होते. ७४ वर्षीय अशोक कुमार यांना १९७४ मध्ये अर्जुन पुरस्कार मिळाला होता. या वर्षी हॉकी इंडियाने त्यांना मेजर ध्यानचंद जीवनगौरव पुरस्कारने सन्मानित केले होते. (वृत्तसंस्था)



न्यूझीलंड विरुद्ध इंग्लंड यांच्यात कसोटी मालिकेतील पहिला सामना ख्राईस्टचर्च येथील हॅगले ओव्हल मैदानावर होणार आहे. यावेळी मिही व्हाकाटू येथे इंग्लंडच्या संघाचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी होंगी सादर करताना इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स.

# अत्याधुनिक सुविधायुक्त शूटिंग रेंजचे उद्घाटन

**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी मंगळवारी येथील रोहिणी येथील नॅशनल कॅडेट कॉर्प्स (एनसीसी) इमारतीत भूमिगत शूटिंग रेंजचे उद्घाटन केले.

या सुविधेमध्ये अत्याधुनिक 'टार्गेट सिस्टम' असलेली आधुनिक उपकरणे असतील आणि ती वर्षभर चोवीस तास कार्यरत राहतील. या सुविधेमुळे कॅडेट्सना सराव करण्याची आणि त्यांचे कौशल्य वाढवण्याची सतत संधी मिळेल, असे मुख्यमंत्री आतिशी यांनी कार्यक्रमादरम्यान सांगितले.

मनू भाकरसारख्या ऑलिम्पिकपटूंचा उल्लेख करताना मुख्यमंत्री आतिशी म्हणाल्या, मला आशा आहे की पुढील ऑलिम्पिक पदक आमच्या नॅशनल कॅडेट कॉर्प्स कॅडेट्स जिंकतील.

इच्छुक खेळाडूंना भेडसावणाऱ्या आव्हानांवर प्रकाश टाकताना त्या म्हणाल्या, क्रीडा प्रशिक्षण हे बहुतांशी महागडे असते आणि बरेच लोक ते घेऊ शकत नाहीत. असे अनेक हुशार तरुण आहेत ज्यांचे पालक व्यावसायिक प्रशिक्षण घेऊ शकत नाहीत.

या सुविधेमुळे दिल्लीच्या खेळाडूंना, विशेषतः ज्यांना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो, त्यांना त्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी दर्जेदार प्रशिक्षण घेता येईल, असे आतिशी यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# कोल्हापूरच्या मुले व मुली संघाची विजयी सलामी

### कुमार व मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**अलिगड, दि.२६ नोव्हेंबर -**

अलिगड (उत्तर प्रदेश) येथील महाराणी अहिल्यादेवी होळकर क्रीडांगणावर सुरू असलेल्या ४३व्या कुमार व मुली राष्ट्रीय अजिंक्य स्पर्धेत मंगळवारी दुसऱ्या दिवशी कोल्हापूरच्या मुले व मुली संघाने विजयी सलामी दिली.

मुलांच्या गटात झारखंड, तेलंगणा, हरियाणा गुजरात संघाने विजयाची नोंद केली. केरळ संघाला मध्य भारतकडून पराभवाचा धक्का बसला. मुलींच्या गटात ओरिसा, पश्चिम बंगाल तामिळनाडू, कर्नाटक आणि झारखंड संघाने गटातील आपले सामने जिंकले.मुलींच्या गटात कोल्हापूर संघाने गटातील दुसरा सामना खेळताना गोवा संघाचा ६०-८ असा एक डाव ५२ गुणांनी धुव्वा उडवला. कोल्हापूर संघाकडून श्रावणी लक्ष्मण ३.१०, संगीता फाळे ३.१०, तनिष्का तुरंबेकर नाबाद २.४०, अमृता नाईक नाबाद ३.०० संरक्षण केले तर अमृता पाटीलने आक्रमनामध्ये दहा गुणांची कमाई केली.मुलांच्या गटात कोल्हापूरने मणिपूरवर ३६-१२ असा विजय संपादन केला. कोल्हापूर संघाकडून शुभम मकोटे, विकास देशमाने, अंकुश देशमाने, राजू पाटील, उदय पाडाळकर, प्रेमनाथचंद्र पुढे यांनी संरक्षण करून विजय संपादन केला. केरळ संघाला मध्य भारतने पराभवाचा धक्का देताना ४१-३७ असा विजय संपादन केला. मध्य भारत संघाकडून ऋषिकेश हिरवे याने अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करत विजयात मोलाचा वाटा उचलला. केरळ संघाकडून



हिमाचल प्रदेश विरुद्ध हरियाना या मुलींच्या मॅटवरील सामन्याचा टिपलेला क्षण.



# राष्ट्रीय स्पर्धेसाठी शिवलीला स्पोर्ट्स कराटे अकॅडमीच्या २५ कराटेपटूंची निवड

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

ओकिनावा मार्शल आर्ट्स कराटे इंटरनॅशनलच्या वतीने पुणे बालेवाडी येथे २७ व्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी शिवलीला स्पोर्ट्स कराटे अकॅडमीच्या २५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

त्यांना शिवशरण वाणीपरीट, सहाय्यक प्रशिक्षिका स्मिता वाणीपरीट यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली.

**निवडलेले :** जयराज नवले, यशराज नवले, धनराज नवले, प्रथमेश कदम, रणवीर बर्गंडे, समर्थ माने, हर्ष कैडकी, सोहम पवार, पियुष भोसले, कबीर भोसले, युग भोसले, स्वराज भोसले, सार्थक पवार, आदित्य कदम, काव्या जगताप, शौर्य शेलार, अपूर्वा घुले, जयश्री कौडकी, वैदही नवले, अनन्या यावलकर, धनश्री मुंदडगी, मयूर मुंदडगी, प्रसाद सलगर, समर्थ लोकरे, अक्षता स्वामी, समृद्धी वाणी परीट.




# वेलानी व्हिक्टोरिया संघास विजेतेपद

### गुजराती प्रिमीयर लीग क्रिकेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

वेलानी व्हिक्टोरियासने गुजराती प्रिमीयर लीग क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळ संचलित युवा फोरम आयोजित आठवी स्पर्धा रेल्वेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात झाली. अंतिम सामन्यात वेलानी व्हिक्टोरियस ने प्रथम फलंदाजी घेत ३ बाद ११८ची धावसंख्या चा आवाहन ठेवले. रॉयल स्ट्रायकर ने त्यात उत्तर देताना २ बाद ९५ धावसंख्या केली. वेलानी व्हिक्टोरियासनी हा सामना २३ धावांनी जिंकला प्रथम विजेत्यास स्व. हार्दिक पटेल यांच्या स्मरणार्थ ट्रॉफी व श्री राधेश्याम इंटरप्राईजेस यांच्यातर्फे रोख ११००० बक्षीस देण्यात आले. तर उपविजेता संघ रॉयल स्ट्रायकर ना ट्रॉफी व रू.७००० रोख माधू परिवार यांच्यातर्फे देण्यात आले. बक्षीस वितरण अध्यक्ष मुकेश मेहता, हरेश पटेल, उपाध्यक्ष श्री मनीकांत दंड, खजिनदार चिमन पटेल, सचिव जयेश पटेल, श्री कांतीभाई पटेल, संदीप जव्हेरी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवा फोरम चे सचिव पार्थ दावडा यांनी केले व आभार युवा फोरम अध्यक्ष चंद्रेश माधू यांनी केले. प्रायोजकत्व वेलानी पेट्रोलियमने केले होते. मॅन ऑफ द सिरीज रविश राडिया, बेस्ट बॉलर भविन देढोया, बेस्ट फिल्डर महेश पटेल यांना मिळाले. इतर लीग मॅचेसमध्ये पीयूष पटेल, दिव पटेल, सुनील पटेल, हरेश पटेल, विवेक वेलानी यांनी मॅन ऑफ द मॅचचे पारितोषिक मिळविले.

# सिद्धेश्वर प्रशालेचा ओम पाठक किक बॉक्सिंग स्पर्धेत अजिंक्य

### राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेतही कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

शालेय शहर किक बॉक्सिंग स्पर्धेत श्री सिद्धेश्वर देवस्थान संचलित सिद्धेश्वर प्रशालेतील किक बॉक्सिंग या स्पर्धेत ओम रामचंद्र पाठक याने १७ वर्षे वयोगटात ६० किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकाविला असून त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच नितीन सोमशेखर भोगडे याने तायक्वांदो स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात ५२ किलो वजन गटात तृतीय क्रमांक मिळविला. त्यांना क्रीडा मार्गदर्शक परमेश्वर बेडगे, दादासाहेब म्हमाणे, नागनाथ कोरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, सदस्य भिमाशंकर



पटणे, गुरूराज माळगे, मल्लिनाथ कळके, डॉ. राजशेखर येळीकर, प्रा. सी. बी. नाडगौडा, प्रा. गंगाधर कुमठेकर, मुख्याध्यापक संतोष पाटील, उपमुख्याध्यापक राजकुमार उंबरजे, पर्यवेक्षक श्री.विनोद बिराजदार यांनी अभिनंदन केले.

रेनबो आर्टस सेंटर ऑल इंडिया आर्ट कॉम्पिटिशन गुजरात तर्फे घेण्यात आलेल्या नॅशनल लेवल चित्रकला स्पर्धेत सिद्धेश्वर प्रशालेतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या १०७ विद्यार्थ्यांपैकी १२ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर उज्वल यश संपादन केले. त्यांनी ११ सुवर्ण पदक आणि एक रौप्य पदक प्राप्त झाले असून उर्वरित सहभागी विद्यार्थ्यांना विशेष प्रमाणपत्राने गौरविण्यात आलेसर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे प्रशालेचे कलाशिक्षक श्री प्रशांत बिलगुंदी यांचे मार्गदर्शन लाभले.

**कामगिरी केलेले विद्यार्थी :**
**सुवर्ण :** श्रीरंग येदुर, विरेश गसने, नितीन कसबे, वीर बंकापूर, गौरव शिंदे, ध्रुव कोकाटे, सतेज जुजगार, ओंकार मणुरे, लक्ष्मीकांत दासरी, शशिकांत दासरी, अक्षता अचलेर.
**रौप्य :** शरणेश्वर येदुर



# महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत सिंहगड इन्स्टिट्यूटच्या तिघांना रौप्य पदक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात झालेल्या आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संस्कृती केशेट्टीवार (७५ किलो वजनी गटात), पंकज शिंदे (६७ ते ७१ वजनी गट), पवन चव्हाण (४८ ते ५१ वजनी गट) या तिघांनी रौप्य पदक पटकावले. त्यांना क्रीडा शिक्षक प्रशांत जाधव आणि क्रीडा समन्वयक डॉ. करीम मुजावर यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांचा संस्था सहसचिव संजय नवले यांच्या हस्ते सत्कार केला. या यशाबद्दल संस्था सचिव संजय नवले आणि प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे यांनी या संघाचे कौतुक करुन सन्मान केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## संक्षिप्त वृत्त



### वखारिया विद्यालयात संविधान दिन साजरा

**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर-**

येथील श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालय उपळे दुमाला येथे आज मंगळवारी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती तवले यांनी संविधान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक आर.आर. लंकेश्वर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कु.पूनम जुनवनकर या विद्यार्थीनीने संविधान उद्देशिकेचे वाचन केले. याच वेळी २६/११ च्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना ही भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.



### भारताची संविधान हे भारतीय लोकशाहीचा आत्मा : प्रा. शंकर व्हनमाने

**अक्कलकोट, दि. २६ नोव्हेंबर-**

भारताची संविधान हे भारतीय लोकशाहीचे आत्मा असून त्याप्रमाणे आपली वाटचाल सर्वांनी करावी, असे आव्हाहन प्राचार्य शंकर व्हनमाने यांनी केली. नागणसुर येथील एच, जी, प्रचंडे माध्य व उच्च माध्यमिक प्रशालेत संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जेष्ठ प्राध्यापक इरण्णा धानशेट्टी होते.याप्रसंगी कु,अंजली धानशेट्टी, कु,सौदर्या माशाळकर यांनी म नोगत व्यक्त केली. प्रा,चिदानंद मठपती, प्रा,सूर्यकांत कडबगावकर, यांनी संविधानाचे महत्व पटवून दिले. यावेळी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते, व्यासपीठावर, सौ. सुनीता बंदिछोडे, संजयकुमार गंगदे, प्राध्यापक प्रशांत नागुरे, बसवराज कोळी,बसवराज धानशेट्टी, शरनू मणूरे, वृषाली सोनटक्के, बेबी प्रचंडे, चन्नवीर कल्याण आदी मान्यवर उपस्थित होते, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रमिला शिवगुंडे, अजय पाटील, थावरू चव्हाण, माणिक किनगी, सागर पोतदार, विश्वनाथ तळवार, आदींनी परिश्रम घेतले तर सर्व उपस्थितांचे आभार प्रा,अनिल इंगळे यांनी मानले.



### सार्वजनिक वाचनालयात संविधान दिन साजरा

**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर-**

येथील सार्वजनिक वाचनालय येथे संविधान दिन व २६/११ रोजी भ्याड आतंकवादी हल्लयात शहीद झालेल्या वीरांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली आणि नंतर संविधान दिनाचे वाचन संस्थेच्या सहकार्यवाह सौ. पद्मजा काळे यांनी केले. यावेळी संस्थेचे सदस्य श्री सुधाकर कांबळे, ग्रंथपाल आशिष चौधरी, सहा. ग्रंथपाल सचिन यादव, लिपिक गिरिजा काळे, सभासद, वाचक उपस्थित होते.



अक्कलकोट : मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेत माजी विद्यार्थ्यांच्या देणगीतुन पावणे चारलाख रूपयाचा ८ किलो व्हॅट सौर यंत्रणा कार्यान्वित उद्घाटन प्रसंगी मान्यवर विलासराव देशमुख, दीपक देशमुख, योगेश पवार, डॉ.मनोहर मोरे आदी.

# शहाजी प्रशालेत माजी विद्यार्थ्यांच्या देणगीतून पावणेचार लाख रूपयांची ८ किलो व्हॅट सौरयंत्रणा कार्यान्वीत

## कृतीतून कृतज्ञता व्यक्त करा, हाच संदेश अक्कलकोटच्या स्वामी समर्थांचाही : विलासराव देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.२६ नोव्हेंबर,**

आपण जगात वावरत असताना आपल्या कृतीतुन कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. हाच संदेश अक्कलकोट स्वामी समर्थांचा असून तो तुम्ही पाळा. आई, वडिल, शाळा हे चांगल्या संस्कारासाठी मार्गदर्शन करतात आणि या सर्वाप्रती कृतज्ञता बाळगा असे आवाहन मराठा मंदिर संस्थेचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख यांनी केले.

मंगळवारी दि.२६ नोव्हेंबर रोजी अक्कलकोट येथील मराठा मंदिर श्री शहाजी प्रशाला येथे १९६६ बँचचे माजी विद्यार्थी अमेरिका स्थित विलास राजपालराव जाधव यांनी पावणे चारलाख रूपयाचा ८ किलो व्हॅट सौर यंत्रणा भेट दिली. यावेळी मराठा मंदिर संस्थेचे सरचिटणीस दीपक देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आला.या वेळी अध्यक्षपदावरून विलासराव देशमुख हे बोलत होते.प्रारंभी संविधान प्रत, २६/११ तील शहिद व श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत व प्रास्तविक उपमुख्याध्यापक एस.व्ही. भागरे यांनी केले. यावेळी मराठा मंदिर विद्यावर्धिनीचे अध्यक्ष योगेश पवार, १९६६ बँचचे प्रतिनिधी डॉ.मनोहर मोरे, सौर यंत्रणा तंत्रज्ञ सतीश शिंदे, निमंत्रित बी.व्ही. निंबाळकर, मुख्याध्यापक एस. एन.शिंदे,पर्यवेक्षक आर. एस.पडवळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. विद्यावर्धिनी अध्यक्ष योगेश पवार यांनी म्हणाले तुम्ही मोठे झाला की संस्था आपोआप मोठी होईल. एकेकाळी रॉकेलच्या दिव्याच्या प्रकाशाखाली अभ्यास करणारा विद्यार्थी आज अमेरिकेत आहे हे संस्थेसाठी अभिमानाची गोष्ट आहे.तुम्ही अशा लोकांचा आदर्श घ्या. हा सौर प्रकल्प विद्यार्थीसाठी एक प्रात्यक्षिक शिक्षणाचे स्त्रोत आहे. कशी सौर उर्जा बनते त्याची माहिती विद्यार्थ्यांना देता येईल. सुत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुग वाय. पी. कबाडे यांनी केले तर आभार पर्यवेक्षक आर. एस.पडवळकर यांनी केले.



# जवाहर विद्यालयात संविधान दिन साजरा

**अणदूर, दि. २६ नोव्हेंबर-**

जवाहर विद्यालय,अणदूर येथे ' भारतीय संविधान दिन ' साजरा करण्यात आला. विद्यालयात सामुदायिक संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. अणदूर विद्यानगरीमध्ये संविधान प्रभातफेरी काढण्यात आली.

प्रभातफेरीत भारतीय संविधान दिनाचा विजय असो, भारत माझी माऊली-संविधान त्याची सावली, संविधानाचा सन्मान-हाच आमचा अभिमान, लोकशाहीचे देते भान-भारतीय संविधान, संविधानाने दिला मान-स्त्री पुरूष एकसमान अशा घोषणांनी गाव दुमदुमून गेला.यावेळी अणदूर विद्यानगरीतील चावडी, महादेव गल्ली, आण्णा चौक येथे संविधानाचे महत्व व उद्देशिकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले.संविधान दिनानिमित्त विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक धम्मदिप गायकवाड, सारिका वरडे, ज्योती चौधरी तसेच जेष्ठ शिक्षक गुलाब सय्यद यांनी संविधान निर्मिती, संविधानाचे महत्व,संविधान किती महत्त्वाचे आहे,या वर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी जेष्ठ शिक्षक किरण गायकवाड,सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. संविधान दिन साजरा करण्यासाठी विद्यालयातील एन.सी.सी.प्रमुख मकरंद पाटील,क्रीडा शिक्षक जयहिंद पवार,ठाकरू राठोड,सर्व एन.सी.सी.विद्यार्थी कॅडेट्स यांनी परिश्रम घेतले.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार रोहित मोरे यांनी केले.

# तरुणांनी उद्योग व्यवसायाकडे वळावे

## डॉ. संतोष काळे; ब्राह्मण महासंघातर्फे सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर**

नोकरीच्या साचेबंद चाकोरीत आपली प्राप्ती मर्यादित राहते. त्याऐवजी थोडे धाडस करुन उद्योग व्यवसायाची कास धरली तर आर्थिक सुबत्तेचे आकाश खुले होते. सध्याची सामाजिक परिस्थिती पाहता ब्राह्मण समाजातील तरुणांनी नोकरीच्या नादी न लागता उद्योग व्यवसायाकडे वळावे. समाजातील गरजू घटकांना आमच्याकडून आम्ही सर्व प्रकारची मदत करण्यास आम्ही तयार आहोत, असे उद्गार अमेरिकेत गेली दोन तपे कन्सल्टंट फिजिशियन म्हणून कार्यरत असलेले बार्शीचे सुपुत्र डॉ. संतोष काळे यांनी काढले. ब्राह्मण महासंघातर्फे आयोजित सत्कार सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी त्यांचा व त्यांच्या भगिनी, स्वरसंपदा म्युझिक अकॅडमी पुण्याच्या संचालिका संपदा मकरंद वाळवेकर (काळे) यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी बार्शीतील प्रसिद्ध विधीज्ञ अॅड. अच्युत देशपांडे हे होते. प्रारंभी भगवान परशुराम व ग्रामदैवत श्री भगवंत यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. संपदा वाळवेकर यांनी गायलेल्या 'हीच आमची प्रार्थना' या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ. ना.पा. देशपांडे यांनी संस्कृत भारतीच्या उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर समाजातील जेष्ठ नागरिक प्रभाकर समुद्रे व रघुनाथ कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. समारोप डॉ. संतोष व संपदा यांनी गायलेल्या 'अभी ना जाओ छोडकर' या सुरेल द्वंद्वगीताने झाला. कार्यक्रमाचे काव्यमय व शैलीदार निवेदन मुकुंदराज कुलकर्णी यांनी केले.

सूत्रसंचालन व्यंकटेश कुलकर्णी यांनी केले. यावेळी व्यासपीठावर तालुकाध्यक्ष दिनकर सापनाईकर, शहराध्यक्ष महेश कुलकर्णी, ऋता देशपांडे आदी मान्यवर होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुकुंद कुलकर्णी निरमावाले, सुधीर टाकसाळे, भरतरी कुलकर्णी, पांडुरंग कुलकर्णी, लक्ष्मीकांत कुलकर्णी, स्वप्ना केसकर, प्रविणा देशपांडे, सारिका कुलकर्णी, गौरी पाटील, अमिता कुलकर्णी, सुरेखा तारकुंडे यांनी परिश्रम घेतले.

# माळशिरस वकिल संघटनेमार्फत संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सदाशिवनगर, दि.२६ नोव्हेंबर-**

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त माळशिरस वकिल संघटनेच्या वतीने माळशिरस न्यायालयातील वकील संघाच्या कार्यालयामध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमावेळी वकील संघटनेच्या अध्यक्षा अॅड. मोहिनी देव, उपाध्यक्ष अॅड. राहुल लवटे, ज्येष्ठ विधिन्य अॅड. माधव मिराजदार , अॅड. एस बी पाटील, अॅड. डी एन काळे, ड.आर एस वाघमोडे ,अॅड. जी पी कदम आदी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व भारतीय संविधानाच्या प्रतीचे पूजन करण्यात आले. व सामुदायिक संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना अॅड. सुयश सावंत व अॅड. वैभव धाईंजे यांनी संविधानाचे मूल्य, जोपासना व संविधानाच्या साक्षरतेच्या गरजे वरती भाष्य करून वक्तृत्व सदर केले. प्रस्ताविक अॅड. भारत गोरवे यांनी केले. सूत्रसंचालन अॅड. सुमित सावंत यांनी केले.

# मंगळवेढा बसस्थानकावर चोरीच्या प्रमाणात दिवसेंदिवस होतेय वाढ

**मंगळवेढा दि.२६ नोव्हेंबर**

मंगळवेढा, सोलापूर एस.टी.बस मध्ये चढत असताना दोन महिलांचे पर्स मधील पैसे चोरीला गेल्याने मंगळवेढा आगाराची एस.टी.बस पोलीस स्टेशनला आणण्यात आली. दरम्यान पोलीसांनी बस मधील प्रवाशांची तपासणी करुनही चोरटा न सापडल्यामुळे चोरटा मात्र मोकाटच राहिला आहे. दरम्यान बस स्थानकावर चोरीच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे चित्र असून आत्तापर्यंत पोलीसांना एकाही चोरीचा तपास लागला नसल्याने चोरट्यांचे फावत आहे.

मंगळवेढा बसस्थानकावर मंगळवेढा-सोलापूर एम.एच.१४ बी.टी.२१५१ ही सोलापूरकडे जाण्यासाठी दुपारी १२.३० वाजता लागल्यानंतर प्रवाशी संख्या जास्त असल्याने बसमध्ये महिला प्रवाशी चढत असताना या संधीचा चोरट्यांनी फायदा घेतला. यामध्ये सारीका दिपक बनसोडे (रा.मरवडे) ही महिला सोलापूरला वाढदिवसाला निघाली असताना चक्क चोरट्याने तिच्या पर्समधील रोख रक्कम,पॅन कार्ड,आधार कार्ड आदी हातोहात काढून घेतले. तसेच दुसरी महिला प्रवाशी सुरेखा चंदनशिवे (रा.मंगळवेढा) ही मंगळवेढ्यावरुन कामतीला जाण्यासाठी निघाली असता या प्रवाशी महिलेच्या पर्समधून रोख रक्कम चोरट्याने पळविल्यामुळे



पोलीस स्टेशन आवारात चोरीचा शोध घेण्यासाठी आणलेली बस.

पुढील प्रवास पैशाविना कसा करायचा? असा प्रश्न तिच्यापुढे उभा होता. या दोन महिलांच्या तक्रारीवरुन दि.२४ रोजी १२.३० वाजता प्रवाशासह बस मंगळवेढा पोलीस ठाणे आवारात आणण्यात आली. ठाणे अंमलदार पोलीस हवालदार बसवराज कोष्टी यांनी बसमधील संपूर्ण प्रवाशी चेक केले मात्र चोरटा सापडलाच नाही. परिणामी चोरटा मात्र सहीसलामत राहिला असून याचा त्रास मात्र प्रवाशांना सोसावा लागला. याबाबत पोलीसात तक्रारीची नोंद न करता एस.टी.बस मार्गस्थ झाली. यापुर्वीही गौरीलक्ष्मी सणा दरम्यान चक्क एका पोलीस कर्मचार्याच्या पत्नीच्या दागिन्याची पर्स बेलाटी गावाकडे जाण्यासाठी बस मध्ये चढत असताना चोरट्याने पळविल्याचा प्रकार घडला होता. जवळपास तीन लाखाचे दागिने चोरीला गेले होते. याची फिर्याद सदर महिलेने पोलीसात दिली असून पोलीसांना पोलीस पत्नीच्या दागिन्याचा तपास लागत नसल्याने सर्वसामान्य लोकांच्या चोरीचा तपास कसा लागणार? असा प्रश्न नागरिकामधून केला जात आहे.

त्याचबरोबर सलगर खुर्द हून मुंबईला निघालेल्या एका विवाहित तरुणीचा ९० हजार रुपये किंमतीचा मोबाईल मंगळवेढा बसस्थानकावर बसमध्ये चढत असताना चोरीला गेला. याची नोंद होवूनही जवळपास आठ महिन्याचा कालावधी उलटूनही त्याचा तपास पोलीसांना लागेना. या बसस्थानकावरील चोरीचा तपास एकाच पोलीसाकडे असल्याने चोरटा सापडेल की नाही याबाबत तर्क वितर्क नागरिक काढत आहेत. त्यामुळे चोरीचा तपास देताना पोलीस अधिकार्यांनी तपासाचे ज्याचेकडे कौशल्य आहे अशा पोलीस कर्मचाऱ्याकडेच तपास द्यावा, निष्क्रिय पोलीसाकडे तपास देवून उपयोग होणार नसल्याच्या प्रतिक्रीया व्यक्त होत होत्या.

# परिश्रमी कॅप्टन ...

**दखल**
**रघुनाथ पांडे**

> कॅप्टनने महाधिवेशनात सळसळती घोषणा दिली. स्थळ होते, पुण्याचे बालेवाडी स्टेडियम. या तो हम जीतते हैं, या सीखते है! कॅप्टन प्रत्येक अर्जाला नमन करत त्यावर सही करायचा. उमेदवारी अर्जासोबत या कॅप्टनची सही असलेला एबी फॉर्म जोडला जायचा.

**खरं तर ही एक देवदुर्लभ गोष्ट आहे. सामान्य कार्यकर्त्याला प्रेरणा देणारी. जिचे तात्पर्य आहे: संयम, निष्ठा, अविश्रांत कष्ट, सूक्ष्म राजकीय मांडणी आणि अभूतपूर्व समर्पण! या गोष्टीचे कॅप्टन आहेत चंद्रशेखर बावनकुळे हे विशेषण नव्हे, तर सन्मान आहे. आणि, तो दिलाय सतत त्यांच्या पाठीशी उभे राहणारे लोकनेते देवेंद्र फडणवीस यांनी.**

२०१९च्या विधानसभा निवडणुकीत गोष्टीची सुरुवात होते. मंत्री म्हणून रेकॉर्डब्रेक कामगिरी केल्यावरही भाजपाने त्यांना उमेदवारी नाकारली. सामाजिक जीवनाला विलक्षण कलाटणी देणारा हा राजकीय आघात होता. मनाला खिळखिळा करणाऱ्या या धूर्त क्षणाला अव्हेरत हा कॅप्टन संयम ठेवून वागला. म्हणाला, भारतीय जनता पार्टीला जे वाटले तो निर्णय घेतला; पार्टी माझी आई आहे, ही भावना कायम राहील. काळाच्या कसोटीवर उत्तरे सोडून दिवस पुढे निघाले.

कॅप्टन शांत.. कर्तव्यपथावर अग्रेसर, उत्तरे मिळू लागली, पार्टीने प्रदेश सरचिटणीस केले. यासोबतीने त्यांच्यावर भारतीय जनता युवा मोर्चा प्रभारी म्हणून जबाबदारी दिली. त्यांनी युवा मोर्चा सक्रिय केला. राज्य पिंजून काढले. लाखो तरुण जोडले. आंदोलने सुरू झाली. महाविकास आघाडीला हैराण करून सोडले. लोकांच्या प्रश्नांवर आंदोलने करून त्यांनी जीवाचे रान केले. सक्रिय सहभाग हाच त्यांचा पिंड. विजेच्या चपळाईने त्यांनी प्रवास केला. तरुणाईच्या मनात आत्मविश्वास निर्माण करत राजकीय पकड मजबूत केली. कोरोनाच्या भयंकर काळात ते मदतीसाठी पुढे होते.

ते नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदासंघातून आमदार झाले. दुसरा अध्याय सुरू झाला. सोपविलेल्या जबाबदारीचा बारकाईने अभ्यास करून पार्टीसाठी अचूक व्यूहरचना आखण्यासाठी ते दिवसरात्र झटू लागले. त्यांचे हेच वैशिष्ट्य केंद्रीय नेतृत्वाने हेरले. संघटन जोपासणाऱ्याकडे पार्टी लक्ष ठेवून असते. झालेही तसेच. त्यांना उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत थेट मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या गोरखपूर मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी सोपविली गेली. योगी संपूर्ण उत्तरप्रदेश फिरत होते आणि हा कॅप्टन संपूर्ण गोरखपूर



पालथे घालत होता. भिंगरी लावल्यागत फिरला. गोरखपूर पिंजून काढले. तब्बल ५ हजार युवकांना त्याने निवडणूक वॉरिअर्स अशी ओळख देऊन त्या सर्वांनाच मी योगी.. असा कानमंत्र दिला. ते योगी होऊनच रिंगणात उतरले. दररोज संवाद साधला. त्यांना निवडणुकीच्या कामासाठी टिप्स दिल्या. योगी प्रचंड मतांनी विजयी झाले. सरकार आले! रामललाचे दर्शन घेऊन कॅप्टन परतला. पुन्हा कामाला भिडला. मग, ध्यानीमनी नसताना या गोष्टीचा तिसरा अध्याय सुरू होतो.

### २०२२ चा ऑगस्ट.!

कॅप्टन एक दिवस कार्यकर्त्यांसमवेत प्रवासावर असताना मोबाईल खणखणतो. बावनकुळेजी, नड्डाजी कॉल पर है.. आपसे बात करेंगे!!

प्रदेश अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारून गेली सव्वादोन वर्षे कॅप्टन पक्षबांधणीसाठी राज्यभर वणवण फिरला. अविश्रांत किती बैठका घेतल्या असतील? किती लोकांशी बोलला असेल? किती अवहेलना सहन केली असेल? विरोधक किती बेलगाम बोलले असतील पाचा काही हिशेबच नाही. नेकी कर, दर्या में डाल!! कोणी काही म्हणो आपण चालत राहायचे. थांबायचे नाही, हा शिरस्ता. तीनवेळा संपूर्ण महाराष्ट्र पालथा घातला. खेडोपाडी, तालुके, मोठी शहरे सर्वच ठिकाणी पार्टीचे जाळे विणले. मजबूत केले.

### २०२४... संपूर्ण वर्ष निवडणुकांचे

बावनकुळे राज्यभर फिरले, छोट्या सभा. बैठका आणि कार्यकर्त्यांच्या खांद्यावर हात. शाबासकी. देवदुर्लभ कार्यकर्ता हीच माझी शक्ती आहे, अशी पक्की धारणा असणारा हा कॅप्टन. त्यांना शेकडो वाढदिवस पाठ आहेत. त्यांना हजारो कार्यकर्त्यांची नावे माहिती आहेत. अमुक कार्यकर्त्याचे अमुक काम राहिले, म्हणून ते मनापासून पाठपुरावा करतात. दररोज शेकडो पत्रे लिहितात. दिवसभरात अनेकानेक फोनकॉल्स आणि दिवसभर ते रात्री झोपेपर्यंत किमान पाच-सहाशेवर मॅसेजेसला उत्तरे देणे. कुणा कार्यकत्यनि रील पाठवली, कुणी प्रवासाचा व्हिडीओ पाठवला की त्यांना सूचनेसह प्रतिसाद देण्याची विलक्षण हातोटी साधलेला किमयागार आहे. कार्यकत्र्यान कितीही सेल्फी घेतल्या तरी खांद्यावर हात ठेवून त्याची इच्छा पुरवणे आणि जेवला का, कुठे मुक्काम आहे, काही अडचण आहे का, कुणाला फोन करायचा का, असे कितीतरी प्रश्न विचारून, समस्या निकाली काढून कार्यकर्त्याचा समाधानी चेहरा बघणे हा दिनक्रम आहे. एरवी सकाळी आठ ते रात्री एक इतका प्रदीर्घ काळ त्यांचा अविरत जनसंपर्क चाललेला असतो. ते धकत नाहीत. रात्री ते वाचन करतात, लहानशा डायरीत दिवसभरातील महत्त्वाच्या आणि दुसऱ्या दिवसाच्या नोंदी करूनच त्यांचा दिवस संपतो. लोकसभा निवडणूक झाली. हताश न होता नव्या उमेदीने पुन्हा विधानसभेची तयारी सुरू झाली. पार्टीचे कार्यक्रम, अधिवेशने, नवीन योजना, फेरमांडणी, व्यूहरचना असे सगळे.

### २०२४ ऑक्टोबर महिना

व्यूहरचना, चाचपणी, रिपोर्टस, समीकरण, मॅन मॅनेजमेंट, सर्व्हे, राजी नाराजीचा बीमोड आणि प्रत्यक्ष निवडणूक. सकाळी सात ते पहाटे चार. सलग दीड-दोन महिने हाच दिनक्रम पहाटेचे तीन वाजलेले. उमेदवारी अर्ज भरण्याचे दिवस सुरू झाले. दिल्लीवरून उमेदवारांच्या नावांची यादी पायची. कॅप्टनची सही असलेला एबी फॉर्म जोडला जायचा. मग भाजपाची उमेदवारी पक्की व्हायची. कॅप्टनची डोक्याला फॉर्म लावून त्याला नमन करण्याची कृती महाविजयाची चुणूक दाखवत होती. ते बधत असताना मला, २०१९ ची काहूर माजवणारी घटना आठवत होती. नियती सतत संयमाची परीक्षा घेत असते. ज्याचे राजकीय आयुष्य संपल्यागत बोलले जायचे तोच कॅप्टन झाला. त्याच्या सहीने अनेकांचे भाग्य लिहिले गेले. महाराष्ट्राच्या इतिहासातील हा राजकीय चमत्कार आहे. दुर्मिळ घटना होती. भगवान शंकराचे एक नाव चंद्रशेखर आहे. शंकराने हलाहल पचविले आणि सृष्टीला नवजीवन मिळाले. असेच झालेही.

भारतीय जनता पार्टीने आज अभूतपूर्व यश संपादन केले. या यशात बावनकुळे यांचे अमर्याद कष्ट आहेत. हा कॅप्टन कर्तव्यकठोर आहे. आणि, देवेंद्र फडणवीसांच्या शब्दाबाहेर नाही. ऊर्जामंत्री असताना या कॅप्टनला भेटायला काही लोक आले. ते सगळे मुंबईपासून जवळच असलेल्या पण उजेडापासून दूर असलेल्या एलिफंटा लेणीचे होते. ही लेणी म्हणजे, जागतिक वारसा लाभलेल्या भारतातील १७ सौंदर्यस्थळांपैकी एक. पाठिकाणी स्वातंत्र्यानंतर ७० वर्षात प्रथमच वीज पोहोचवण्यास ऊर्जा विभाग यशस्वी झाला तो बावनकुळे यांच्या अभ्यासूवृत्तीने व कल्पकतेने.। देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना त्यांनी या बेटावर वीज पोहोचवण्याचा निश्चय केला आणि तेव्हाचे ऊर्जामंत्री असलेल्या या कॅप्टनने त्या दिशेने यशस्वी प्रयत्न केले.

समुद्राखाली सात किलोमीटर केबल टाकण्याचा पर्याय अंतिम झाला. या बेटावरील ९५० लोकांना वीजपुरवठा शक्य झाला. त्यांच्या घरात पहिल्यांदा जेव्हा दिवा झगमगला त्यावेळी त्यांना दिवाळी असल्याचे वाटले. असाच एक प्रसंग मेळघाटातील दुर्गम भागातील अनेक गावांत वीज पोचविण्याचा. प्रसिद्ध समाजसेवक डॉ. रवींद्र कोल्हे यांनी या कॅप्टनला पत्र लिहिले की, वन्य जनावरांच्या तावडीतून सुटकेसाठी तसेच मेळघाटातील गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वीज मिळावी. केवळ पाच ओळीचे ते पोस्टकार्ड होते. बावनकुळे यांनी आपली संपूर्ण यंत्रणा आदिवासी विभागात पाठवली. मेळघाटचा वीज पुरवठा प्लॅन तयार झाला. पण हा भाग इतका अरण्याने व्यापला आहे की, त्यातून वीजतारा नेण्यास वन व पर्यावरण विभाग राजी नाही, हे लक्षात आले. या उत्तराने हा कॅप्टन व्यथित झाला. स्वतः पाहणी दौरा केला आणि मेळघाटात मध्यप्रदेशातून वीज पुरवठा सुरू झाला, विजेचे जाळे विणले गेले. आजचा झगमगता मेळघाट हा बावनकुळे यांच्या अभ्यासाचे फलित आहे. हा कॅप्टन शांत, स्थिर आहे. पक्षनिष्ठेला हिमालयाची उंची देणारी, सर्व राजकारण्यांना व राजकारणात येऊ पाहणाऱ्यांसाठी ही एक बोधकथा आहे. म्हणूनच फडणवीसांनी आज त्यांचा कॅप्टन म्हणून सन्मान केला.

- ९८१८२१३५१५

**(लेखक प्रदेश भाजपाध्यक्षांचे माध्यम प्रमुख आहेत.)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### विवाहितेच्या छळप्रकरणी ९ जणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह ९ जणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सलीमा जावेत रूस्तुम (वय ३९, रा. प्रभाकर नगर, मजरेवाडी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती जावेद, चुलत दीर रफिक, जाऊ फरजाना, भावजय साजिदा शेख, भावजयची आई सायरा शेख, भावजयचे वडील अब्दुल रजा शेख, तिची बहिणी नुरजहां मुल्ला, भावजयचा भाऊ फय्याज शेख, सिमरन तांबोळी (सर्व रा. काजल नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ मार्च २०२० ते २५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सलीमा या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती जावेद व त्याच्या नातेवाईकांनी मिळून सलीमा यांना वेळोवेळी शिवीगाळ करणे, मारहाण करणे, जेवायला न देणे असे शारीरीक व मानसिक त्रास देत आर्थिक त्रास दिला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

### वेगवेगळ्या भागातून ४ महागड्या सायकलींची चोरी

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

शहरातील वेगवेगळ्या भागातून महागड्या चार सायकलींची चोरी करण्यात आली आहे. समर्थ पांडुरंग मगर (वय १९, रा. हगलूर, ता. उत्तर सोलापूर) याने १५ नोव्हेंबर रोजी दुपारी त्याची डिस्क ब्रेक असलेली ६ हजार ५०० रुपयांची सायकल ही आरकाल गार्डन शेजारी पार्क करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेली. तर दुसऱ्या घटनेत दयानंद सातलिंगप्पा कलशेट्टी (वय ४६, रा. गंगाधर नगर, अक्कलकोट, सोलापूर) यांनी त्यांची ६ हजार रुपये किंमतीची सायकल २६ जुलै रोजी पद्मा नगर येथे पार्क करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेली. तिसऱ्या घटनेत बसवराज रामण्णा गुरव (वय ४०, रा. रोशन शाळेजवळ, मल्लिकार्जुन नगर, सोलापूर) यांनी त्याची ६ हजार रुपये किंमतीची सायकल १६ नोव्हेंबर रोजी पद्मा नगर येथे पार्क करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेली. या तिन्ही घटनांबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर चौथ्या घटनेत अशपाक राजेसाहब जातकर (वय २५, रा. प्रियंका चौक, भवानी पेठ, सोलापूर) यांनी १३ नोव्हेंबर रोजी त्यांची ६ हजार ५०० रुपये किंमतीची सायकल घरासमोर पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत लक्ष्मी गंगाराम गायकवाड (वय २४, रा. सुशिल मराठी विद्यालयासमोर, लिमयेवाडी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती गंगाराम, सासू पार्वती, दीर राजू, नणंद पुष्पा जाधव, चुलत दीर भिमा गायकवाड (सर्व रा. संगमेश्वर नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ जून २०२४ ते १४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत लक्ष्मी या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती गंगाराम व त्याच्या घरातील लोकांनी मिळून लक्ष्मी हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण केली व शिवीगाळ केली. तसेच लक्ष्मी या कामावर गेल्यानंतर तिच्यावर पाळत ठेऊन नाहक त्रास दिला. नवी पेठ येथे कपडे खरेदीसाठी गेल्यानंतरही तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करून तिचा छळ केला. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार कुंभार पुढील तपास करीत आहेत.

### बाळीवेस चौकात कुत्र आडवे आल्याने दुचाकीस्वाराचा अपघात

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

शहरातील बाळीवेस चौकात कुत्र आडवे आल्याने दुचाकीस्वाराचा अपघात होऊन तो जखमी झाला. हुसेन जहांगीर शेख (वय ३६, रा. झोपडपट्टी नं. २, सोलापूर) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. हुसेन शेख हे २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारास पांजरापोळ चौक ते मधला मारूती या रस्त्याने दुचाकीवरून जात होते. त्यावेळी बाळीवेस चौकात दोन कुत्री अचानक आडवी आल्याने शेख यांच्या दुचाकीस अपघात झाल्याने शेख हे जखमी झाले. त्यांना उपचारसाठी शहाजहान शेख यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पतीसह तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी तिच्या पतीसह तिघांवर सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आलिया जाविद शेख (वय २३, रा. पोगुल मळा, रामवाडी, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. याबाबत मयत आलिया हिचे वडील अहमद मकबुल वालीकर (वय ४०, रा. तांडुर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पती जाविद कय्युम शेख (वय ३०), सासू रज्जू कय्युम शेख (वय ५०), नणंद रुबिना कय्युम शेख (वय ३३, सर्व रा. पोगुल मळा, रामवाडी) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मे २०२३ ते २५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत आलिया ही सासरी नांदत होती. सासरी पती जाविद, सासू व नणंदेने मिळून आलिया हिला लग्नात आई वडीलांनी चांगल्या प्रकारचे साहित्य दिले नाही, तसेच तुला मुलबाळ होत नाही असे म्हणून वारंवार शिवीगाळ करून हाताने मारहाण करून तिला त्रास दिला. या त्रासाला कंटाळून आलिया हिने २५ नोव्हेंबर रोजी राहत्या घरी आत्महत्या केली. त्यामुळे याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक खामकर पुढील तपास करीत आहेत.

# गहानदस्त करून एक कोटींचे कर्ज घेतले

**फसवणुकप्रकरणी निलकंठ बँकेच्या माजी व्यवस्थापकासह दोघांवर गुन्हा दखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

मजरेवाडी येथील जागेचे गहानदस्त करून एक कोटी रुपयांचे कर्ज घेऊन शासनाची व जागामालकाची फसवणुक केल्याप्रकरणी निलकंठ बँकेचे माजी व्यवस्थापकासह दोघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आफताब लतिफ कारिगर (वय ५२, रा. होटगी रोड, आसरा, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोहिद अय्युब शेख (वय ४०, रा. जोडभावी पेठ, सोलापूर) आणि निलकंठ बँकचे तत्कालीन व्यवस्थापक हरिष राधाकिसन सारडा (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आफताब कारीगर यांची मजरेवाडी येथील नविन सिटी सर्व्हे नं. १५०/१ब/१अ/३, नविन सिटी सर्व्हे नं. १५०/१ब/१अ/१/४ ही ४ हजार चौ. मी. जागा आहे. या जागेमधील पश्चिम कडील बाजूचे ०.३० आर म्हणजे ३००० चौ. मी. क्षेत्राची जागा, त्यापैकी ०.२५.३५ आर इतक्या क्षेत्राच्या जागेचे गहाणखत दस्त १० जानेवारी २०१३ रोजी सहायक दुय्यम निबंधक वर्ग २ यांच्या कार्यालयात तोहिद शेख याने केला. या गहाणखत दस्ताच्या मदतीने तोहिद शेख याने निलकंठ बँकचे तत्कालीन व्यवस्थापक हरिष सारडा यांच्याशी संगनमत करून तोहिद शेख याने १ कोटी रुपयांचे कर्ज घेतले. त्यानंतर तोहिद शेख व निलकंठ बँकेचे तत्काली व्यवस्थापक सारडा यांनी आफताब कारीगर यांची आई रहिमा कारीगर यांची तसेच शासनाची फसवणुक केल्याचे निदर्शनास आले. तसेच या मिळकतीपैकी ४.६५ आर ही मिळकत तोहिद शेख याने आदिल गोलंदाज यांना विक्रि करून मिळालेली रक्कम ही स्वतः वापरून ती जमिन हडप केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे पुढील तपास करीत आहेत.



सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात ६३वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा सुरु झाली. मंगळवारी सायंकाळी एका 'उत्तराची कहाणी श्रुती मंदीर' हे दोन अंकी नाटक सादर झाले. (छायाचित्र : केवल तिवारी)



# हिराचंद नेमचंद वाचनालयात संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

७५ व्या संविधान दिनानिमित्त श्री हिराचंद नेमचंद वाचनालयात संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन केले. यावेळी अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी संविधान हे देशाच्या प्रगतीचे व विकासाचे साधन आहे. राज्यघटनेत भारतातील विविध जातीजमातीतील विविध भाषिक लोकांना एकसंघ ठेवण्याची क्षमता आहे.

संविधानाच्या उद्देशिकेत भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान व मूलभूत मुल्ये वाचावयास मिळतात. प्रत्येक भारतीय नागरिकांने संविधान साक्षर होणे आवश्यक आहे असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमास उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत कामतकर कार्यवाह डॉ. नभा काकडे व मोहन सोहनी ग्रंथालय कर्मचारी, अभ्यासिकेतील विद्यार्थी व वाचक उपस्थित होते.

# 'ज्ञान प्रबोधिनी'त संविधानाबात जागरूकता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

अमृत महोत्सवी संविधान दिनाचे औचित्य साधून ज्ञान प्रबोधिनी प्रशालेमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुनीता चकोत यांनी संविधान निर्मितीचा इतिहास सांगितला. संविधान कोणी तयार केले, किती कालावधी लागला इ. तपशील विद्यार्थ्यांनी जाणून घेतले.

प्रशालेतील इतिहास अध्यापिका तृप्ती कंगळे यांनी संविधान निर्मितीची प्रक्रिया सांगितली. यावेळी विविध छायाचित्रांच्या



सहाय्याने विद्यार्थ्यांनी संविधानाचा घटनाक्रम समजून घेतला. यानंतर प्रशालेतील अग्रणी विद्यार्थिनीने सर्व विद्यार्थ्यांकडून संविधान उद्देशिकेचे वाचन करून घेतले. संविधानाचे आकारमान, त्यातील शब्द, वर्तमानपत्रामध्ये येणाऱ्या संविधानाबत बातम्या याबाबत अधिक जाणून घेण्याचे औत्सुक्य विद्यार्थ्यांनी दाखवले. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी संविधानाच्या प्रती देखील हाताळल्या. कार्यक्रमात ४८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



# 'सिंहगड'मध्ये संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

केगाव येथील एनबीएन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात मंगळवारी सकाळी संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. तसेच २६/११ मुंबईवर झालेल्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्यांना अभिवादन केले.

महाराष्ट्र शासनाच्या घर घर संविधान या उपक्रमानुसार इन्स्टिट्यूटमध्ये संविधानाचे सामूहिक वाचन केले. प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या हस्ते संविधानाच्या उद्देशिका प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले. उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर. टी. व्यवहारे यांनी भारतीय संविधानाबाबत संविधान निर्मिती, समिती, अनुच्छेद, विशेषता, कर्तव्ये यावर मार्गदर्शन केले. उद्देशिकेच्या प्रतिमा काढून प्रत्येकास वाचनास दिल्या. प्रत्येक विभागाच्या दर्शनी भागात उद्देशिकेच्या प्रतिमा लावल्या.

यावेळी प्रा. किरण पाटील, प्रा. एच टी गुरमे, डॉ. विनोद खरात, प्रा. प्रदीप तापकिरे, प्रा. कार्तिक शिरगण, प्रा. विजय बिरादार, प्रा. माणिक शिंदे, प्रा. शशिकांत हिप्परगी, प्रा. एस ए धनवे, प्रा. एस एस शाखापुरे, प्रा. करीम मुजावर, प्रा. ए डी रुईकर, प्रा. एल सी मैंदर्गी , प्रा. श्रीकांत जगताप, प्रा. यु. एस गटकुळ, डॉ. अमित कांबळे, प्रा. हीना मुलाणी, प्रा. निशांत नवले, प्रा. रुपाली चव्हाण, ग्रंथपाल विद्यानंद बाबर, जी. एच. गोगले आदी उपस्थित होते.





# जिल्हा कारागृह व लाईफलाईन वेल्फेअर सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा कारागृह व लाईफ लाईन वेल्फेअर सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशान्वये व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश सलमान आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली २६ नोव्हेंबर रोजी जिल्हा कारागृह येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यकमा प्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मो. सलमान आझमी यांचे हस्ते संविधान उद्देशिकेचे प्रतिमेस पुष्प अपर्ण करून कार्यक्रमाचे उद्धाटन करण्यात आले. तसेच उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयाचे सचिव उमेश देवर्षी, कारागृह अधिक्षक तांबोळी, लाईफ लाईन वेल्फेअर सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप तांबोरे आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यलोकअभिरक्षक श्रीमती स्नेहल राउत यांनी कारागृहातील सर्व कैद्यांना संविधान विषयी व कायदेविषयी मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी लाईफ लाईन वेलफेअर सोसायटीचे सदस्य श्रीमती मृणाल मोरे यांनी कारागृहातील कैद्यांना व्यसनाच्या दुष्परिणाम संदर्भात तसेच व्यसनमुक्ती उपचार आणि आनंदी मानसोपचार इत्यादी विषयी व्याख्यान व परिसंवादाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी समुपदेशक मानसोपचार तज्ञ, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते अशा विविध व्यक्तींचा समुह कारागृहात जनजागृती करणेकरीता उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करणेकरीता लोकअभिरक्षक कार्यालयाचे न्यायरक्षक श्रीमती देवयानी किणगी तसेच सर्व लोकअभिरक्षक कार्यालयाचे सर्व न्यायरक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी व कारागृहाचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### मंगल कार्यालयातून अडीच लाखांच्या दागिन्यांची चोरी

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

मोहोळ येथील पंढरपूर रस्त्यावरील श्रीराम मंगल कार्यालयातून महिलेचे अडीच लाख रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरट्याने चोरून नेले.

याबाबत प्रियंका उमाकांत शेजाळ (वय ३२, रा. देशमुख गल्ली, मोहोळ) या महिलेने दिलेल्या फिर्यादीवरुन मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ नोव्हेंबर रोजी प्रियंका शेजाळ या श्रीराम मंगल कार्यालय येथे लग्न कार्यासाठी आलेल्या होत्या. दुपारी साडेतीनच्या सुमारास मंगल कार्यालयातील सोफ्यावर शेजाळ यांनी त्यांची बँग ठेवली होती. ती बॅग चोरट्याने चोरून नेली. या बॅगेत प्रियंका शेजाळ यांचा सोन्याचा फॅन्सी राणीहार, कानातली सोन्याचे टॉप्स, गळ्यातील सोन्याचे टेम्पल नेकलेस, नाकातील सोन्याची नथ, चांदीचे पैंजण, करंड, रोख ३ हजार रुपये असा २ लाख ५४ हजार ३२० रुपयांचा ऐवज होता अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक केसरकर तपास करीत आहेत.

# शिक्षण विभागाने तयार केले जनजागृती स्टिकर

- **महिला व मुलींचे लैंगिक शोषण रोखण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचा उपक्रम**
- **शोषण विरोधात जनजागृती करण्याचे यूजीसीचे आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर -**

अंगणवाडीसह, प्राथमिक माध्यमिक शाळांसह, विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयीन विद्यार्थीनींसह, महिला कर्मचाऱ्यांवर अत्याचार, लैंगिक शोषण थांबविण्यासाठी १० डिसेंबरपर्यंत सर्वत्र सर्वत्र जनजागृती अभियान राबवण्यात येणार आहे. सोमवार (दि. २५) आंतरराष्ट्रीय महिला हिंसाचार निर्मूलन दिनापासून याची सुरुवात झाली आहे. प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये जनजागृतीचे जनजागृती फलक, हेल्पलाईन स्टीकर लावण्यात येत आहेत.

दरम्यान सहा महिन्यांपूर्वी बदलापूर (मुंबई) येथे एका शालेय विद्यार्थीनीवर अत्याचाराची दुर्घटना घडली. राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थीनी, महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर आला. त्यानंतर शासनाने विविध उपाययोजना राबवण्याचे आदेश दिले. पण, अनेक शाळा, महाविद्यालयांमध्ये मध्य अद्याप त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. दरम्यान महिला हिंसाचार निर्मूलन दिन पासून शाळा, विविध महाविद्यालयांमध्ये लैंगिक शोषण रोखण्यासाठी



जनजागृती पंधरावडा राबवण्यात येतोय.

घरगुती हिंसाचार कायदा, पोक्सो कायदा, भारतीय न्याय संहिता आणि लैंगिक हिंसाचार या कायद्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. त्याचबरोबर लैंगिक समानता, संमती, चांगला-वाईट स्पर्श, सुदृढ नातेसंबंध, महिलांच्या सन्मानाची जपणूक आणि आदर याबाबत जाणीव जागृती करण्यासाठी विविध कार्यशाळांचे आयोजन करण्याची सूचना ही यू.जी.सी.ने विद्यापीठांना केली आहे.

#### महिलांसाठी आणि मुलांसाठी नियोजन

देशभरातील सर्व विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील सर्व महिला कर्मचारी, विद्यार्थीनींना या अभियानात महिला आणि विद्यार्थिनींचे लैंगिक शोषण रोखणे, त्यांना लैंगिक अत्याचारांबाबत जाणीव करून देणे, तसेच तक्रार करण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. या अभियानात महिलांसाठी आपत्कालीन क्रमांक (११२) महिलांसाठींची (१८१) आणि लहान मुलींसाठी (१०९८) हेल्पलाइन याबाबत जागरूकता निर्माण केली जाणार आहे.

#### उपक्रम, कार्यशाळेचे आयोजन

सोमवार (दि. २५) हा आंतरराष्ट्रीय महिला हिंसाचार निर्मूलन दिन आहे. यानिमित्ताने (१०) डिसेंबर हा जागतिक मानवी हक्क दिन पर्यंत हे अभियान देशभरातील विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये राबवले जाणार आहे. या अभियानात महिला आणि विद्यार्थिनींचे लैंगिक शोषण रोखणे, त्यांना लैंगिक अत्याचारांबाबत जाणीव करून देणे, तसेच तक्रार करण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच, एखादी घटना घडल्यानंतर ती नोंदविणे, तक्रारपेटीतील तक्रारींच्या आधारे पोलिसांत तक्रार दाखल करण्यासाठी महिलांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

#### जनजागृती स्टिकर

सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने कार्यालयासह सर्व शाळांमध्ये लैंगिक शोषण अत्याचाराबाबत जाणीव करून देण्यासह त्यासंदर्भात जनजागृतीसाठी माहिती फलक व टोल फ्री क्रमांकचे स्टिकर सर्वत्र लावण्यात येत आहेत प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी त्यासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व शाळा सहकार्यालयात मध्ये हे स्टिकर लावण्यात येणार असल्याचे श्री. शेख यांनी सांगितले.





# काडादी हायस्कूलच्यावतीने संविधान, शहीद दिनानिमित्त मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

अण्णप्पा काडादी हायस्कूल व यशसिद्धी आजी-माजी सैनिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन व शहीद दिनानिमित्त मानवंदना देण्यात आली.

भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ती व मुबंई हल्ल्याची १६ वर्षे पूर्ती निमित्ताने बलिदान चौक येथे बलिदान स्तंभास विविध संघटनेच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करण्यात आले.याप्रसंगी के एल ई सोसायटीच्या अण्णप्पा काडादी हायस्कूल, स्थानिक नियामक मंडळाच्या अध्यक्षा सिंधुताई शिवशंकरजी काडादी ,संस्थेचे आजीव सदस्य विजयकुमार काडादी, काडादी हायस्कूलचे मुख्याध्यापक अनिल पाटील, उपमुख्याध्यापिका सुरेखा म्हमाणे, यशसिद्धी आजी-माजी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मेजर शिवपुत्र गटकांबळे, कॅप्टन कमलाकर कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष सुभेदार नंदकुमार कांबळे, महाराष्ट्र रेजिमेंट संघटनेचे सर्व माजी सैनिक पदाधिकारी व त्यांच्या वीरपत्नी,नागरिक, एन सी सी चे छात्र उपस्थित होते. याप्रसंगी केएलई संस्थेचे आजीव सदस्य विजयकुमार काडादी, अण्णप्पा काडादी प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल पाटील, यशसिद्धी आजी माजी सैनिक वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य संघटनेचे उपाध्यक्ष शिवपुत्र घटकांबळे व सोलापूर शाळेचे अध्यक्ष कॅप्टन कमलाकर कांबळे व उपाध्यक्ष सुभेदार जयनंद कांबळे व सर्व वीरपत्नी आणि महार रेजिमेंट चे माजी सैनिक, एनसीसी विभाग प्रमुख चीफ ऑफिसर सिद्रामप्पा तंबाके व एनसीसी छात्र सैनिक, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते, शहीद स्तंभास पुष्पचक्र वाहून संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले व शपथ घेण्यात आली.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## व्यासमुर्ती कट्टी यांचा कनकश्री पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**



सोलापूरचे सुपुत्र व्यासमुर्ती कट्टी यांना रागमित्र प्रतिष्ठान, शिरसी, कर्नाटक यांच्यावतीने कनकश्री हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. पंडित वसंत कनकापूर यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. त्यांना कै. पंडित वसंत कनकापूर यांच्या पत्नीच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यात संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. व्यासमुर्ती कट्टी हे उत्तम हार्मोनियम वाजवतात. त्यांनी आजपर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कलाकारांना हार्मोनियमची साथ केली आहे.सोलापुरातील कै. रामाचार्य बागेवाडीकर यांचे ते शिष्य आहेत. सध्या बेंगलोर येथे स्थायिक आहेत.



## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### शुक्रवार पेठेत दोन लाखांची घरफोडी

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**
शहरातील शुक्रवार पेठेतील अध्यापक अपार्टमेंटमधील बंद घराचे कुलूप चावीने उघडून १ लाख ८१ हजार २०० रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. याबाबत सुजित किरण फडकुले (वय ३४, रा. अध्यापक अपार्टमेंट, फ्लॅट नं २. शुक्रवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ ऑक्टोबर २०२४ रोजी फडकुले हे घराला कुलूप लावून परगावी गेले होते. ते २९ ऑक्टोबर रोजी परत आले. या दरम्यान कुणीतरी अज्ञात चोरट्याने फडकुले यांच्या घराचे कुलूप चावीच्या सहाय्याने उघडून घरातील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. चोरट्याने फडकुले यांच्या घरातून २३ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र, २.५ ग्रॅमचे कर्णफुले, २ ग्रॅमची लहान चैन, ५० ग्रॅम चांदीचे आरती, ४४ ग्रॅम चांदीचा करंडा, २५ ग्रॅम चांदीची वाटील, १० ग्रॅमचे चांदीचे पैंजण चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार चुंगे तपास करीत आहेत.

### राघवेंद्र नगरातून २७ हजारांचे साहित्य चोरीस

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**
शहरातील मुरारजी पेठेतील राघवेंद्र नगरातून चोरट्याने २७ हजार रुपये किंमतीचे साहित्य चोरून नेले. याबाबत सुमित गणपत भोसले (वय३७, रा. राघवेंद्र नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने सुमित भोसले यांच्या घरी व कारखान्यामधील सायकल, ४ गॅस टाक्या असा २७ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. अशी नोद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार पाडवी पुढील तपास करीत आहेत.

### चाकोते नगरातून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**
शहरातील जुना विडी घरकुल परिसरातील चाकोते नगरातून चोरट्याने १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत श्रीकांत रामलू द्यावरकोंडा (वय ३१, रा. चाकोते नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी श्रीकांत द्यावरकोंडा यांनी त्यांची एम एच १३ बीएस ८९९१ क्रमांकाची दुचाकी ही घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकींची सायकलस्वारास धडक; एक ठार, दोघे जखमी

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**
शहरातील बस स्टॅन्ड जवळील भाईश्री एलपीजी गॅस पंपासमोर दुचाकीने दिलेल्या धडकेत झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला तर अन्य दोघे जखमी झाले. हा अपघात सोमवारी रात्री दहाच्या सुमारास झाला. अशोक बसवंत पाटील (वय ६३, रा. अवंती नगर, सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव असून संदेश पंडीत जोगे (वय २५, रा. संतोष नगर, बाळे, सोलापूर) आणि आदेश धनवडे (वय ३५, रा. संतोष नगर, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. सोमवारी रात्री दहाच्या सुमारास अशोक पाटील हे त्यांच्या सायकलवरून घराकडे जात होते. त्यावेळी भाईश्री एलपीजी गॅस पंपासमोर दुचाकी वाहन क्र. एमएच १३ सीएफ २७६४ या वाहनाने पाटील यांच्या सायकलला जोरदार धडक दिली. यामध्ये सायलवरील पाटील यांच्या डोक्यास जबर मार लागून जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी मुलगी अश्विनी बिराजदार यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी पाटील यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. आकाश माने यांनी घोषित केले. तर दुचाकीवरील संदेश जोगे व आदेश धनवडे हे देखील जखमी झाल्याने त्यांना सागर जोगे याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# माजी आमदार आडम यांचा राजकीय संन्यास

- यापुढे कोणतीही निवडणूक लढवणार नसल्याची केली घोषणा
- शहर मध्य विधानसभेची फेर निवडणूक घेण्याची केली मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर -**
कामगारांचा बुलंद आवाज म्हणून प्रसिद्ध असलेल्या माजी आमदार कॉम्रेड नरसाय्या आडम मास्तर यांनी अखेर राजकीय संन्यास घेतला आहे. यापुढे ते कोणतीही निवडणूक लढवणार नसल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना जाहीर केले आहे. विधानसभा निवडणूक ही माझी अखेरची निवडणूक असेल अशी घोषणा त्यांनी यापूर्वीच केली होती. त्यानुसार त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन राजकीय संन्यास घेत असल्याचे सांगितले.

पुढे ते म्हणाले, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक लढवण्याची माझी शेवटची इच्छा होती ती मी लढवली. परंतु या निवडणुकीत भाजपने मोठा घोटाळा घातला आहे. ईव्हीएम मशीन मध्ये तांत्रिक बिघाड करून ही निवडणूक भाजपने जिंकली आहे. परंतु आम्ही या निकाला विरोधात कोर्टात जाणार आहोत. वेळ पडल्यास उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात देखील या संदर्भात दाद मागणार आहोत. सदरची संपन्न झालेली निवडणूक ही चुकीची असून त्यामध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांनी आचारसंहितेचा भंग करून तसेच आमच्या पार्टीची बदनामी केली आहे.

त्यामुळे सदरची निवडणूक ही अवैध ठरवून, रद्द करावी आणि पुन्हा एकदा शहर मध्य विधानसभा मतदारसंघाची निवडणूक घ्यावी अशी मागणी करणार असल्याचे आडम मास्तर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. तत्पूर्वी मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी पक्षाचे राज्यसचिव डॉ. उदय नारकर यांनी देखील भाजपवर टीका केली ते म्हणाले की, भारतीय जनता पार्टीने चुकीच्या पद्धतीने राज्यात निवडणूक यंत्रणा राबवली आहे. निवडणूक आयोगाला हाताशी धरून निकाल लावला आहे. वास्तविक पाहता शहर मध्य विधानसभा मतदारसंघात भाजपच्या उमेदवारांनी आदर्श आचारसंहितेचा भंग केला आहे. त्यांच्या विरोधात कोणतीही ठोस कारवाई न करता, निवडणूक प्रक्रिया राबवली. पाठिंबाचे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाले, वास्तविक पाहता ते चुकीचे पत्र असून देखील त्यावर, तात्काळ कारवाई झाली नाही. यामुळे आमच्या पक्षाची उमेदवाराची आणि पर्यायाने मतदारांची मोठी फसवणूक झाली आहे. त्यामुळे आम्ही या विरोधात उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात दाद मागू, गरज पडल्यास निवडणूक आयोगाला कोर्टात खेचू, सदरचा निकाल अवैध ठरवून, तात्काळ फेर निवडणूक घ्यावी अशी मागणी लावून धरू, असा इशारा नारकर यांनी दिला आहे.

या पत्रकार परिषदेस ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर,जिल्हा सचिव ॲड एम एच शेख,माजी नगरसेविका नसीमा शेख,नलिनी कलबुर्गी,शेवंता देशमुख,सुनंदा बल्ला,युसुफ शेख मेजर, व्यंकटेश कोंगारी, कुरमया म्हेत्रे, शंकर म्हेत्रे, रंगप्पा मरेड्डी, ॲड.वासम आदींची उपस्थिती होती.

### तपशीलवार मते जाहीर करा

राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेली मतदानाची खरी आकडेवारी जनतेसमोर मांडावी. मतदानाची टक्केवारी सर्वांसमोर जाहीर करावी. ईव्हीएम पॅड आणि कंट्रोल मशीन यामध्ये मतांची तफावत आढळून येईल, असा घोटाळा आयोगाने केला आहे. त्यामुळे आयोगाने पडलेली मते आणि ईव्हीएम पॅडमधील मते जाहीर करावीत. त्यानंतर सर्व खरे बाहेरी येईल.

**-उदय नारकर, राज्य सचिव माकप**

### उच्च न्यायालयात याचिका दाखल

या बाबींच्या अनुषंगाने उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार : **१३ नोव्हेंबर :** भाजपाचे उमेदवार देवेंद्र कोठे यांच्या प्रचारार्थ पूर्वभाग येथील दत्त नगर दत्त मंदिर येथे विना परवाना धार्मिकस्थळी कॉर्नर सभा घेण्यात आली. त्या अनुषंगाने उमेदवार प्रतिनिधी ॲड. अनिल वासम यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे रीतसर पुराव्यानिशी आचार संहिता भंग झाल्याची तक्रार केली असता भरारी पथक प्रमुखांकडून गुन्हा.

**१८ नोव्हेंबर :** प्रचार यंत्रणा संपल्यानंतर १९ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदारांना प्रलोभने दाखवून आकर्षित करण्यासाठी कमटम वसाहत येथील रायम लु कमटम यांच्या निवास्थानी साधारणता १२०० ते १५०० लोकांचे जेवण शिजवताना उमेदवार प्रतिनिधी ॲड. वासम यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे रीतसर पुराव्यानिशी आचार संहिता भंग झाल्याची तक्रार केली असता भरारी पथक प्रमुखांकडून गुन्हा.

**२० नोव्हेंबर :** पहाटे २.३७ वाजता आपलं सोलापूर या व्हटसअप ग्रुपवर अखेर आडम मास्तरांचा देवेंद्र कोठे यांना पाठींबा जाहीर असे मजकूर असलेले खोटे व बदनामीकारक पत्रक प्रत्यक्ष व समाज माध्यमात प्रसारित केले. या विरोधात पहाटे ३.३५ मिनिटांनी उमेदवार प्रतिनिधी ॲड. वासम यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे रीतसर पुराव्यानिशी आचार संहिता भंग झाल्याची तक्रार केली असता भरारी पथक प्रमुखांकडून गुन्हा.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**
लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर अत्याचार करून नंतर लग्न करण्यास नकार देणाऱ्या तरूणाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत तरूणीच्या फिर्यादीवरुन महेश उर्फ अवि लोखंडे (वय २३, रा. श्रीशैल गणपती मंदीरजवळ, आनंद नगर, होटगी रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता व आरोपी महेश हे दोघे एका कॉफी शॉपमध्ये काम करताता. २ नोव्हेंबर रोजी महेश आणि पिडीता हे दोघेही कॉफी शॉपमध्ये बसले असताना पिडीता ही नको म्हणत असताना महेशने तिला जबरदस्तीने गाडीवर बसवून बार्शी रोडवरील एका लॉजवर नेले. लॉजवरील रुममध्ये आपण थोड्याच दिवसात लग्न करू असे सांगून महेश याने पिडीतेशी तिच्या इच्छेविरुध्द शरीरीसंबंध केले. त्यानंतर पिडीतेने महेश यास वारंवार बोलण्यास प्रयत्न करून लग्नाबाबत विचारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी महेश हा तिला भेटण्यासाठी टाळाटाळ करून पिडीतेस मी तुझ्याशी लग्न करणार नाही, तुला काय करायचे आहे ते कर असे म्हणून दमदाटी करू लागला. त्यामुळे पिडीतेने त्यास पोलिसांत तक्रार करण्याचे सांगितले असता महेश याने मीच माझ्या जीवाचे बरेवाईट करतो व तुझे नाव घेतो अशी धमकी दिली. फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोलिस ठाण्याच्या आवारात पत्नीला मारहाण

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**
शहरातील जेलरोड पोलिस ठाण्याच्या आवारात पत्नीला मारहाण करणाऱ्या पतीविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अनिसा कुदरत कारभारी (वय ३३, रा. आयोध्या नगर, हैंद्राबाद रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन कुदरत खाजाभाई कारभारी (रा. आयोध्या नगरी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २४ नोव्हेंबर रोजी साडेदहाच्या सुमारास अनिसा कारभारी या पती कुदरत याच्याविरुध्द तक्रार देण्यासाठी जेलरोड पोलिस ठाण्यात आल्या होत्या. त्यावेळी पोलिस ठाण्याच्या आवारात पत्नी अनिसा हिस तु सारखे पोलिस ठाण्यात माझ्याविरुध्द का तक्रार देते असे म्हणून कुदरत याने अनिसाला मारहाण केली.

जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक भांबिष्टे पुढील तपास करीत आहेत.

## आता घरबसल्या घ्या पसंतीचा वाहन क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**
वाहन क्रमांक, बँक खाते क्रमांक असो वा मोबाइल क्रमांक यात आपल्या पसंतीचे अंक घेण्याकडे अनेकांचा कल वाढता आहे. यामुळेच परिवहन आयुक्तालयातर्फे आता वाहन क्रमांक ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




राज्यातील सर्वच प्रादेशिक परिवहन कार्यालयांत आज, सोमवारपासून ही सुविधा सुरू होणार आहे. वाहनधारकांच्या सुविधेसाठी आरटीओतील लर्निंग लायसन्स, लायसन्सवरील पत्ता-जन्मतारीख बदलणे, लायसन्स हरवल्यास दुय्यम प्रत काढणे, वाहन हस्तांतरित करणे, गहाळ आरसीसीची दुय्यम प्रत काढणे यांसह ५० हून अधिक सेवा ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत. घरबसल्या पसंतीचा वाहन क्रमांक आरक्षित करता यावा, यासाठी परिवहन आयुक्तालयातर्फे स्वतंत्र सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात याची चाचणी घेण्यात आली. अर्जदारास अशा क्रमांकासाठी आधार लिंक मोबाइल क्रमांक नोंद करून आधार ओटीपी किंवा मोबाइलद्वारे ओटीपी घेऊन https://fancy.parivahan.gov.in/ या संकेतस्थळावर हा क्रमांक आरक्षित करता येऊ शकेल. ही सेवा पूर्णपणे फेसलेस स्वरूपाची आहे. वाहनांसाठी नवीन मालिका सुरू केल्यानंतर प्रथम संबंधित कार्यालयामार्फत आकर्षक/पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज स्वीकारले जातील, अशी माहिती परिवहन आयुक्तालयाकडून देण्यात आली.

## मागणी घटल्याने बाजार समितीत डाळिंबाच्या दरात घसरण

**▸▸ प्रति किलो सुमारे ३०० रुपयांवर गेलेला दर आला १०० रुपयांवर**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर -**
डाळिंबाच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या सोलापूर जिल्ह्यात सध्या गुजरातच्या डाळिंबाची आवक होत आहे. सध्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत सोलापूर जिल्ह्यासह गुजरात आंध्र प्रदेश कर्नाटक इत्यादी राज्यातून डाळिंबाची आवक सुरू झालेली आहे.

मात्र, थंडीमुळे ग्राहकांमध्ये डाळिंबाची मागणी कमी झालेली दिसून येत आहे. मागणी घसरल्यामुळे डाळिंबाचे दर प्रति किलोमागे ४० रू. इतके दर कमी झाले आहेत. दरम्यान सोलापूर बाजार समितीत डाळिंबाची सुमारे ७० टन इतकी आवक झाली होती. दक्षिण भारतातील व्यापाऱ्यांनी डाळिंबाची खरेदी कमी प्रमाणात केल्यामुळे डाळिंबाचे दर कमी झालेले दिसत आहेत.

प्रति किलो ३०० रुपयांवर गेलेले डाळिंबाचे दर सध्या १५० रुपयांवर आले होते. त्यानंतर आंध्रप्रदेश, गुजरात आणि कर्नाटक राज्यातून डाळिंबाची आवक सुरू झालेली आहे.

त्यामुळे डाळिंबाच्या दरात दुसऱ्यांदा किलोमागे ४० रुपयांची घसरण झाली आहे. सध्या बाजार समितीत डाळिंबाचे दर प्रति किलोसाठी १०० रुपयापर्यंत आहेत.

### दर वाढून कमी झाल्याने नुकसान

गेल्या दोन महिन्यांपूर्वी डाळिंबाचे दर वाढले होते. वाढीव दरामुळे चार पैसे हातात मिळतील अशी आशा होती. परंतु बाजारपेठेत डाळिंब विक्रीसाठी आणला असता डाळिंबाचे दर घसरल्याचे लक्षात आले. त्यामुळे खर्च वजा जाता उत्पन्न कमी प्रमाणात मिळाले आहे.

**- अंशुमन डोके,**
डाळिंब उत्पादक शेतकरी

### डाळिंबाची मागणी घसरली

काही दिवसांपूर्वी डाळिंबाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली होती. त्यामुळे डाळिंबाचे दर सुमारे तीनशे रुपये किलो पर्यंत पोहोचले होते. यामध्ये भगवा डाळिंबाच्या प्रजातीला सर्वाधिक मागणी होती. परंतु सध्या थंडी वाढल्याने डाळिंबाची मागणी घटली आहे. त्यामुळे दरात देखील घसरण निर्माण झालेली आहे.

**- फय्याज बागवान,**
अध्यक्ष फ्रुट असोसिएशन
सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती

# शोभायात्रेसह जन्म कल्याणक विधी उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**
जैन धर्मातील परमपूज्य आचार्य विशुद्ध सागर व विभव सागर महाराजांच्या प्रेरणेने परमपूज्य मुनिश्री १०८ विभा स्वर सागर, सौम्य सागर, सारस्वत सागर, शुद्धपयोग सागर, जयंत सागर शुल्लक श्री १०५ श्रुत सागर महाराज यांच्या पावन सानिध्यात तसेच मार्गदर्शनाखाली पंचकल्याणक महामहोत्सवातील दुसरा दिवस जन्म कल्याणक आणि शोभायात्रेने उत्साहात पार पडला. शोभायात्रेमध्ये केरळ बँड, दोन हत्ती, घोडे तसेच सवाद्य शोभायात्रा विलोभनीय होती.



**सोलापूर : श्री मजिनेंद्र १००८ आदिनाथ जिनेबिंब पंचकल्यणक महामहोत्सवातील शोभायात्रेत केरळ बँड, हत्ती व घोडे हे लक्ष वेधून घेत होते.**

बाळीवेस येथील गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान जैन बोर्डिंग येथे मंगळवारी सकाळी सहा वाजता आदिनाथ मंदिर पासून वाजत गाजत मिरवणूक यामध्ये प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे हत्ती आणि घोडे लेझीम पथक श्रावक श्राविका आणि मुनी भगवान महावीरांचा जयजयकार करत गांधीनाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान येथे आली. येथील भव्य आणि अतिशय आकर्षक अशा मंडपातील शामियाण्यातील प्रतिष्ठाचार्य बालब्रह्मचारी पियुष भैय्याजी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच इंद्र इंद्राणी दुसऱ्या दिवशी जन्म कल्याण या विधीमध्ये सकाळी सहा वाजता जाप अनुष्ठान, श्री जिनाभिषेक, शांतीधारा, गर्भ कल्याण पूजन विधी अतिशय उत्साहात पार पडला. सकाळी साडेसात वाजता तीर्थंकर प्रभू जन्म, इंद्रासन कंपन, तसेच सर्व देवांद्वारे जन्मोत्सव साजरा झाला. साडेआठ वाजता मुनिश्री १०८ सौम्यसागर महाराज यांचे मंगल प्रवचन झाले. सकाळी साडेनऊ वाजता जन्म कल्याण विषयक शोभायात्रा आणि पंडूकशिला यावरती तीर्थंकर प्रभूचा जन्माभिषेक झाला. दुपारी दोन वाजता मंदिरामध्ये ८१ कलशाद्वारे शुद्धी आणि संस्कार हा विधी संपन्न झाला. त्यानंतर दुपारी तीन वाजता राज दरबारमध्ये बधाईया हा कार्यक्रम झाला. दुपारी साडेतीन वाजता मुनी श्रींचे मंगल प्रवचन आणि सायंकाळी सात वाजता महाआरती शास्त्र सभा, तीर्थंकरांच्या पाळण्याचा कार्यक्रम तसेच बालक्रीडा हा जैन संस्कृतीक कार्यक्रम, विविध रंगीबेरंगी धार्मिक पोशाख अलंकार किरीट मुकुट आणि देखाव्यासह पार पडला. श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट शुक्रवार पेठ येथील उंच शिखरातील भगवान आदिनाथ, भगवान मल्लिनाथ, भगवान वासुपुज्य, भगवान नेमिनाथ, भगवान पारसनाथ, आणि भगवान महावीर इत्यादी मूर्तींवर गर्भ कल्याणक संस्कार करण्यात आले.

### मोफत वैद्यकीय सेवा

गांधी नाथा रंगजी जनममंगल प्रतिष्ठान मेडिकल कॉलेजच्या वतीने मोफत वैद्यकीय सेवा देण्यात आली. प्राचार्य डॉ. पाटील आणि त्यांचे सहकाऱ्यांनी औषध गोळ्या बीपी आणि वजन इत्यादी तपासून आलेल्या गरजू आणि आजारी श्रावकांना ही सेवा दिली.

## महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी पुन्हा एकनाथ शिंदे हेच राहावेत!

**▸▸ राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. वाघमारे यांचे श्री तुळजाभवानी चरणी साकडे**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**
यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या विविध योजनेच्या यशामुळे महायुतीला सर्वाधिक जागा मिळवता आल्या आहेत. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी पुन्हा एकनाथ शिंदे हेच राहावेत, असे साकडे तुळजापुरात श्री तुळजाभवानी चरणी साकडे घालण्यात आले आहे,अशी भावना राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी व्यक्त केली. तुळजापूर येथील मंदिरात पदाधिकारी अन् लाडक्या बहिणींनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी पुन्हा एकनाथ शिंदे हेच विराजमान व्हावेत यासाठी महापूजा करण्यात आली. यावेळी राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी एकनाथ शिंदे हेच पुन्हा मुख्यमंत्रीपदी राहावेत, असे साकडे आई तुळजाभवानी चरणी घातले. याप्रसंगी माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, युवा जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे, तुळजापूर शहर प्रमुख बापूसाहेब भोसले, माजी नगरसेविका मंगला कोल्हे ,तुळजापूर शिवसेना तालुका प्रमुख संभाजी पलंगे , तुळजापूर शहर प्रमुख व लाडकी बहिण योजना सदस्य महाराष्ट्र शासन दत्तोबा भोसले, उप शहर प्रमुख नितीन कुराडे , मीडिया प्रमुख शिवसेना महेश यादव, अभिषेक साळुंके, विभाग प्रमुख सुरेश नेप्ते, लाला तांबोळी उपस्थित होते.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९५६

**ज्ञानामृत आनंदलहरी भाग-९५६**
**नव्हे सुख मज न लगे हा मान ।**
**न राहें हें जन काय करुं ॥**

प्रत्येकाला प्रसंगानुरुप का होईना पण मान सन्मान व्हावा, असे वाटत असते. मान झाला की आनंद आणि अवमान झाला की दु:ख हे ठरलेलेच आहे. आपला मान व्हावा किंवा आपला अवमान कोठेच होऊ नये असे वाटत असले तरीही प्रसंगानुरूप का होईना मानवाच्या वाट्याला मानही येतो आणि अवमानही येतो. सुख-दु:ख देणाऱ्या ह्या मान अवमानास प्रामुख्याने जो तो, व्यक्तिच कारणीभूत असतो, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. असे असले तरी अनेकांना स्वत:ची चुक होऊनही मानच मिळावा असे वाटत असते. पण असेही कांही लोक आपणाला पहायला मिळतात की जे मानास पात्र असूनी मान मागत नाहीत. त्याचबरोबर लोक मान देत असतील तरी त्या मानाचा स्विकार करण्याची त्यांची इच्छा नसते. मानात सुख आहे, असे न मानण्याची त्यांची वृत्ती असल्याने ते कोणाकडूनही मानाची अपेक्षा करीत नाही. त्याचबरोबर लोक मान देत असले तरी तेही जड वाटू लागते. या अनुषंगाने स्वत:च्या बाबतीत बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, नव्हे सुख मन न लगे हा मान। न राहें हें जन काय करुं ॥



तुकाराम महाराज

मानासाठी पात्र असूनही मान टाळणे यासाठी मनाचे मोठेपण लागते. चांगल्यांना चांगले म्हणा असे म्हणावे लागत नाही. चांगल्यांना त्यांचे कौतुक केलेले आवडत नाही. म्हणूनच की काय चांगुलपणाचे शिखर असणारे जगद्गुरु तुकोबाराय मान-सन्मान नको म्हणतात. लोकांनी त्यांना मान-सन्मान द्यावा असे त्यांना अजिबात वाटत नाही. मान सन्मानात सुख आणि अवमानात दु:ख मानण्याचा मानसिकतेच्या पलिकडे गेल्याने त्यांना सुख-दु:ख समान वाटते. संसारात अडकलेल्या जीवाची अवस्था मात्र भेदजन्य असते. अर्थात, सुख-दु:खातला फरक मानण्याची वृत्ती सांसरिक जीव जोपासतो. सातत्याने आपल्या हातून चांगल्या गोष्टी घडाव्यात अशी मनोवृत्ती जोपासून माणूस वागू लागला तर त्याच्या वाट्याला आपोआप मान येऊ लागतो. अर्थात, सुख येऊ लागते. पण चांगल्या गोष्टीत जेव्हा स्वार्थ,अहंकार, मीपणा, ईर्षा आदिचा शिरकाव होतो. तेव्हा मात्र दु:खाशिवाय वाट्याला कांही येत नाही. सुख-दु:खाच्या अवस्थेपलीकडे जाण्यासाठी धन, संपत्तीच लागते असे नाही. तर यासाठी फक्त मनोवृत्ती लागते. मानले तर कशातही सुख आहे आणि नाही मानले तर पावलोपावली दु:खच आहे. सर्व गोष्टीबरोबर आपणही नाशवंत आहोत, याची आठवण ठेवून माणूस वागू लागला तर हे माझे, ते माझे, मी असे करेन, मी तसे करेन, ही वृत्तीच नाश पावते. या वृत्तीचे नाश पावणे म्हणजेच भेदजन्य दृष्टी नाश पावणे होय. भेदजन्य दृष्टीचा नाश म्हणजेच खरे सुख होय. या खऱ्या सुखाची अनुभूती आपणा सर्वांना येईल असे आपले वर्तन व्हावे अशी ज्ञानोबा-तुकोबा चरणी प्रार्थना. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - |
| दि. २७ नोव्हेंबर २०२४ | देवी माऊली जत्रोत्सव शिरोडा |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. द्वादशी (३०.२३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - चित्रा (अहोरात्र) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - आयुष्मान (१५.११) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (१७.०६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. समाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील. शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता, प्रवास होईल.

**वृषभ** : विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्याात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन** : काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्याद वाढ होण्याची शक्यता. यश मिळेल.

**कर्क** : स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह** : लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, सम न्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**कन्या** : चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या काम ावर खुशी राहील.

**तुळ** : मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक** : राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु** : आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर** : जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो. उद्योगधंदा चांगला होईल. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**कुंभ** : आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन**: योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ होण्याची शक्यता. दुसऱ्यांच्या कामात हस्तक्षे करू नका. महिलांना आनंदी दिवस राहील.

# महाराष्ट्र चेंबर, सोलापूर विद्यापीठामध्ये रोजगार निर्मिती, कौशल्य प्रशिक्षणासाठी करार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर यांचा कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगार निर्मितीसाठी करार झाला आहे.



विद्यापीठ व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर, आणि इनोईव्हर्सिटी यांनी एकत्र येत कौशल्य विकास, उद्योग प्रशिक्षण, आणि प्रकल्प व्यवस्थापनासाठी हा नवा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योगातील वास्तव परिस्थितीशी जोडून त्यांचे रोजगार कौशल्य वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.ह्यासाठी महाराष्ट्र चेंबरचे गव्हर्निंग कोन्सिल सदस्य केतनभाई शहा व चेंबरचे बिझनेस सोल्युशन पॉलिक्लिनिक प्रग्राम चे समनव्यक मनीष पाटील हे प्रयत्नशील होते. महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललीतभाई गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, चेअरमन स्किल कमिटीचे संदीप भंडारी,सेक्रेटरी जनरल सुरेश घोरपडे, विद्यापीठाचे कुलगुरू प्रकाश महानवार, इंटर्नशिप सेल प्रमुख अनिल घनवट यांचे सहकार्य लाभले.

**रोजगार निर्मितीसमोरील आव्हाने**

हा उपक्रम रोजगारनिर्मितीच्या दिशेने एक ठोस पाऊल आहे. विद्यार्थ्यांना कौशल्य वाढविण्याबरोबरच उद्योगांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करणे, हे मुख्य ध्येय आहे. आजच्या शिक्षण प्रणालीतील मुख्य समस्या म्हणजे उद्योगाच्या अपेक्षा आणि विद्यापीठीय शिक्षण यामधील तफावत.

महाराष्ट्रसरकारनेविद्यापीठांसाठी आणि महाविद्यालयांसाठी इंटर्नशिप सेल सुरू करणे अनिवार्य केले असले तरी त्यांनी हे पाऊल केवळ अनुपालनासाठी न घेता, विद्यार्थ्यांसाठी रोजगारक्षमतेचा पाया मजबूत करण्यासाठी उचलले आहे.

### कोणाला होणार लाभ

**उद्योगांसाठी :**
१.तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली तयार विद्यार्थी थेट उद्योगासाठी उपलब्ध.
२.इंटर्नशिप प्रक्रियेचे व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी एक डिजिटल प्लॅटफॉर्म.
३.प्रशिक्षित विद्यार्थ्यांमुळे प्रशिक्षणाचा खर्च आणि वेळ कमी.
४.नवीन समस्यांसाठी सर्जनशील उपाययोजना मिळण्याची संधी.

**संस्थांसाठी:**
१.इंटर्नशिप सेलचे डिजिटल स्वरूप सुलभतेने व्यवस्थापित करता येणे.
२.एम्पॅनेल्ड मेंटर बनण्यासाठी संकाय सदस्यांसाठी प्रशिक्षण.
३.शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा.
४.विद्यार्थ्यांना उद्योगासोबत प्रत्यक्ष कामाचा अनुभव उपलब्ध करणे.

**विद्यार्थ्यांसाठी :**
१.उद्योगाशी थेट जोडले जाणे, जेणेकरून शैक्षणिक ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्य यामध्ये समतोल साधता येईल.
२.कौशल्य प्रशिक्षण, मार्गदर्शन, आणि उद्योगांशी संवाद साधण्याची संधी.
३.परवडणाऱ्या शुल्कात (रु. २,८००) ४ क्रेडिट ओजेटी कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी.
४.उद्योगांची वास्तव परिस्थिती समजून घेण्याची क्षमता विकसित होणे.

**उपक्रमाच्या मुख्य वैशिष्ट्ये**
१.विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य ओजेटी प्रोग्राम: ५५-६० संस्थांमधील ४५०० हून अधिक पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी परवडणाऱ्या शुल्कात उपलब्ध.
२.संकाय विकास: डिसेंबरमध्ये होणाऱ्या एकदिवसीय कार्यशाळांमधून संस्थांच्या शिक्षकांना एम्पॅनेल्ड मेंटर बनविण्याचा प्रयत्न.
३.इंटर्नशिप सेलसाठी सुसज्जता: विद्यापीठाकडून फर्निचर, उपकरणे, आणि सुविधा; इनोईव्हर्सिटीकडून कार्यरत खर्च व्यवस्थापन.
४.उद्योग-शिक्षण सहकार्य: प्रकल्प, संशोधन, आणि नवोन्मेषी कल्पना यासाठी दीर्घकालीन सहकार्याची स्थापना.



## बुर्ला महिला महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

संविधान दिन हा २६ नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा केला जातो. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्यानिर्मितीसाठी मसूदा समिती स्थापना झाली. अनेक बैठका व चर्चा सत्रानंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो असे प्रतिपादन प्रा. महादेव गायकवाड यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीयसेवा योजना विभागाच्या वतीने 'संविधान दिन' आयोजित करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. महादेव गायकवाड विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी होते.

व्यासपीठावर प्रा. डॉ. शंकर राजे (कार्यक्रमअधिकारी रा. से. यो.) प्रा. डॉ. टी. व्ही. शिंदे, प्रा.ॲनी जॉन (कार्यक्रम अधिकारी रा. से. यो.) उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनींनी सामुदायिकपणे संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. शंकर राजे (कार्यक्रम अधिकारी रा. से. यो.) यांनी मानले.

# शहरात तीन ठिकाणी अतिक्रमण विरोधी कारवाई

● खोके, हातगाड्या व इतर साहित्य केले जप्त; महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने दाराशा प्रसूती गृह, महिला हॉस्पिटल आणि जुळे सोलापुरातील वैष्णवी प्लाझा या परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात आले. या मोहिमेत खोके , हात गाड्या व इतर साहित्य केले जप्त महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.



सोमवारी सकाळच्या सत्रात महापालिकेच्या दाराशा प्रसूती गृह कंपाऊंड लगत असलेले अतिक्रमण काढण्यात आले. येथील लोखंडी टेबल, गॅस टाकी व सामान जप्त करण्यात आले. दुपारच्या सत्रात महिला हॉस्पिटल येथील रस्त्यावरील फळ गाड्यांचे अतिक्रमण काढण्यात आले. तसेच वैष्णवी प्लाझा जुळे सोलापूर येथील रस्त्यावरील अनधिकृत खोक्याचे अतिक्रमण हटविण्यात आले.

या मोहिमेत दोन लोखंडी खोके, चार हातगाड्या , लोखंडी वजन काटे , स्पीकर व इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे , मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

## राष्ट्रवादीतर्फे राज्यभरात सामुदायिक संविधान वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

संविधानाबाबत जनजगृती करण्यासाठी आणि आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने देशभरात २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २४ नोव्हेंबर २००८ ला आदेश काढून २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले होते.



जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले यांच्या हस्ते विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर संविधान वाचन झाले.

याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी माध्यमांशी बोलताना राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशान्वये संपूर्ण महाराष्ट्रात संविधान प्रतीचे सामुदायिक वाचन करण्यात आले. त्याच अनुषंगाने शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांच्या नेतृत्वात २६ नोव्हेंबर संविधान दिनाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे संविधान दिन जल्लोषात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, श्रीनिवास कोंडी, ज्येष्ठ नेते अनिल उकरंडे, आनंद मुस्तारे, महेश निकंबे, फारूक मटके, गणेश पुजारी, प्रमोद दादा भोसले, सुहास कदम, महेश कुलकर्णी, प्रकाश जाधव, दत्ता बडगंची, आमिर शेख, खलील शेख, वैद्यकीय मदत कक्ष बसवराज कोळी, साजिद शेख, आशुतोष नाटकर, राजू बेळ्ळेनवरू अनिल बनसोडे, अनिल छत्रबंद, इरफान शेख, वैभव गंगणे, अल्मेहराज आबादीराजे, सोमनाथ शिंदे, मार्तंड शिंगारे संजय सांगळे, निलेश कांबळे, संदीप माने, पवन पाटील, कांचन पवार, घाडगे, प्रज्ञासागर गायकवाड, श्याम गांगर्डे, युवराज माने, मुहिज मुल्ला, प्रदीप बाळशंकर, मौला शेख, दत्ता बनसोडे, माणिक कांबळे, वसंत कांबळे, चाचा सोनवणे, भास्कर अडकी उपस्थित होते.



## जि.प. कर्मचारी युनियनच्यावतीने संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने सोलापुरात संविधान दिवस साजरा करण्यात आला.

याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशादीन शेळकदे, अमोल जाधव, हरिदास हावळे, संजय धनशेट्टी, संतोष कुलकर्णी, कादर शेख, सुलभा वठारे, शेखर गोतसुर्वे, राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज, जिल्हाध्यक्ष तजमुल मुतवली, चेअरमन डॉ. एस.पी. माने, कास्टराईब कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष गिरीश जाधव, लिपिकवर्गीय संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, उप अभियंता उंबरजे, अभिमन्यू कांबळे उपस्थित होते.

# हत्याराने मारामारी आणि म्होरक्याचा विजय

**नाट्य समीक्षण**
**विद्या काळे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धे ची दि.२५ नोव्हेंबर रोजी हुतात्मा स्मृती मंदिर येथे उत्साहात सुरुवात झाली. उद्घाटन कार्यक्रम संपल्यावर ८ वाजता पहिल्या दिवशीच्या नाट्य प्रयोग सुरू झाला. स्वप्नील सपना लोककला विकास मंडळ मालेगावच्या कलाकारानी 'पाठलाग' नाटक सादर केले. लेखक-स्वप्नील बावळे आणि दिग्दर्शक -सपना बावळे. छत्रपतींच्या नंतर पेशवाई आली आणि १७०० व्या शतकात इंग्रजी राजवट सुरू झाली.त्या काळात छत्रपतींच्या सैन्यात असणाऱ्या महार, मांग ,बेरड, रामोशी, भिल्ल इ. जमातीचे लोक त्यांचे हुनर जाणून राजांनी त्यांना कामे दिली पण इंग्रजी आमदानीत त्यांनाच चोर, दरवडेखोर ठरवून त्यांच्यावर जुलूम सुरू झाले. या प्रसंगापासून नाटकाची सुरुवात होते आणि नाटकभर त्याचं गोष्टीचा पाठपुरावा दाखविला गेला.




हे दाखवताना दरवडा घालणे, छोट्या, मोठ्या चोऱ्या हे पाहताना सोलापूरच्या सेटलमेंटची कहाणी आहे असं वाटत होतं पण कुठल्या एका ठिकाणी ही कथा घडत नाही. हा भाग संपतो न संपतो तोच दरवडेखोरांची वस्ती, तिथली कार्य पद्धती दाखवली गेली. मधेच गावचा पाटील येतो त्यानेही गावकुसाबाहेरच्या या लोकांवर आरोप करत त्यांना शिक्षा देण्याचे ठरवून त्यांना पकडण्याचा घाट घालतो. या सगळ्या सतत हेलकावे घेणाऱ्या कथानकात पहिला अंक संपतो.



दुसऱ्या अंकात दरवडेखोरांच्या बैठका त्यांना मार्गदर्शन करणारे मास्तर, परत पाटील आणि पाटील म्हटलं की तमाशा, नाचणारीण (ही गोष्ट अपरिहार्य) आलीच. पाटील आणि दरवडेखोरांचा म्होरक्या यांची झटापट, हत्याराने मारामारी आणि म्होरक्याचा विजय इथे नाटक संपते. विषय तसा जुनाच. तो मांडताना सतत हेलकावे खाणाऱ्या कथानकाच्या मांडणीमुळे नाटकात एकसंधपणा दिसून येत नव्हता. या कडे लेखकाने लक्ष द्यावयास हवे होते किंवा दिग्दर्शने त्यात योग्य तो बदल करावयास हवा होता. त्यात स्वातंत्र्यपूर्व काळातील पत्री सरकारचा एखादा प्रसंग दाखवला असता तर कथानकात अधिक स्पष्टता आली असती असे वाटते.पात्रांच्या भाऊगर्दी मुळे भलंमोठं स्टेज असूनही अडचण वाटत होती. याकडे दिग्दर्शकाने लक्ष देणे आवश्यक होते.खूप पात्रे असल्याने पात्रांना न्याय देता येत नव्हता. उदा.-मास्तरचे पात्र. दरवडेखोरांचा म्होरक्या.यावर अधिक लक्ष केंद्रित केले असते तर त्यांची भूमिका चांगली स्पष्ट झाली असती. पाटलांनी स्वतः च्या कामात नेटकेपणा आणणे आवश्यक वाटत होते. नेपथ्य-नाटकाची जमेची बाजू होती. असे लोक झोपड्यात राहण्या ऐवजी पालात राहतात.हा विचार केला असता तर नेपथ्यात अधिक भर पडली असती. टांगलेले कंदिल,झाड,पार यांनी नेपथ्य छान उभे केले. दुसऱ्या अंकाच्या सुरवातीला तांडा चालला हे परिस्थितीला पूरक गीत होते पण नेपथ्यात कोणताही बदल नव्हता याकडे लक्ष दिले असते तर बरे झाले असते. पार्श्व संगीताने खूप निराशा केली. कर्कश आवाज, नक्की कोणत्या प्रसंगी काय वाजवायचे हा विचार करावयास हवा होता. प्रकाश योजना ही थोडी जमेची बाजू होती. रात्रीचा गडद अंधार, पाटील आणि म्होरक्या यांच्या मारामारी प्रसंगात फ्लिकरचा वापर करून थोडासा दिलासा मिळाला. सर्वात कौतुकास्पद बाब म्हणजे ४०/५०पात्र घेऊन नाट्यप्रयोग सादर करणे. वेशभूषा,रंगभूषा यावर घेतलेले कष्ट महत्वाचे होते. थोडं अधिक मार्गदर्शन मिळाले असते किंवा त्याचा विचार केला असतां तर प्रयोग उभारणीत चांगली भर पडली असती.

- **आजचे नाटक** : भयरात्र
- **वेळ व ठिकाण** : सायं.७ वा. हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
- **लेखक** : रविशंकर झिंगेरे
- **दिग्दर्शक** : पायल पांडे

## संक्षिप्त वृत्त



### झोपडपट्टी मुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार होईल : राजेंद्र मिरगणे

**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर-**

भारतीय जनता पार्टीचे राज्य नेतृत्व आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गृहनिर्माण विभागाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष राजेंद्र मिरगणे यांनी मुंबई येथील भाजपा प्रदेश कार्यालयात जावून भेट घेतली व त्यांचा विधानसभा निवडणुकीतील नेत्रदीपक यशाबद्दल भव्य सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी मिरगणे म्हणाले, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधानसभा निवडणुकीतील महायुतीच्या अभूतपूर्व यशानंतर अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. भावी काळात हे सरकार गोरगरीब व शेतक-यांचे प्रश्न सोडवेल. तसेच मराठा व ओबीसी समाज घटकांना एकत्रित बरोबर घेऊन काम करेल याची खात्री वाटते. देवेंद्र फडणवीस यांनी माझ्यावर गृहनिर्माण विभागाचे धोरण निर्मिती करण्याची जबाबदारी सोपवली होती व मी ती जबाबदारी पूर्ण केली आहे. आगामी काळात महाराष्ट्र झोपडपट्टी मुक्त करण्याचे स्वप्न साकार होईल, असा विश्वास वाटतो. तसेच राज्यातील प्रत्येक बेघर नागरिकास त्यांच्या मालकीचे व हक्काचे पक्के घर मिळेल, असा विश्वास वाटतो. यावेळी मिरगणे यांनी राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २०१४ ते २०१९ या कार्यकाळात तसेच गेल्या अडीच वर्षात झालेल्या लोककल्याणकारी कार्यामुळेच हा विजय मिळाला असल्याचे नमूद केले.



### श्री वर्धमान जैन वाचनालयात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा

**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर-**

येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयात, आज २६ नोव्हेंबर रोजी सकाळी भारतीय संविधान अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, ऑ.सेक्रेटरी आनंद पुनमिया, संचालक धिरज कुंकूलोळ, अशोक कांकरिया, प्रमोद भंडारी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्वांनी भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, सहा.ग्रंथपाल पल्लवी तौर, क्लार्क विराज पतंगे, सेवक रेखा यादव, उपस्थित होते. प्रास्ताविक वाचनालयाचे ऑ.सेक्रेटरी आनंद पुनमिया यांनी केले तर आभार वाचनालयाचे संचालक धिरज कुंकूलोळ यांनी मानले.



### मैंदर्गी जिल्हा परिषद कन्नड शाळेत संविधान दिन साजरा

**अक्कलकोट, दि. २६ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद कन्नड मुली शाळा मैंदर्गी येथे संविधान दिन साजरा करण्यात आले. यावेळी संविधानाचे प्रतिमा व तसेच २६/११ चे मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल व ताजमहल हॉटेल आणि हॉटेल ओबेराय या ठिकाणी दहशतवादी हल्लयात शहीद झालेले अशोक कामटे, हेमंत करकरे, विजय साळस्कर यांचे प्रतिमेला इयत्ता पहिली वर्गातील मुलीने मेणबत्ती लावून अभिवादन केले. मुलींनी संविधान दिनाबद्दल मनोगत व्यक्त केले आणि शहीद पोलीस अधिकारी यांचे बद्दल मनोगत व्यक्त केले यासंदर्भात शाळेतील इतर शिक्षक बंधू आणि भगिनी संविधान दिनाबद्दल मुलींना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक बंधू आणि भगिनी तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित सर्व पालक यांनी हुतात्म्यांचा व संविधान प्रतिमेला नतमस्तक होऊन अभिवादन केले.



### संत विसोबा खेचर संस्थेत संविधान दिन

**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर-**

येथील संत विसोबा खेचर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे तथा मॅनेजमेंट कौन्सिल मेंबर डॉ. सागर कांबळे यांच्या हस्ते संविधान मंदिर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. त्यानंतर संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. डॉ. सागर कांबळे यांनी संविधान दिनाचे महत्त्व यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रभारी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर तथा संस्थेचे सुरेश भालचीम यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी एनएसएस कार्यक्रम अधिकारी युवराज माढेकर, गट निदेशक रमेश मिरगणे, जयश्री महिंगडे उपस्थित होते.

# चंद्रभागेच्या घाटावर फोटोग्राफरची गर्दी कमी व्हावी

## पंढरपुरातील भाविकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ नोव्हेंबर -**

येथील चंद्रभागा नदीच्या वाळवंटातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या महाव्दार घाटावर भिकारी मंडळी, फेरीवाले तसेच फोटोग्राफर मंडळींनी अतिक्रमण केल्यामुळे भाविकांना येण्या जाण्यासाठी सध्या घाट अपुरा पडू लागला आहे. त्यामुळे पालिका तसेच पोलिस प्रशासनाने याकडे त्वरीत लक्ष देवून घाटावरील या मंडळींचा उपद्रव थांबवून चंद्रभागेकडे जाण्यायेण्यासाठी महाव्दार घाट भाविकांना प्रशस्त करुन द्यावा तसेच भिकारी मंडळी आणि फोटोग्राफर मंडळींच्या होणाऱ्या उपद्रवाला देखील मज्जाव करावा अशी मागणी भाविकांमधून केली जात आहे.

विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरात आलेला भाविक पहिल्यांदा चंद्रभागा स्नानासाठी चंद्रभागेच्या वाळवंटात जात असतो. चंद्रभागा नदीच्या वाळवंटा मध्ये जुन्या दगडी पुला पासून ते विप्रदत्त घाटा पर्यंत वेगवेगळे दगडी घाट आहेत. या सर्व घाटां मध्ये विठ्ठल मंदिराच्या अगदी समोर असणाऱ्या महाव्दार घाटावरुनच भाविकांची चंद्रभागा नदीकडे जाण्या येण्यासाठी सतत वर्दळ असते. मात्र या घाटावरच भिकारी,फेरीवाले तसेच फोटोग्राफर्स मंडळींनी



मोठा कब्जा केलेला दिसत आहे. या मंडळींच्या अतिक्रमणामुळे भाविकांना जाण्या येण्यासाठी सध्या हा घाट अपुरा पडत आहे. ज्यावेळी भाविक चंद्रभागा नदीकडे ये-जा करीत असतात, त्यावेळी घाटावर भिक्षा मागण्यासाठी बसलेले भिकारी मंडळी त्यांच्याकडे भीक मागण्यासाठी आरडाओरड करीत असतात. अनेक वेळा ही भिकारी मंडळी भीक्षा मिळविण्यासाठी अगदी भाविकांचा पिछ्छा पुरवून पाठलाग करीत असतात. त्यामुळे विशेषत: महिलां तसेच वृध्द भाविकांना याचा कमालीचा त्रास होतो.

दरम्यान या भिकारी मंडळींचा उपद्रव चुकवित असतानाच घाटांच्या पायऱ्यांवर विठ्ठल रुक्मिणीच्या फायबरच्या मुर्ती ठेवून त्यांच्या समवेत फोटो काढून घ्यावा म्हणून काही फोटोग्राफर मंडळींकडून देखील भाविकांना आग्रह धरला जातो. त्या मध्येच भाविक आपल्याकडेच यावेत यासाठी फोटोग्राफर मंडळीं आपसात एकमेकांना शिवीगाळ करुन प्रसंगी माराम ाऱ्या देखील करीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे फोटो काढयचा म्हटले तरी फोटोग्राफर मंडळींचे भांडण सोडून सर्व महाभारत भाविकांना पहावे लागते. त्यामुळे भाविकांना येथे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. केवळ मोठ्या यात्रांच्या वेळी पालिका,पोलिस तसेच महसूल प्रशासनाकडून घाटावरच्या या मंडळींवर कारवाईचा बडगा उगारण्यात येत असतो. ऐरव्ही मात्र परिस्थिती जैसी थी अशीच असते. त्यामुळे यात्रांच्या अगोदर प्रमाणे ऐरव्ही देखील पालिका, पोलिस आणि महसूल प्रशासनाकडून घाटावरची ही अनावश्यक गर्दी कमी करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याची भावना भाविकां मधुन व्यक्त होत आहे.

### फोटोग्राफर्स भाविकांमागे लावतात तगादा

घाटावरील भिकारी, फेरीवाले आणि फोटोग्राफर मंडळींच्या या गर्दीतून रस्ता काढून चंद्रभागा स्नानासाठी जाताना भिकारी मंडळींचा भिक्षा देण्यासाठीचा तगादा तसेच घाटांच्या पायऱ्यांवर ठेवलेल्या विठ्ठल रखुमाईच्या फायबरच्या मूर्तीसोबत फोटो काढून घ्यावा यासाठी फोटोग्राफर मंडळींचा देखील मोठा उपद्रव भाविकांना सहन करावा लागतो आहे.

> महाद्वार घाटावरुन चंद्रभागा नदीकडे जाताना भिकारी लोकांचा, पायऱ्यांवर फोटोग्राफर मंडळींचा तसेच फेरीवाल्यांचा मोठा उपद्रव भाविकांना सहन करावा लागतो आहे. घाटावरुन गर्दीच्या वेळी चालणे देखील मुश्कील होते. घाट प्रशस्त असून देखील अडचणीचे वाटतात.
>
> **- सदानंद सोनवणे, भाविक**

## विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षपदी न्यायमूर्ती भूषण गवई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती भूषण रामकृष्ण गवई यांची राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यकारी अध्यक्षपदी निवड केली, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर आणि तालुका विधी सेवा समिती, अक्कलकोट यांच्याकडून देण्यात आली आहे. हे नामनिर्देशन आदेश दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ पासून लागू झाले आहे.

भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना विधी सेवा प्राधिकरण कायदा १९८७ च्या कलम ३ च्या खंड (ल) द्वारे प्रदान केलेल्या प्राप्त अधिकारांतर्गत सदरचे नामनिर्देशन करण्यात आले आहे. त्यासंबंधीची अधिसूचना कायदा आणि न्याय मंत्रालय, भारत सरकारच्या अधिकृत राजपत्रद्वारे ८ नोव्हेंबर रोजी प्रकाशित करण्यात आली होती. भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना हे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे पुर्वीचे कार्यकारी अध्यक्ष होते. त्यानंतर कार्यकारी अध्यक्ष हे पद भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील द्वितीय वरिष्ठ न्यायमूर्ती यांना बहाल केले जात असते. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नामनिर्देशन होण्यापूर्वी माननीय न्यायमूर्ती भूषण गवई हे सर्वोच्च न्यायालयाच्या विधी सेवा समितीचे अध्यक्ष होते. कार्यकारी अध्यक्ष म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई हे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे मिशननुसार सर्व नागरिकांना, विशेषतः समाजातील उपेक्षित आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील सर्व नागरिकांना सुलभ आणि मोफत कायदेशीर मदत प्राप्त व्हावी याकरीता राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण मिशनचे नेतृत्व करतील. आर्थिक किंवा सामाजिक अडथळयांमुळे कोणत्याही नागरिकाला न्याय नाकारला जाणार नाही याची खात्री करुन, कलम ३९-E च्या संवैधानिक आदेशाचे पालन करण्याची राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाची वचनबध्दता त्यांच्या नेतृत्वात प्रस्थापित केली जाईल.



## श्री शंकरलिंग प्रशालेत संविधान दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २६ नोव्हेंबर-**

वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत भारतीय संविधान दिन संपन्न झाला.

याप्रसंगी प्राचार्य वीरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते भारतीय संविधान प्रतिमा व संविधान ग्रंथाचे पूजन करण्यात आले.पूजनानंतर सहशिक्षक श्रीमंत भोसले यांनी भारतीय संविधानाविषयी माहिती सांगितली. या दिनाचे औचित्य साधून मराठी, हिंदी, इंग्रजी,कन्नड व उर्दू या भाषेतील संविधानाचे वाचन करण्यात आले. याप्रसंगी सुंदर हस्ताक्षर व चित्रकला स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले. यावेळी संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी,, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, प्राध्यापक संतोष शिंदे, सिधदारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, शिवराज अष्टगी, बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, मल्लिनाथ गौडगाव, अजय माणकोजी, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, रूपाली कलशेट्टी, शकुंतला राठोड, प्राध्यापिका प्रतिभा तांडुरे, लिपिका राजश्री दुधगी,सेवक विनोद दुधगी, कट्टेप्पा कोळी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जम ादार यांनी केले.

## बार्शीच्या विद्यार्थ्यांची जलतरण स्पर्धेत अभूतपूर्व कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर-**

येथील सरशी फ्लीपर्स स्विम क्लब आणि कर्मवीर जलतरण तलाव यांच्याशी संलग्न सहा विद्यार्थ्यांनी विजयदुर्ग येथे आयोजित राज्यातील सर्वात म ोठ्या ३० कि.मी. सागरी जलतरण स्पर्धेत अभूतपूर्व यश संपादन केले आहे. हे विद्यार्थी कठीण सागरी परिस्थितीत प्रवास करत टॉप-१० रँकिंगमध्ये स्थान मिळवणारे ठरले आहेत.



विद्यार्थ्यांची उल्लेखनीय काम गिरी: मुली- १) भार्गवी मुळे (वय १२): वेळ - ६.४६ तास, दुसरा क्रमांक २) तनवी नवले (वय ९): वेळ - ७.०३ तास, तिसरा क्रमांक मुले- १) आदर्श चौरे (वय १४): वेळ - ५.१५ तास, तिसरा क्रमांक २) शौर्य नवले (वय १०): वेळ - ६.३० तास, सहावा क्रमांक ३) माधव शिंदे (वय १३): वेळ - ६.४८ तास, सातवा क्रमांक ४) जयसिंह शिंदे (वय १३): वेळ - ७.१२ तास, नववा क्रमांक स्पर्धेचे आव्हान आणि महत्त्व : ही स्पर्धा अत्यंत आव्हानात्मक होती, कारण ती नैसर्गिक सागरी परिस्थितीत, समुद्रातील मासे, जेलीफिश आणि अनपेक्षित अडथळ्यांच्या पार्श्वभूम ीवर घेतली गेली. विद्यार्थ्यांनी प्रचंड धैर्य आणि जिद्द दाखवून ३० कि.मी.चे अंतर यशस्वीरीत्या पूर्ण केले. यशामागील मार्गदर्शक- कोच- बाळराजे पिंगळे, मार्गदर्शक सुंदर लोमटे, डॉ.युवराज रेवडकर, आहारतज्ज्ञ- करुणा शिंदे विद्यार्थ्यांना प्रेरणा कशी मिळाली. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लहान वयामुळे या विद्यार्थ्यांना विशेष इंडेम्निटी बॉण्ड सादर करावा लागला. तथापि, त्यांच्या मेहनतीने आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाने त्यांनी हे यश संपादन केले.

बार्शी शहरासाठी हा अभिम ानाचा क्षण असून या विद्यार्थ्यांचे यश पुढील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धांसाठी मार्गक्रमण करणारे आहे.

## जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी दर जाहीर न करताच सुरु केला गळीत हंगाम

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२६ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शासनाने यंदा साखर कारखान्यांना १५ नोव्हेंबर पासून गळीत हंगाम सुरु करण्याची परवानगी दिली. यामध्ये परवानगी देत असताना सर्व साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना मागील एफ आरपी प्रमाणे राहिलेली रक्कम द्यावी यासह इतर अनेक अटीसह गळीत हंगाम सुरु करण्याची परवानगी दिली. यादरम्यान म हाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका सुरु होत्या यामुळे साखर कारखानदारांनी गळीत हंगाम सुरु केले आहेत.

यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील विठ्ठल साखर कारखाना वगळता इतर कोणत्याही साखर कारखान्याने पुढील गळीत हंगामात उसाला प्रतिटन किती दर देणार याबाबत काहीही न जाहीर करता गळीत हंगाम सुरु केले आहेत. वास्तविक पहाता गळीत हंगाम म्हणजेच मोळी पूजन करताना ऊस दर जाहीर करणे अपेक्षीत असते पण आम्ही चांगला दर देऊ म्हणत कारखानदारांनी आपला गळीत हंगाम सुरू केला आहे. यामुळे सध्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये ऊस दराबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. चांगला म्हणजे नेमका किती दर देणार अशी चर्चा सध्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांम ध्ये सुरू आहे. अनेक कारखान्यांनी गतवर्षी चांगला



दर देणार असे जाहीर केले मात्र प्रत्यक्षात एकच हप्ता देत शेतकऱ्यांची मोठी फसवणूक केली आहे. बैलपोळा किंवा दिवाळी सणाला दुसरा हप्ता देणे अपेक्षित असताना अनेक कारखान्यांनी तो हप्ता दिलाच नाही. तर काही कारखान्यांनी गत हंगामात एकच हप्ता देत शेतकऱ्यांची मोठी फसवणूक केली आहे. यंदा पाऊसमान कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना ऊस जोपासताना जीव अक्षरशः मेटाकुटीला आला आहे. मशागत करणे ते ऊस जाईपर्यंतचा खर्च याचा ताळमेळ बसता बसेना .यामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पहिला हप्ता कमीत कमी म्हटलं तरी ३००० हजार रुपये व नंतरचा हप्ता ३०० ते ४०० रुपये देणे अपेक्षीत असताना सोलापूर जिल्ह्यातील कारखानदार अतिशय कमी दर देतात.

## एकनाथ शिंदेच मुख्यमंत्री हवेत यासाठी करमाळ्यात लाडक्या बहिणींनी केली महापूजा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२६ नोव्हेंबर-**

महाराष्ट्रात प्रचंड बहुमताने विक्रमी २४० जागा जिंकून महायुतीचे सरकार सत्तेत आले आहे.या विजयात लाडक्या बहिणींचा मोठा वाटा आहे. त्यामुळे करमाळ्यातील मुख्यमंत्र्यांच्या ५१ लाडक्या बहिणींचा सत्कार शिवसेनेच्या वतीने करण्यात आला

यावेळी महिलांनी आपले मनोगत व्यक्त करताना एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करा अशी मागणी केली. प्रभू श्रीराम ाच्या मंदिरात मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींचा सत्काराचा कार्यक्रम शिवसेनेच्या वतीने



आज घेण्यात आला.जे अभूतपूर्व यश मिळाले आहे ते लाडक्या बहिणींनी दिलेल्या मतदानामुळे मिळाली आहे.शिवसेना जिल्हाप्रम ुख महेश चिवटे तालुकाप्रमुख राहुल कानगुडे, शहर प्रमुख संजय शीलवंत जेऊर शहर प्रमुख माधव सूर्यवंशी, उपशहर प्रमुख निलेश चव्हाण, जेऊर शाखा प्रमुख संजय जगताप पांडुरंग जाधव गणेश आल्हाट, हनुमंत गुळवे, दीपक उतारी, आरएसएसचे राधेश्याम देवी, विजयकुमार देशपांडे, बबलू कुलकर्णी, भैय्या चिवटे शिवकुमार चिवटे सुनील वाईकर, पिंटू गायकवाड, चंद्रकांत कारंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. शहर प्रमुख महिला आघाडी कीर्ती स्वामी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ५१ महिलांना भगवी शाल व श्रीरामाची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे म्हणाले की, येणाऱ्या काळात जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका ह्या निवडणुका आहेत या निवडणुका जिंकायच्या असतील तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच असणे गरजेचे आहे. निवडणुका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा चेहरा पुढे करून लढवल्या आहेत. एकनाथ शिंदे सध्या महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकांच्या मनातला हृदयातला ताईत झाले आहेत. एकनाथ शिंदे यांचे मुख्यमंत्री पदासाठी नाव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषित करावे महेश चिवटे यांनी व्यक्त केली.



## करमाळयात संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२६ नोव्हेंबर-**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकामध्ये सामुदायिक बुद्धवंदना घेऊन संविधान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी करमाळा शहरातील अनेक नागरिक उपस्थित होते. यावेळी शेतकरी कामगार संघर्ष समितीचे संस्थापक सोलापूर जिल्हा अध्यक्ष दशरथ कांबळे, आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रमेश कांबळे, दलित सेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, अर्बन बँकेचे मॅनेजर एस.पी. कांबळे, पाटबंधारे विभागाचे उपअभियंता गौतम कांबळे, किसन जानराव, प्रमोद गायकवाड, भीमराव कांबळे, एल. यु. कांबळे, सुनील खरात, संतोष कांबळे, अनिकेत अडसूळ उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लक्ष्मी-आनंद विद्या मंदिरात अधिकारी आपल्या भेटीला मार्गदर्शन शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २६ नोव्हेंबर-**

श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित लक्ष्मी आनंद विद्या मंदिर व ज्युनि. कॉलेज टेंभुर्णी येथे अधिकारी घडविणारी शाळा या ब्रीद वाक्याचा अनुसरून अधिकारी आपल्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक संदेश देशमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी अभ्यासातील उदासीनता घालवली पाहिजे कारण जग वेगाने बदलत आहे. स्पर्धेच्या युगात वावरताना आपल्याला मोबाईलचा वापर हा केवळ माहिती व ज्ञानासाठीच करावा लागेल. प्राथमिक शिक्षणचा पायाच तुम्हाला स्पर्धा परीक्षेत तारेल. स्वप्न पाहायला मागे पडू नका ज्ञानाला कोणतीच मर्यादा नसते आणि अभ्यास ही काही तासात मोजायची गोष्ट नाही अशी अनेक उदाहरणे यावेळी सांगितली.

तसेच मंगेश काशीद यांनीही विद्यार्थ्यांना शिक्षण पैसे कमावण्याचे साधन नसून ते ज्ञानग्रहण करण्याचे साधन आहे या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच प्राचार्य विकास करळे यांनी संदेश देशमुख यांच्या घरची सर्व परिस्थिती संकटाच्या परिस्थितीवर केलेली मात याविषयी पडद्यामागची भूमिका स्पष्ट केली. संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे व सचिवा सुरज बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संदेश देशमुख, शै. संचालक मंगेश काशीद, प्राचार्य विकास करळे, पीआरओ सागर खुळे उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...

### कल्याणशेट्टी महाविद्यालयाकडून संविधान रॅलीचे आयोजन

**अक्कलकोट, दि. २६ नोव्हेंबर-**

**राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम**

भारतीय लोकशाहीचा विजय असो संविधान चिरायू होवो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो अशा घोषणा देत कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने स्वयंसेवकांनी संविधान रॅली काढून नागरिकांचे प्रबोधन केले. संविधान रॅली, हनूर चौक, विजय कामगार चौक, कारंजा परिसर, अडत बाजार, फत्तेसिंह चौक मार्गे काढण्यात आली. रॅलीचे नियोजन कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक राजशेखर पवार व प्राध्यापिका शितल झिंगाडे यांनी केले. रॅलीमध्ये प्रा. मनीषा शिंदे, प्रा. भीम सोनकांबळे, प्रा. शितल फुटाणे, प्रा. विद्याश्री वाले, प्रा. मधुबाला लोणारी, प्रा. शिल्पा धूमशेट्टी, प्रा. विद्या बिराजदार, महेश जोगदे यांनी सहभाग घेतला. उपक्रमाचे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी, संचालिका शामवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, समन्वयक प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी जूनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा यांनी स्वयंसेवकाचे अभिनंदन केले.



### कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात संविधान दिन साजरा

**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर-**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात भारतीय संविधान दिनाचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथमत: भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्रमुख मान्यवरांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी भारतीय संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. तसेच संविधानाचा जयघोष करण्यात आला. प्रमुख पाहुणे प्रा. शिवाजी काळे यांनी आपल्या मनोगतात,भारतीय संविधानाची निर्मिती,यामध्ये घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान, संविधानाचे मानवी जीवनात महत्व व संविधानाचे बाबतीत प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य याचे सविस्तर विवेचन केले. यावेळी त्यांनी स्वलिखित मराठवाड्याचा सुपूत्र या पुस्तकाच्या दोन प्रती मान्यवरांचे हस्ते ग्रंथालयास भेट स्वरुपात प्रदान केल्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुहासबप्पा सुतार, सतीश पाचकुडवे, राहुल गडदे, प्रेम अग्रवाल,अक्षय पोकळे, कार्तिक चवरे आदी वाचक व सभासद उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्तावित व सुत्रसंचालन ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी केले तर आभार हनुमंत तुपे यांनी मानले.



### शिवणे ग्रामपंचायत येथे संविधान दिन

**सांगोला, दि. २६ नोव्हेंबर -**

सांगोला तालुक्यातील शिवणे ग्रामपंचायत येथे अमृत महोत्सव भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संविधान दिन साजरा केला. यावेळी सांगोला पंचायत समितीचे आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत यांनी मनोगतात सन २४-२५ पासून घर घर संविधान कार्यक्रम साजरा करण्याबाबत शासनाने परिपत्रक काढले असून दि.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करून दि.२६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य, घडवण्याचा मार्ग दाखविला आहे असे मत व्यक्त केले. यावेळी संविधान उद्देशिकाची प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी सरपंच दादासो घाडगे, उपसरपंच उदयसिंह घाडगे, विस्तार अधिकारी देवराव पुकळे, पंचायत अधिकारी महेश लंगोटे, आरोग्य सेवक राहुल देवडकर, सेविका राणी ठाकूर, कृषी सेवक सतीश चव्हाण, आशा सेविका महादेवी वाळके, लिपिक नागेश बनसोडे, योजना दूत विजय कोळेकर उपस्थित होते.

### उमा महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**पंढरपूर, दि.२६ नोव्हेंबर-**

येथील श्री पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडळ पंढरपूर संचलित, उमा महाविद्यालयामध्ये २६ नोव्हेंबर हा संविधान दिन म्हणून साजरा करण्यात आला.यानिमित्ताने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. नारायण लोखंडे यांनी केले तर उद्देशिकेचे वाचन डॉ.दत्ता सरगर यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रा.सिंधू खिलारे यांनी मानले.

## परीक्षा देवून परतत असताना अपघात मायलेकीचा जागीच मृत्यू

### ट्रकने मोटर सायकलीस ठोकरले; अज्ञात ट्रक चालकाविरुध्द गुन्हा

**एकजण गंभीर जखमी**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२६ नोव्हेंबर-**

उमदी येथे परीक्षा देवून खवे गावाकडे परतत असताना उमदी-मंगळवेढा महामार्गावर भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने मोटरसायकल स्वारास पाठीमागून धडक दिल्याने त्यावरील मायलेकी जागीच ठार झाल्या तर मोटरसायकलस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी अज्ञात ट्रक चालकाविरुध्द मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी तथा जखमी गणपती धोंडीबा भोसले (वय ६० रा.जित्ती) हे दि. २५ नोव्हेंबर रोजी त्यांची मुलगी तथा मयत शांता धनाजी बाबर (वय २४ रा. कोळेवाडी ता. मोहोळ) व नात अनन्या धनाजी बाबर (वय ३ वर्षे) यांना उमदी येथे परीक्षेसाठी घेवून गेले होते. सदर मयत शांता ही परीक्षा देण्यासाठी मुंबईहून दि.२५ रोजी सकाळी ८ वाजता खवे येथे आली होती.

उमदी येथे परीक्षा देवून फिर्यादी तथा जखमी गणपत भोसले हे मयत मुलगी व नात यास एम.एच.१३ बी. ई.३३११ या मोटर सायकलवरुन पेपर सुटल्यानंतर उमदीहून खवे गावाकडे येत असताना दुपारी ३ वाजता सोड्डी पाठीजवळ ट्रक क्रमांक टी. एन. ४७ ए. एफ. ६९९१ वरील अज्ञात चालकाने भरधाव वेगात ट्रक चालवून मोटर सायकलीस पाठीमागून धडक दिल्याने दोघी मायलेकी जागीच ठार झाल्या तर फिर्यादी हे गंभीर जखमी झाल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान हा अपघात एवढा मोठा होता की, मयत स्त्रीच्या शरीराचे तुकडे तुकडे होवून ते रस्त्यावर विखुरले गेल्याचे चित्र होते. ही घटना घडताच परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले व त्यांनी फिर्यादी जखमीस मरवडे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. ट्रक चालक याने अपघातानंतर पलायन केले असून पोलीस त्या चालकाचा कसून शोध घेत आहेत.

## अप्पर तहसील कार्यालय रद्द करणार : पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २६ नोव्हेंबर-**

माजी आमदार राजन पाटील यांच्या विरोधामध्ये रोष होता, त्यांच्या विरोधामध्ये जनमत होते, ही गोष्ट मी अजित पवार यांच्या लक्षात आणून दिली होती, मात्र यांनी न ऐकल्याने मी पक्ष प्रवक्ते पदाचा राजीनामा दिला होता, मात्र सदस्यत्वाचा राजीनामा दिला नव्हता. येणाऱ्या काळात अप्पर तहसील रद्द करण्यासह जनतेला इतर दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाची मदत घ्यावी लागणार असून विशेष करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीही मदत लागणार असून अपर तहसील रद्द करण्याची मागणी करणार असल्याची माहिती राष्ट्रवादीचे माजी मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी दिली.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी मुख्य प्रवक्ते उमेश पाटील हे माध्यमांशी बोलताना पुढे म्हणाले की, मोहोळ तालुक्यामध्ये गेल्या ३० वर्षापासून माजी आमदार राजन पाटील यांच्याकडे निरंकुश सत्ता असल्याने अन्याय अत्याचार वाढले होते. यातच त्यांनी मोहोळ येथील दुय्यम निबंधक कार्यालय ठाणे अप्पर तहसील कार्यालय आहे दोन भागातशासकीय कार्यालय अनगर येथे घेऊन गेल्याने जनतेमध्ये प्रचंड असंतोष आणि रोष निर्माण झाला होता. त्यांच्या विरोधामध्ये जनमत असल्याने त्यांचा उमेदवार निवडून येणार नाही, असे मी वारंवार अजित दादा पवार यांना सांगितले होते. राजन पाटील यांचा तुतारीकडे जाण्याचा कल आहे, त्यामुळे पक्षाचा उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी घेतो, मात्र त्यांनी ऐकले नाही. आम्ही घड्याळाकडे असतो तरीही हीच परिस्थिती राहिली असती उलट लाडकी बहीण आणि अंडर करंट यामुळे ६० हजारच्या पुढे मताधिक्य गेले असते, असे म्हणत अप्पर तहसील कार्यालय विरोधात तालुक्यातील सर्वपक्षीय नेते व जनता पेटून उठले होते. आणि हेच कारण राजन पाटील यांच्या विरोधामध्ये सर्व एकत्र यायला कारणीभूत ठरले. मी सुद्धा पक्षप्रवक्ते पदाचा राजीनामा देऊन पूर्ण ताकतीने या लढाईमध्ये सर्वांना घेऊन उतरलो होतो. अखेर भारताला स्वातंत्र्य होऊन ७५ वर्षे होऊन गेली असली तरी २३ नोव्हेंबर हा तालुक्याला खरा स्वातंत्र्य मिळवून देणारा दिवस *असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विजयानंतर अभिनंदन साठी मला व उमेदवार राजू खरे यांना फोन आला होता, असे सांगत जय पराजय हा मोठ्या मनाने स्वीकारायचा असतो. खरेतर विजयी उमेदवाराचे अभिनंदन करण्यासाठी राजन पाटील यांचा सुद्धा फोन येणे अपेक्षित होते, मात्र वारसा हक्काने राजकारणात आलेल्या नेत्यांना हे राजकारण कळणार नाही, असेही उमेश पाटील यांनी पुढे बोलताना सांगितले.

## सोजर इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर**

येथील सोजर इंग्लिश स्कूल प्राथमिक विभागाच्यावतीने २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रिटा नेटके यांनी सर्व शिक्षकांसमवेत संविधानाचे जनक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले. यावेळी शिक्षक प्रसाद सहस्त्रबुद्धे यांनी संविधान निर्मिती बाबतची माहिती मुलांना सांगितली. शिक्षिका सौ. अस्मा मुलाणी यांच्या नेतृत्वाखाली संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.



## कुलकर्णी यांना कृतीशील शिक्षक पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीतर्फे दरवर्षी शिक्षकांनी केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून कृतिशील शिक्षक हा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीचा हा पुरस्कार येथील द.ह. कवठेकर प्रशालेचे इंग्रजी विषयाचे तज्ञशिक्षक एस.एम.कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे. माजी शिक्षक आमदार तथा महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे प्रदेश सचिव दत्तात्रय सावंत यांनी येथील द.ह.कवठेकर प्रशालेचे शिक्षक एस.एम.कुलकर्णी यांना या बाबतची पत्राद्वारे माहिती दिली. येत्या १ डिसेंबर रोजी हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.पुरस्कार जाहीर झाल्यानंतर सोमवारी (ता.२५) द.ह.कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.एम. कुलकर्णी यांच्या हस्ते एस. एम. कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापक नृ.बा.बडवे, राजेश धोकटे, जा.मु.शेलार, राजेश खिस्ते उपस्थित होते.

## कडाक्याची थंडी; रस्त्याच्या कडेला पेटल्या शेकोट्या

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२६ नोव्हेंबर-**

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने गेल्या काही दिवसांपासून उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यात वाढ झाली आहे. यामुळे नागरिकांना आता बोचऱ्या थंडीला सामोरे जावे लागत आहे. रोज सायंकाळी सहा वाजल्यापासून थंडी व पहाटे दाट धुक्याचा सामना करावा लागतो आहे.

करमाळा तालुक्यात गेल्या सहा दिवसापासून अचानक थंडीत वाढ झाल्याने लोकांना कडाक्याच्या थंडीला समोर जावे लागत आहे.त्यामुळे लोक घराबाहेर, चौकात, रस्त्याच्या कडेला शेकोट्या पेटवून ऊब घेत



आहेत. सायंकाळी सहानंतर हवेत गारवा निर्माण होण्यास सुरुवात होत आहे. त्यामुळे घराबाहेर पडणे अवघड झाले आहे.यंदा सर्वत्र भरपूर पाऊस झाल्याने विविध ठिकाणी पाणी साठून सर्व माळरान हिरवेगार आहे त्यामुळे वातावरणात गारवा जास्तच जणवतो आहे. सायंकाळी व पहाटे घराबाहेर पडणाऱ्यांना स्वेटर, मफलेर, कानटोपी इत्यादी उबदार वस्त्रे घालावी लागत आहेत. या कडाक्याच्या थंडीने रात्रीची लाईट असल्याने पिकासाठी पाणी देण्यासाठी जाणारे शेतकरी, ऊसतोड कामगार, शहरात दूध पुरवणारे, ट्यूशनला जाणारे शाळकरी मुले पुरते बेजार झाले आहेत. ही थंडी सहन न झाल्याने सर्दी, खोकला, ताप व अंगदुखी या आजारांनी लोक वैतागून गेले आहेत. यंदाच्या या कडाक्याचे थंडीने तालुक्यातील गहू, हरभरा ही रब्बी पिके मात्र जोमात वाढताना दिसत आहेत.

## रयतेचा राजा : राजा शिवछत्रपती महानाट्याचे आयोजन

### संग्रामसिंह मोहिते पाटील यांची माहिती; २ व ३ डिसेंबर रोजी आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २६ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्याचे जाणते राजे जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त दिनांक २ व ३ डिसेंबर रोजी सायंकाळी ६:३० वाजता रयतेचा राजा : राजा शिवछत्रपती या महानाट्याचे आयोजन केले असल्याची माहिती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी दिली. यावेळी सयाजीराजे मोहिते-पाटील प्रमुख उपस्थितीत होते.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती अकलूज, शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना कामगार वर्ग यांचे वतीने श्री विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल, अकलूज येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या सहकाऱ्यांच्या जीवनावर आधारित १८ वास्तववादी घटनांचा समावेश असणारा ज्वलंत इतिहास रयतेचा राजा- राजा शिवछत्रपती या महानाट्याच्या रूपाने लाखो रसिकांना पाहण्यास मिळणार आहे. या महानाट्यासाठी क्रीडा संकुल येथे १२५ फूट लांब व ७० फूट रुंद असा भव्य रंगमंच उभारला आहे. या महानाट्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत चित्रपट कलावंत शंतनू मोघे, जिजाऊंच्या भूमिकेत अभिनेत्री पल्लवी वैद्य, बाजीप्रभूंच्या भूमिकेत अभिनेते रवींद्र कुलकर्णी आणि अफजल खानाच्या भूमिकेत अभिनेते विश्वजीत फडते यांच्यासह स्थानिक ९००हून अधिक कलाकारांचा समावेश आहे. याचे लेखक युवराज पाटील, दिग्दर्शक अभिनेते अजय तपकिरे,सूत्रधार डॉ. विश्वनाथ आवड आहेत. या महानाट्यात घोडे, बैलगाड्या, पायदळ, मावळे दिसणार आहेत. या महानाट्यात शिव जन्मापासून ते शिवराज्याभिषेक सोहळ्यापर्यंतच्या ऐतिहासिक घटनांचे व छत्रपती शिवाजी महाराजांच्या सहकाऱ्यांच्या शौर्याची गाथा उलगडणार आहे. या दोन दिवसांच्या महानाट्यासाठी सुमारे एक लाखहून अधिक रसिक प्रेक्षक उपस्थित राहणार आहेत. यासाठी क्रीडा संकुल येथे महिला व पुरुष अशी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. या महानाट्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, सदस्या स्वरुपाराणी मोहिते-पाटील,सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली विविध कमिट्या कार्यरत असून क्रीडा संकुल येथे याची जय्यत तयारी सुरू आहे. यावेळी सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील उपस्थित होते.





रयतेचा राजा : राजा शिवछत्रपती या महानाट्याविषयी माहिती देताना संग्रामसिंह मोहिते पाटील व सयाजीराजे मोहिते-पाटील.

शिवप्रभुच्या कार्यकर्तृत्वाला मानाचा मुजरा करीत असताना १९७४ साली म्हणजे ५० वर्षे अगोदर सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी ३०० वा राज्याभिषेक सोहळा आयोजित केला होता. छत्रपती शिवरायांचा आदर्श मानून वाटचाल करणारे जयसिंह मोहिते पाटील ऊर्फ बाळदादा यांनी समस्त अकलूजकरांच्या साक्षीने पडक्या किल्याचा जीर्णोद्धार करून मरगळलेल्या मनात उत्साह भरला होता. आजपर्यंत शिवाजी महाराजांचे कार्यकर्तृत्व समाजासमोर मांडण्यासाठी बाळदादांनी जाणता राजा या महानाटयाचे २२ वेळा आयोजन केले. गड आला पण सिंह गेला या लघुनाटयाचेही सादरीकरण केले, छत्रपती शिवरायांच्या जीवनावर आधारीत असलेली शिवसृष्टी उभारण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे. सन २०१९ साली 'रयतेचा राजा : राजा शिवछत्रपती' या महानाटयाचे आयोजन केले. ६ जून २०२२ रोजी शिवपार्वती मंदिर येथे छत्रपती शिवरायांच्या पुतळा पुर्नस्थापना सोहळ्याचे त्यांनी आयोजन केले. सामाजिक,सांस्कृतिक, शैक्षणिक, कला व क्रीडा क्षेत्रात बाळदादांनी अनेक भव्य उपक्रमांचे आयोजन करून यशस्वी केले आहे. यावर्षी शिवराज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत त्यानिमित्ताने पुन्हा एकदा 'रयतेचा राजा : राजा शिवछत्रपती' हे भव्य- दिव्य महानाट्य साकारले जाणार आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पारगाव येथे तानाजी सावंत यांच्या विजयाचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२६ नोव्हेंबर -**
२३ नोव्हेंबरला झालेल्या भूम-परंडा-वाशी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये माहितीचे उमेदवार तानाजी सावंत हे विजय झाल्याने पारगाव येथे ढोल ताशाच्या गजरामध्ये फटाके फोडून गुलाल उधळून आनंद उत्सव साजरा करण्यात आला.



भूम-परंडा-वाशी मध्ये अटीतटीच्या झालेल्या लढतीमध्ये तानाजी सावंत हे विजयी झाल्याचे कळतात पारगाव पंचायत समिती गण मधून सर्वच गावातील कार्यकर्त्यांनी आपापल्या गावांमध्ये आनंद साजरा केला. पारगाव गणातील पारगाव, हातोला, पिंपळगाव कमळेश्वर या तीनही ग्रामपंचायत मधून महायुतीचे उमेदवार तानाजी सावंत यांना आघाडी मिळाली.

यावेळी पारगाव सह पंचायत समिती गणातील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते व मतदार उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## ▶▶क्राईम वृत्त...



### मलकापूर येथे संविधान दिन साजरा

**येरमाळा, दि.२६ नोव्हेंबर -**
कळंब तालुक्यातील मलकापूर येथे ७५ वा संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे आणि भारतीय संविधानाचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच सौ रुक्मीण घोळवे, ग्राम पंचायत सदस्य सुधीर पायाळे, बिभीषण काकडे, नामदेव जमाले, अशोक लोमटे, अनिल लोमटे, आगत घोळवे, महादेव शिंदे, नंदू शिंदे, फुलचंद लोमटे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



### जळकोटवाडीत संविधान दिन, हुतात्म्यांना अभिवादन

**जळकोट, दि.२६ नोव्हेंबर -**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जळकोटवाडी (नळ) येथे भारतीय संविधान दिन साजरा करून २६/११ दहशतवादी हल्ल्यातील मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना आणि शहीद जवानांना अभिवादन करण्यात आले. यावेळी संविधान उद्देशिकाचे व प्रस्तावनाचे वाचन करण्यात आले. सरपंच शिवाजी कदम यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक उमेश भोसले, अशोक राठोड यांनी आपले विचार व्यक्त केले. संविधान विषयी सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात संविधान दिन साजरा

**कदेर, दि.२६ नोव्हेंबर -**
भारत शिक्षण संस्था उमरगा संचलित, श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय, तलमोड (ता. उमरगा) शाळेत आज दि.२६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी संविधान अमृत महोत्सव निमित्त हर घर संविधान कार्यक्रम साजरा करणे बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली. तसेच २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक विराज मोरे हे होते. तसेच एम.आर. सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक तर आभार जे.जी. जाधव यांनी मांडले. यावेळी सहशिक्षक के.बी. माळी, एन.एच. राठोड, ए.एस. बिराजदार, एन.टी. वडदरे आणि शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते.



### जागतिक वारसा सप्ताहानिमित्ताने चित्रकला स्पर्धा संपन्न

**तेर, दि.२६ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे जागतिक वारसा सप्ताहामुळे चित्रकला स्पर्धा संपन्न झाली. कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय पुराणवस्तू संग्रहालयात ५ वी, ८ वी व ८ वी ते १० या दोन गटात चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कलाशिक्षक नवनाथ पांचाळ, एस.टी. गागुडे यांनी परिश्रम घेतले.

### कुंभारी जि.प. प्राथमिक शाळेत संविधान दिन उत्साहात साजरा

**मंगरूळ, दि.२६ नोव्हेंबर -**
विविध धर्म, संप्रदाय, भाषा, चालिरीती असतानाही, सर्वांमध्ये एकात्मता उत्पन्न करणारे असे देशाचे संविधान आहे. २६ नोव्हेंबर हा देशभरात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. त्याअनुषंगाने तुळजापूर तालुक्यातील कुंभारी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मंगळवार दि.२६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक पोपट सुरवसे तर आभार विजयकुमार गायकवाड यांनी मानले. यावेळी तात्यासाहेब पारधे, लक्ष्मी पारधे, रेश्मा दिलपाक, अंगणवाडी सेविका मेघा इंगळे, सहशिक्षक पोपट सुरवसे, विजयकुमार गायकवाड, सहशिक्षिका वासंती गायकवाड, सुप्रिया स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते.

## उत्पत्ती एकादशीनिमित्त संत गोरोबाकाका मंदिरात भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२६ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे श्री संत गोरोबाकाका याचे समाधी मंदिर असून याठिकाणी प्रत्येक महिन्याच्या एकादशी निमित्ताने मोठ्या प्रमाणात भाविक येतात. मंगळवारी उत्पत्ती एकादशी निमित्ताने याठिकाणी हजारो भाविकांनी दर्शन घेतले. कार्तिक एकादशीला संत गोरोबाकाका यांची पालखी सोहळा पंढरपूर येथे पाई गेला होता. रविवारी पालखी सोहळा तेरमध्ये दाखल झाला होता.

जिल्ह्यातील तेर या ठिकाणी श्री संत गोरोबाकाका याचे समाधी मंदीर असून याठिकाणी प्रत्येक महिन्याच्या एकादशी संत गोरोबाकाका याच्या दर्शनासाठी येतात.



मंगळवारी उत्पत्ती एकादशी तसेच कार्तिक एकादशीला संत गोरोबाकाका यांची पालखी सोहळा पंढरपूर येथे पाई गेला होता. रविवारी पालखी सोहळा तेर मध्ये दाखल झाला होता.

यानिमित्ताने वारकरी दिंड्यांसह भाविकांची गर्दी पाहयला मिळाली. धाराशिव जिल्ह्यातील अनेक गावातील भावीक मोठ्या प्रमाणावर येथे येतात.

मंगळवारी उत्पत्ती एकादशी निमित्ताने येथे मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थित होते. दर्शन रांगत मोठ्या प्रमाणावर गर्दी होती. तसेच याठिकाणी वारकरी दिंड्या मोठ्या प्रमाणावर दाखल झाले होत्या. सकाळपासून मंदिरात भाविक महिलांची गर्दी पाहिला मिळाली.

परिसर हारीनामाच्या गजराने दुमदुमून निघाला तर भाविकांची गर्दीने मंदिर व परिसर फुलून निघाला होता.



## तडवळे येथे महा बँकेचा भोंगळ कारभार; ग्राहकांना नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.२६ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथील बँक ऑफ महाराष्ट्र बँकेत लाईट गेल्याने दिवसभर खातेदारांच्या सोईवर पाणी फिरले. बँकेत असलेले इन्व्हर्टर सेवा पूर्णत्व खराब झाल्याचे सांगण्यात आले. या प्रकारामुळे येथील महा बँकेचा भोंगळ कारभार पुन्हा चव्हाट्यावर आला आहे. यामुळे ग्राहकांत संताप निर्माण झाला आहे.

तब्बल सहा गावाचे कनेक्शन असणारी बँक ऑफ महाराष्ट्र म्हणून ओळखली जाणारी बँक या बँकेत सर्व मनमानी चालते असे खातेदारांच्या माध्यमातून बोलले जात आहे. मोठ्या प्रमाणात व्यवहार होणारी बँक या बँकेला कसल्याही प्रकारची लाईट गेल्या नंतर सोय नसल्याने गावातील तसेच परिसरातील खातेदारांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होत आहे. बाहेर गावातील वयस्कर वृद्ध मंडळी दिवसभर ब्यंकेच्या आवारात ताटकळत बसून बसून कंटाळून परत जात होते. ही काल मंगळवार नव्हे लाईट गेली की बँकेचे व्यवहार बंद करतात. तसेच केवायसीच्या माध्यमातून दोन अडीच महिने खेळवले जाते.

या अनेक अडचणीचा सामना ग्राम स्थांना करावा लागतो. ही सेवा सुरळीत होऊ शकेल का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

## घट्टेवाडी येथे दोन पोटच्या लेकरांचा जीव घेऊन आईनेही केली आत्महत्या

### पाण्याच्या ड्रममध्ये दोन्ही मुलांना बुडवून महिलेने घराच्या आडुला घेतला गळफास...

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२६ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील घट्टेवाडी येथे पोटच्या मुलाला व मुलीला पाण्याच्या ड्रममध्ये बुडवून स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवार दि.२४ रोजी सायंकाळी घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, राधिका गणेश घट्टे (वय २५) हिने श्रेया गणेश घट्टे (वय २) व श्रेयस गणेश घट्टे वय (४ महिने) या बालकांना घरातील वेगवेगळ्या पाण्याच्या ड्रममध्ये बुडविले व स्वतः घरातील पत्र्याच्या आडूला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची फिर्याद मयत राधिका हिच्या दिराने नळदुर्ग पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



काटगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करून नळदुर्ग येथील आरोग्य केंद्रात तिघांचा मृतदेह ठेवण्यात आला होता.

सोमवारी दि.२५ रोजी दुपारी नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. मृतांवर घट्टेवाडी येथे सायंकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या दुर्दैवी घटनेने घट्टेवाडी सह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## तेर येथे विविध ठिकाणी संविधान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक तेर येथे भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी तेर केंद्र प्रमुख अनिल पडवळ यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी केंद्र मुख्याध्यापक गोरोबा पाडुळे यांना विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाबदल माहिती सांगितली. संविधान दिन का साजरा केला जातो. याबाबत सविस्तर माहिती पाडुळे यांनी सांगितले. यावेळी धनंजय थोडसरे, नवनाथ चंदनशिवे, बाळासाहेब कानाडे, नूसरत बेगम अन्सारी, अनिता पांढरे आदी शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. तेर येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये संविधान दिनानिमित्त प्रतिमा पुजन सरपंच दिदी काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य नवनाथ पसारे, नामदेव कांबळे, लखन रसाळ, महेंद्र रसाळ, बाळासाहेब रसाळ, वैभव डिंगे, आशपाक शेख, अविनाश खाडेंकर, आप्पा काळे आदी उपस्थित होते.

## भोसले हायस्कूलमध्ये संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**
शहरातील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला.

प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राजेंद्र प्रसाद संविधानासह प्रतिमापुजन करुन पर्यवेक्षक तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख राजेंद्र जाधव यांनी संविधान विषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

याप्रसंगी शेषनाथ वाघ, भारत गवळी, सुरेंद्र पडवळ, अमितकुमार काकडे, दिपक केंगा शिक्षक शिक्षिका वृंद उपस्थित होते.

## जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी भूमीपुत्रास मिळावे कॅबिनेट मंत्रीपद

### जिल्ह्यातील महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ नोव्हेंबर -**
तुळजापुर तालुक्यासह संपुर्ण धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी तुळजापुर विधानसभा मतदार संघाचे भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळणे गरजेचे आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यात विकास करण्याची धमक आहे. त्यामुळे त्यांची कॅबिनेटमध्ये वर्णी लागण्याची नितांत गरज आहे.



आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी धाराशिव जिल्ह्यातुन सर्वाधिक मताधिक्याने निवडुन येण्याचा मान मिळविला आहे. त्याचबरोबर तुळजापुर विधानसभा मतदार संघात सलग दुसऱ्यांदा भाजपचा झेंडा फडकविण्याचे काम त्यांनी केले आहे. तुळजापुर तालुक्यासह धाराशिव जिल्ह्यात भाजपची ताकद वाढविण्यासाठी तसेच येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकामध्ये भाजपला मोठे यश मिळविण्यासाठी आ. राणाजगजितसिंह पाटील हे कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे आहे.

तुळजापुर विधानसभा मतदार संघातील सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घेऊन त्यांनी सर्वांच्या विकासासाठी काम केले आहे. पावन तुळजापुर नगरीत राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे भव्य स्मारक, ऐतिहासिक नळदुर्ग शहरात राज्यातील पहिली बसवसृष्टी साकरण्याचे काम, नळदुर्ग येथे हरीत क्रांतीचे प्रणेते राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचे भव्य स्मारक उभारण्याचे काम, नळदुर्ग शहराची पुढील ३० वर्षाची गरज लक्षात घेऊन ४८ कोटी रुपये खर्चाच्या पाणीपुरवठा योजनेचे काम, नळदुर्ग येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित, कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाचे काम यासह अनेक महत्वाची कामे आ. पाटील यांनी केले आहेत. त्याचबरोबर येणाऱ्या काळात तुळजापुर तालुक्यातील तामलवाडी येथे ३७० एकर जमिनीवर नवीन एमआयडीसी उभारून यामध्ये १२ हजार रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट यासह नळदुर्ग तालुका निर्मितीचा प्रश्न लवकर मार्गी लागण्यासाठी आ. पाटील हे कॅबिनेट मंत्री होणे गरजेचे आहे.

विकासाची कामे करुन त्यांनी जनमानसात आपले अढळ स्थान निर्माण केले आणि याच्याच जोरावर त्यांनी विधानसभा निवडणुक मोठ्या ताकदीने लढवुन मोठा विजय मिळविला आहे, असे लढवय्ये आणि कायम विकास काम नागरीकांची अपेक्षा आहे.

## संत मीरा पब्लिक स्कूल येथे वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२६ नोव्हेंबर -**
येथील संत मीरा पब्लिक स्कूल येथे दरवर्षी प्रमाणे वार्षिक शाळा अंतर्गत क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा सप्ताहमध्ये वेगवेगळे वैयक्तिक व सांघिक खेळ घेतले जातात.

यामध्ये नर्सरी ते यु.के.जी साठी बलून ब्लास्ट, बिस्कीट इटिंग, रनिंग, संगीत खुर्ची, इ. १ ली ते १० वी साठी लेमन अँड स्पून, म्युझिकल चेअर, बलून ब्लास्ट आणि बुक बॅलन्स, स्लो सायकल, लॉन्ग जंप, सॅक जंप इ वैयक्तिक तर खो-खो, कबड्डी, क्रिकेट, व्हॉलीबॉल, रस्सी-खेच इ. सांघिक खेळ घेतले जाणार आहेत. या क्रीडा स्पर्धाचे उदघाटन मेजर महावीर तनपुरे, सहदेव गिरवले, कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य ॲड. अनिकेत काशिद, ॲड. पृथ्वीराज सद्दिवाल, हनुमंत विटकर, रत्नकांत शिंदे, महादेवी विटकर, दीपाली मोरे, मेघापंजाब घाडगे, दुर्गाप्पा पवार, रणजित रोहिटे, मेघा खैरे, कृषी विद्यालय डोणजेचे प्राचार्य अशोक राठोड, सावित्रीबाई औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे प्राचार्य प्रसाद अंधारे व प्राचार्य संतोष भांडवलकर यांच्या हस्ते करण्यात आले. उदघाटन प्रसंगी सुरवातीला प्रत्येक गटाला (हाऊस) मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक झेंडा वाटप करून 'फ्लॅग सेरेमनी' साजरा करण्यात आला. त्यानंतर शाळेतून जे विद्यार्थी विभागीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धे साठी निवड झालेले आहेत यांना मान्यवरांच्या हस्ते ज्योत देण्यात आली.

या क्रीडा स्पर्धेसाठी संस्था अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, आमदार तथा उपाध्यक्ष डॉ. राहुल पाटील, सचिव डॉ. उदयसिंह पाटील व संचालक डॉ. शिल्पा पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

काँग्रेसच्या बालेकिल्ला उध्वस्त करीत भाजपा महायुतीने केला गड सर... माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांना उमेदवारी नाकारल्यानेच काँग्रेसचे पानिपत...

## भाजपाचे युवा नेते सुनील चव्हाण यांच्या योग्य नियोजनामुळे महायुतीला प्रचंड मताधिक्य

**तभा वृत्तसेवा / दिनेश सलगरे**
**इटकळ, दि.२६ नोव्हेंबर -**
नुकताच महाराष्ट्र विधानसभेचा निकाल जाहीर झाला आणि न भूतो न भविष्यती असा विजय विकासात्मक कामावर भाजपा महायुतीने मिळवत एक हाती सत्ता काबीज करीत विरोधकाचा धुव्वा उडविला.

तुळजापुर विधानसभा मतदार संघात लोकसभेस महविकास आघाडीस जवळपास ५४ हजाराचे मताधिक्य होते.



त्यामुळे तुळजापूर विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून येईल असे वाटत असतानाच ऐनवेळी काँग्रेसचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांना काँग्रेसने उमेदवारी नाकारली व धीरज पाटील यांना काँग्रेसने उमेदवारी दिली आणि इथेच महाविकास आघाडीचा पराभव झाला.

चव्हाण यांनी तुळजापुर तालुक्यात केलेली विकासात्मक कामे व वाड्या वस्त्यावर प्रत्येक जण चव्हाण यांना भरभरून प्रेम करतात यावेळी मधुकरराव चव्हाण यांना उमेदवारी नाकारली असल्याने ग्रामीण भागातील मतदार हा भाजपा महायुतीच्या पारड्यात मत देत काँग्रेसचा धिक्कार केला.

भाजपाचे युवा नेते सुनील चव्हाण यांनी प्रचार यंत्रणेचे योग्य नियोजन करीत ग्रामीण भागात भाजपा महायुतीस लीड मिळवून दिली.

तब्बल ३६ हजाराच्या मताधिक्याने भाजपा महायुतीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील हे तुळजापुर विधानसभा मतदार संघातून सलग दुसऱ्यांदा विजयी झाले. आणि तुळजापुर तालुका हा भाजपा महायुतीचा बालेकिल्लाच झाला म्हणण्यास वावगे ठरणार नाही.

# कमळ दुसऱ्यांदा फुलले; काँग्रेसला आक्रमकतेची गरज

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२६ नोव्हेंबर -**

एकेकाळी तुळजापूर विधानसभा हा एकतर्फी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. या बालेकिल्लाला गेल्या वेळेस भाजपाने सुरुंग लावून उध्वस्त केला. भाजपाच्या रणनीतीने गेल्या पाच वर्षात तुळजापूर मतदारसंघावर पकड मजबूत केल्याने, सलग दुसऱ्यांदा या विधानसभेवर पुन्हा एकदा कमळ फ ुलले आहे. तर काँग्रेसची धिम्या गतीने होत असलेल्या वाटचालीला आपली रणनीती आक्रमक करण्याची गरज आहे.

आई तुळजाभवानीच्या आशीर्वादाने महाराष्ट्रच्या राजकारणाच्या नकाशावर तुळजापूरला खूप महत्व आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी आहे. या ठिकाणी अनेक जण आशीर्वाद घेऊन आपली राजकीय वाटचाल सुरू करतात. अशा पावन मतदारसंघात काँग्रेसचा पराभव हा भूतकाळात घेऊन जातो. कारणही तसेच आहे. काँग्रेसच्या सत्ता काळात तालुक्याचा विकास झाला आहे. हेही नाकारता येत नाही. माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, माजी आमदार, शिक्षण महर्षी कै. सि.ना. गुरुजी, माजी आमदार कै. शिवाजीराव पाटील बाबळगावकर व माजी विधान परिषद सदस्य कै. नरेंद्र बोरगावकर यांच्या कार्यकाळात सहकारी साखर कारखाना, सूतगिरणी, शैक्षणिक संस्था, सिंचन सुविधा, रस्ते, दळणवळण आदि विकास कामे झाली आहेत. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे मधुकरराव चव्हाण हे अध्यक्ष असताना तालुक्यात छोटी छोटी तलाव करून पाणी जागेवर जिरवण्याचे काम त्यांनी केले आहे. काँग्रेसचा प्रदीर्घकाळ तुळजापूर मतदारसंघावर कब्जा राहिला आहे. परंतु काँग्रेसच्या काही नेते मंडळींनी दुसऱ्या पक्षाची वाट धरल्याने काँग्रेसला उघड्यावर पडण्याचे दिवस आले आहेत. एकेकाळी भाजपाला कार्यकर्ते मिळत नव्हते. त्याकाळी बोटावर मोजण्याइतके कार्यकर्ते भाजपात होते. संथगतीने भारतीय जनता पार्टी कमळाला हळूहळू फुलवले आहे. केंद्रात व राज्यात भाजपाच्या सत्तेमुळे तुळजापूर तालुक्यातील काँग्रेस हळूहळू नष्ट करण्याचा विडा उचलला गेला आहे.



तुळजापूर आणि काँग्रेस हे एक समीकरण राहिलेला मतदारसंघ आहे. या सम ीकरणाची बेरीज भाजपाच्या गोटात अधिक झाल्याने आगामी काळात भाजपासमोर तालुका व गावातील नेते मंडळी सांभाळणे कठीण लक्ष राहणार आहे.

सध्या काँग्रेस बॅकफूटवर आहे. याचे आत्मपरीक्षण होईलच. यावर रणनीती आखली जाईल. परंतु काँग्रेसला आक्रम क होण्याची गरज निर्माण झाली आहे. तालुक्यातील प्रश्न घेऊन जनता दरबारात जावे लागेल. पक्ष फुटीवर लक्ष द्यावे लागेल. भाजपात गेलेली नेते मंडळी एकेकाळी काँग्रेसला मानणारा वर्ग होता. परंतु राजकारणात ज्याची चलती आहे. त्याचे भले होते म्हणतात. तेच राजकीय वातावरण तालुक्यात आहे. नव्या कार्यकर्त्यांची बांधणी करुन संघटन मजबूत करण्याकडे काँग्रेसला लक्ष द्यावे लागेल. महाविकास आघाडीतील घटक पक्षांना सोबत घ्यावे लागेल. हेच निवडणूक विश्लेषणातून स्पष्ट होते. भारतीय जनता पार्टी दुसऱ्यांदा कमळ फुलवण्यात यशस्वी ठरली आहे. त्यांची मजबूत पकड आता तुळजापूर तालुक्यावर आहे. यात तीळ मात्र शंका नाही. विकास कामाचा धडाका भाजपाच्या नव्या आमदारांना लावावा लागेल. रखडलेले प्रश्न मार्गी लावावे लागतील. जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी लागेल. भाजपातील कार्यकर्त्यामधील कायम आपल्याला संवाद कायम ठेवावा लागेल. तर काँग्रेसला आगामी जिल्हा परिषद व पंचायत समि तीच्या निवडणुका तोंडावर आल्या असून केव्हाही होऊ शकतात. अशी दाट शक्यता आहे. जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेस व मित्र पक्षांना निष्ठावान कार्यकर्त्यांना न्याय द्यावा लागेल. पक्षाचे धोरण जनतेसमोर आणावे लागेल. अन्यथा लाडक्या बहिणी परत एकदा अन्यथा देणार नाहीत.

तुळजापूर तालुक्यात कमळ दुसऱ्यांदा फुलवून काँग्रेसला रोखण्यात यश मिळवले आहे. तर काँग्रेस उमेदवाराचा ३६ हजार मतानी झालेला पराभवाचे आत्मपरीक्षण करून आक्रमक पवित्रा घेण्याची गरज आहे. तरच या पुढच्या निवडणुका लढण्यासाठी कार्यकर्त्यांना बळ येणार आहे.

# जयप्रकाश विद्यालयात संविधान दिन साजरा; शहिदांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रुईभर येथे संविधान दिन साजरा व २६/११ म ुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना अभिवादन करण्यात आले.

डॉ आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षि सुभाष कोळगे यांच्या हस्ते संविधान स्विकृती प्रतिमेचे पुजन करण्यात आले. नंतर गावात प्रभात फेरी काढण्यात आली.

विद्यालयाच्या प्रांगणात डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षि सुभाष कोळगे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले. प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी संविधान दिन व २६/११ अतिरेकी कार्यवाहिची माहिती सांगताना म्हणाले की संविधानामुळे लोकशाही बळकट होते. समता, बंधुता, न्याय या तत्वानी अंगीकारलेले संविधान आहे. संविधान २ वर्ष ११ महिने १८ दिवस या दिर्घ कालावधीत पूर्ण केले.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्विकारले म्हणून हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. प्रत्येकाला हक्क, कर्तव्य संविधानामुळे मिळाले. या संविधानाने आपल्याला स्वातंत्र्य व हक्क दिले त्याच बरोबर आपण कर्तव्य ही पार पाडले पाहिजे. संविधानाचे पालन केले तर देशाची प्रगती निश्चित होते.

प्रत्येकांनी हक्का बरोबर कर्तव्य ही पार पाडले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यालयातील सहशिक्षक योहान वसावे यांनीही संविधानाची सखोल माहिती सांगून २६/११ रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्याची माहिती याप्रसंगी सांगितली.

याप्रसंगी प्रशासकिय अधिकारी शिवकन्या सांळुके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, हरित सेना प्रमुख विकास क्षिरसागर, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी ही उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अभिजित घोळवे यांनी तर आभार सचिन कांबळे यांनी मानले.

# धाराशिवात शिवसेनेकडून पेढे वाटून फटाक्याची आतषबाजी करत जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने ऐतिहासिक विजय मिळवत बहुमतात आपले सरकार स्थापन करणार असल्याने व माता-भगिनी व जनतेने दिलेला कौल यांचे आभार मानण्यासाठी शिवसेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून फटाक्याची आतिषबाजी व पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला.

तसेच धारासुर मर्दिनी देवीला देखील पुष्पहार अर्पण करून आतिषबाजी करत पेढे वाटप करण्यात आले. सुनील शेरखाने, अमित बनसोडेरणजीत चौधरी, सागर कदम, अमर माळी, आकाश कोकाटे, अजय नाईकवाडी, प्रवीण पवार, सादिक भाई तांबोळी, पप्पू बागल, दिनेश तुपे, अजिंक्य आगलावे, अविनाश टापरे, अतुल टापरे, आदित्य गवंडी, अमर मडके, सागर माळी, मयूर माळी, कृष्णा घोणे, सुरज राऊत, अक्षय शेंडगे, नागेश थोरबोले, आदित्य थोरात यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जळकोट येथे भाजप बूथ प्रमुखांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२६ नोव्हेंबर -**

तुळजापूर विधानसभा मतदारसंघावर सलग दुसऱ्यांदा भाजपाचा झेंडा फडकला आहे. आ. राणाजगजीतसिंह पाटील यांच्या विजयामध्ये महत्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या जळकोट येथे मतदान केंद्र भाजपाच्या बूथप्रमुखांचा सत्कार करण्यात आला. मेरा बूथ सबसे मजबूत हि भाजपाची संकल्पना प्रत्यक्षात या निवडणुकीत दिसून आली.

तुळजापूर विधानसभा निवडणुकीत महायुतीचे आमदार राणाजगजीतसिंह पाटील हे ३६ हजार ८७९ मताधिक्याने विजयी झाले. या निवडणुकीत त्यांना १ लाख ३१ हजार ८६३ मते मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी धीरज पाटील यांना९४ हजार ९८४ मते मिळाली आहेत. या लढतीमध्ये राणाजगजीतसिंह पाटील यांना चांगल्या मताधिक्याने विजय मिळाल्याने या विजयामध्ये सर्व तालुक्यातील लाडक्या बहिणीचा व मतदारांचा व बुथप्रमुखांचा तसेच कार्यकर्त्यांचा सहभाग चांगलाच दिसून आला. त्यामुळे जळकोट येथील गणेशराव सोनटक्के मित्रपरिवाराच्यावतीने हंगरगा गण व जळकोट गणातील बूथ प्रमुखांचा व कार्यकर्त्याचा शाल फेटा व हार देऊन सत्कार करण्यात आला. फटाक्यांची आतिषबाजी करत एकम ेकांना पेढे भरून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.


यावेळी गणेशराव सोनटक्के, भाजपाचे दत्ता राजमाने, आशिष सोनटक्के, विलास राठोड, अरुण लोखंडे, तमन्नप्पा माळगे, सतीश माळी, विजय पिसे, इरण्णा स्वन्ने, अनिल बेडगे, प्रताप बेडगे, प्रसाद भोसले, हनुमंत अंगुले, परमेश्वर मडोळे, नागनाथ गव्हाणे, सय्यद तांबोळी, इलाई गडीवाले, अम ीर शेख, तम्मा कुंभार, रेवन दरेकर, राम जाधव, राम भोगे, अरुण कदम, वामन कदम, वसंत पवार, वैभव पाटील, मंगेश सुरवसे, करण सोनटक्के, खाशिम जमादार, अरविंद लोखंडे, काशिनाथ पटणे, बाळासाहेब पाटील, नागनाथ किलजे, रजाक इनामदार, नसीर इनाम दार जळकोट व परिसरातील मतदार बंधू, कार्यकर्ते उपस्थित होते.

# खंडोबा मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ नोव्हेंबर -**

नळदुर्ग राष्ट्रीय महामार्ग ते खंडोबा मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे काम खंडोबा यात्रेपुर्वी पुर्ण करावे अशी मागणी भाविक व नागरीकांकडुन होत आहे.

आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातुन नळदुर्ग राष्ट्रीय महामार्ग ते मैलारपुर येथील खंडोबा मंदिरापर्यंतच्या रस्ता तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजुला गटार बांधण्याचे काम मंजुर झाले आहे. या कामामुळे खंडोबा यात्रेत या रस्त्यावर गेल्या अनेक वर्षांपासुन होत असलेली वाहतुक कोंडी आता होणार नाही कारण या कामामुळे रस्त्याची रुंदी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे खंडोबा यात्रेसाठी येणारी भाविकांची वाहने आता थेट विनाअडथळा यात्रेच्या ठिकाणापर्यंत जाऊ शकतात. या रस्त्यामुळे यात्राही सुरळीत पार पडण्याची शक्यता आहे. सध्या या रस्त्याचे काम सुरु आहे हे काम सार्वजनिक बांधकाम



विभागाच्या देखरेखेखाली होत आहे. हे काम घेणाऱ्या ठेकेदाराने आता कामाची थोडी गती वाढविणे गरजेचे आहे.

यात्रेपुर्वी दि. ३ डिसेंबर रोजी नळदुर्ग (मैलारपुर) येथील मंदिरात श्री खंडोबा देवाचे पावणेदोन म हिन्याच्या वास्तव्यासाठी अणदुरहुन आगमन होते. याठिकाणी देवाचे आगमन झाल्यानंतर खंडोबा यात्रेपर्यंत दर रविवारी याठिकाणी भाविक श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने येतात. दर रविवारी याठिकाणी यात्रेचे स्वरूप असते त्यामुळे या रस्त्याचे काम लवकर पुर्ण होणे गरजेचे आहे.

# सामान्य लोकांना संविधानाने समान हक्क असलेले संविधान दिले : दुधभाते

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ नोव्हेंबर -**

भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे हस्तलिखित संविधान आहे. नको राजेशाही, नको ठोकशाही, संविधानाने दिला आम्हा म हान लोकशाही या उक्तीप्रमाणे भारतातील सर्वो च्च पदावरील व्यक्तीपासून ते सर्वात सामान्य लोकांना संविधानाने समान हक्क असलेले संविधान दिले. त्यामुळेच आजचा भारत आपल्याला जगात सर्वात वेगाने प्रगती करणारा देश ठरला आहे, असे प्रतिपादन सहशिक्षक उल्हास दूधभाते यांनी केले.

दि.२६ रोजी श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये संविधान दिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी श्री उल्हास दूधभाते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहशिक्षक दाजीबा बिराजदार हे होते. याप्रसंगी



मुख्याध्यापिका सविता लोहार, दत्तात्रय कोकणे आदीसह सर्व शिक्षक, विद्यार्थी हजर होते. पुढे बोलताना दुधभाते म्हणाले की, जसे आपल्याला संविधानाने अधिकार दिले आहेत तसेच वेळोवेळी कर्तव्याची जाणीव ही आपल्याला संविधानामुळे होते. याचाच आधार घेऊन आजच्या विद्यार्थ्यांनी उद्याचे जबाबदार नागरिक म्हणून आपल्या देशाची प्रगती करावी अध्यक्षपदावरून बोलताना दाजीबा बिराजदार म्हणाले की, या संविधानामुळेच आपल्या देशाची एक प्रगल्भ अशी प्रतिमा जगात निर्माण झाली आहे, याचे आपण सर्वांनी जतन व संवर्धन करावे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संस्कृतिक विभाग प्रमुख संगीता भावसार यांनी मानले. संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान जागृती प्रचार फेरी उमरगा शहरातून काढण्यात आली. यामध्ये इयत्ता पहिली ते सातवीच्या वर्गातील सर्व विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

# संविधानामुळे नागरिकांना मानवी हक्क मिळाले : एस.के. गायकवाड



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२६ नोव्हेंबर -**

देशातील सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करून भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच देशातील तमाम नागरिकांना उपेक्षित बहुजनांना त्यांचे मानवी हक्क मिळाले असून देशाची राष्ट्रीय एकात्मता अबाधित आहे, असे प्रतिपादन रिपाइं (आठवले) चे जिल्हा सम न्वयक एस.के. गायकवाड यांनी वागदरीत आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

वागदरी ग्राम पंचायतीच्यावतीने २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी एस.के. गायकवाड बोलत हे होते.

प्रारंभी सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर उपसरपंच सुरेखा भालचंद्र यादव यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिकरित्या संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

यावेळी शिवाजी मिटकर, ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर पाटील, अमोल पवार, मिनाक्षी बिराजदार, उमेदच्या सिआरपी विद्या बिराजदार, रोजगार सेवक रामसिंग परीहार, चंद्रकांत वाघमारे, सादु वाघमारे, ग्रा.प. कर्मचारी ओंकार चव्हाण, आकाश झेंडारे ग्रामस्थ उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा : डॉ. हंगरगेकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी वरील उद्गार काढले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या म ार्गदर्शनाखाली महाविद्यालयात स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांची पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

डॉ. हंगरगेकर पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरावजी चव्हाण यांचा आदर्श सर्व क्षेत्रातील व्यक्तींनी घेणे गरजेचे आहे. राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये यशवंतरावजी चव्हाण यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य केल्यास महाराष्ट्राची प्रगती होण्यास वेळ लागणार नाही असे ते यावेळी म्हणाले.

याप्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.डॉ. सावता फुलसागर, सांस्कृतिक विभाग प्रम ुख प्रा.डॉ. केशव क्षीरसागर, प्रा. माधव उगिले, डॉ. डी.एम. शिंदे, डॉ.सी.एस. महाडिक आदींसह महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्राईम वृत्त...



### कळंब येथे संविधान दिन साजरा

**कळंब, दि.२६ नोव्हेंबर -**

आज संविधान दिन २६ नोव्हेंबर रोजी संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाले हा अमृत महोत्सव साजरा करताना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या परिसरात सविधान उद्देशिकेचे वाचन करून कळंब मध्ये मोठ्या उत्साहात संविधान दिन साजरा केला. भाजपाचे सतपाल बनसोडे, हभप. महाराज महादेव अडसूळ, सुनील गायकवाड, किशोर वाघमारे, संतोष भांडे, माधव सिंग राजपूत, प्रमोद ताटे, सुमित रणदिवे, राजाभाऊ गायकवाड, भाऊ कुचेकर, विलास करंजकर, बंडू ताटे, महावीर गायकवाड, बाळासाहेब हौसलमल, रमेश भोसले, अनिल बचुटे आदि उपस्थित होते.



### बावी आश्रमशाळेत २६/११ हल्ल्यातील शाहिद जवानांना श्रद्धांजली

**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

दि.२६ नोव्हेंबर रोजी वसंत प्राथमिक जवाहर म ाध्यमिक आश्रमशाळा व जवाहर कनिष्ठ महाविद्यालय येथे भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य दयानंद मनोहर राठोड, कार्यक्रमाचे अध्यक्ष जाधव एन.बी., पर्यवेक्षक साकळे बी.एस., प्रमुख वक्ते प्राध्यापक सुपनार लक्ष्मण, जेष्ठ शिक्षक देशमुख ऐ.आर. उपस्थित होते. सर्वप्रथम भारतीय संविधान व राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्राध्यापक विनोद राठोड यांनी केले.



### मदर कांचन कॉलेजमध्ये संविधान दिन साजरा

**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

मदर कांचन कॉलेज धाराशिव येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव अतुल अजमेरा, कॉलेजचे प्राचार्य डॉ. इंदलकर, प्राचार्या राठोड व योगिता अजमेरा यांच्या हस्ते भारतीय संविधानाची प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी अजमेरा यांनी संविधान दिनानिमित्त अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मदर कांचन कॉलेज व मदर कांचन नर्सिंग इन्स्टिटयुट धाराशिव येथील प्रियंका, देशमुख, सरवदे, राऊत, अंकिता, फलटणकर, सरवदे, देटे, राठोड, करण भक्ते इ. कर्मचारी व विदयार्थ्यी विदयार्थ्यींनी मोठया संख्योने उपस्थित होते.



### रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांनी संविधान दिनाच्या सर्व उपस्थित विद्यार्थी व गुरुदेव कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व प्राचार्य यांच्या सह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांनी उद्देश पत्रिकेचे वाचन केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते विद्यार्थी -विद्यार्थिनी, राष्ट्रीय क्षात्र सेनेचे कॅडेट्स, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.



### विद्यापीठ उपपरिसरात 'संविधान दिन' उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसरात भारतीय राज्यघटनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त 'संविधान दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठ उपपरिसराचे संचालक प्रा.डॉ. प्रशांत दीक्षित यांचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमास प्रारंभ झाला. उपस्थित सर्वांनी प्रतिमेस पुष्प अर्पण केले. डॉ. गणेश शिंदे यांनी राज्यघटना उद्देशिकेचे वाचन केले. उद्देशिका सामुदायिक वाचनात सर्वांनी सहभाग घेतला. संविधान दिनानिमित्त प्रशासकीय इमारतीपासून विज्ञान भवन-प्रशासकीय इमारतीपर्यंत पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मेघश्याम पाटील, डॉ. राहुल खोब्रागडे, डॉ. जितेंद्र शिंदे यांनी परिश्रम घेतले. या समारंभास विद्यापीठ उपपरिसरातील विविध विभागातील विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.


# विकासाची कामे,जेजुरीचा खंडोबा राजेश पवारांच्या नवसाला पावला

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. २६ नोव्हेंबर**

नायगांव मतदारसंघांतील झालेल्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकी मध्ये विद्यमान आमदार राजेश पवारांनी मतदार संघातील भाजपा स्वगृहातील दिग्गजांचा विरोधाला न जुमानता राज्यात महायुतीने लाडकी बहिण या सारख्या महत्त्वाच्यायोजनेची मतदारसंघात महत्त्व पटवून देत. आपण

केलेल्या विकास कामाच्या बळावर व मतदार संघातील विविध जाती-धर्मातील लहान थोरांना मतदारांना राज्यातील तीर्थस्थळाचे घडवून आणलेल्या दर्शनाच्या बळावर मतदार संघातील मतदारांची विश्वासार्हता मिळवित प्रतिस्पर्धी डॉ. मिनल खतगांवकरा बरोबर एकाकी झुंज देऊन मतदारसंघ काबीज केल्याने समर्थकांनी फटाके वाजवून जल्लोष केला

नायगांव मतदार संघातील वाडी तांड्यावरील सामान्य नागरिक आरोग्याविषयक व भौतिक सुविधेपासून गेल्या अनेक वर्षापासून वंचित होता .तर काही गावांतील नागरिक हे रस्ते वीज पाणी यासारखे अनेक प्रलंबित प्रश्न मागील





पाचवर्षात मतदारसंघातील मुगांव,उमरी,धर्माबाद भागातील वाडी तांड्या वर ना खाऊंगा न खांने दूंगा वाक्याप्रमाणे अतिशय पारदर्शकपणे विकास कामे केली या उपर ही. विद्यमान पवारांनी भाजपाची विचारधारा अंगीकृत करून मतदारसंघातील विविध जाती-धर्मातील लहान थोर मंडळी नां नागपूर येथील दीक्षाभूमी खंडोबाची जेजुरी ते काशी या सारख्या पवित्र तीर्थस्थळांचे दर्शन घडून आणले आहे.तर दुसरीकडे भाजपाची विचारधारा अंगीकृत करून व राज्यात महायुतीने राबविण्यात आलेल्या'लाडकी बहीण' या योजने बाबत मतदार संघातील बहिणीसाठी विद्यमान आमदारांनी मतदार संघातील बँक व्यवस्थापक अधिकार्याशी संवाद साधून योजनेचा लाभ मिळावा यासाठी देखील सातत्याने प्रयत्न केला.यासारखे विकासाची कामे करुन ही स्वगृही पक्षातील मतदार संघातील दिग्गजांचा ऐन निवडणुकीच्या तोंडावर विरोधाचा सामना करीत विद्यमान आमदारांनी भाजपाचे तिकीट मिळवून.मागील पाच वर्षात मतदार संघातील सार्वजनिक धार्मिक क्षेत्रामध्ये दिलेले योगदान केलेले विकास कामाचे मुद्दे घेऊन मतदार संघाची निवडणू क ही पती-पत्नी मिळून प्रतिस्पर्धी काँग्रेस पक्षाच्या डॉ. मिलन ताई निरंजन खतगांवकर तर वंचित बहुजन आघाडी चे डॉ. माधवराव विभुते या सह भाजपातील दिग्गजांच्या विरोधका बरोबरच प्रतिस्पर्ध्यांचा सामना करीत.आ. राजेश पवार व त्यांच्या सुविद्य पत्नी माजी जि प सदस्या सौ पुनम पवार या दोघांनी मिळून मतदार संघातील वाडी तांड्यावर पाच वर्षात केलेल्या विकासाचा महायुतीच्या काळातील लाडकी बहिण यासारख्या योजनेच्या कार्यकाळात दिलेल योगदान या सर्व कार्याचा लेखाजोखा हा प्रचाराचा मुद्दा करीत प्रतिस्पर्धी डॉ मिनल खतगांवकरासह वंचित बहुजन आघाडीचे डॉ माधव विभुते सह ईतर ही उमेदवार बरोबर एकाकी झुंज देत मतदार संघातील भाजपा पक्षाचे निष्ठावंत म्हणून घेणाऱ्यांना विरोधकांची बोलती बंद करीत प्रति स्पर्ध्या विरोधात १,२७८२८ मते घेऊन विजय संपादित केले .प्रतिस्पर्धी डॉ.मीनल खतगांवकरानी मतदारसंघातील मतदारांना विकासाचे आश्वासने देत फक्त ८०,७१३ एवढी मते मिळवले असून यावेळी डॉ. मीनल ताई खत गांवकरांचा विद्यमान राजेश पवारांनी ४७६९५ मतांनी दणदणीत पराभव केला आहे.

यावेळी नायगाव तालुक्यातील मतदारसंघातील नरसी चौकात पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष गोविंद टोकलवाड,हुस्सा येथील व्यवसायिक तथा भाजपाचे कट्टर समर्थक राजेश हंबर्डेसह पवारांच्या कट्टर समर्थकांनी वाडी तांड्यावर देखील गुलाल व बेल भंडारा उधळत फटाके फोडून जल्लोष केला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त



### कर्मच्याऱ्यांनी हरवलेला मोबाईल केला परत

**बिलोली**-दि. १८ नोव्हेंबर रोजी देगलूर ते बिलोली प्रवास करत असताना vivo 15 pro या कंपनीचा मोबाईल गहाळ झाला. बस क्रं. १७७५ बिलोली आगारात येत असताना कर्मच्याऱ्यांला तो मोबाईल आढळून आला असता त्यांनी त्वरीत सुरक्षकाच्या मदतीने मोबाईल मालकाशी संपर्क साधला व मोबाईल परत केला. यावेळी बिलोली आगार, ता. बिलोली जि. नांदेड येथील चालक बि.एम. सोनकांबळे, सुरक्षारक्षक एम.जी.तरटे व वाहतुक नियंत्रक ए.एच.जाधव यांचे सर्वत्र कौतुक कण्यात आले.

### युवा महोत्सवाच्या तारखेत बदल

**नांदेड**-जल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन २७ ते २८ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बास्केटबॉल मैदान नांदेड, कुसुम सभागृह नांदेड व डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, स्टेडियम व श्री. गुरुगोबिंदसिंघजी स्टेडियम नांदेड या विविध ठिकाणी करण्यात आले होते. नांदेड जिल्ह्यात राज्यस्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतीना सहभागी होता यावे व त्यांना सरावासाठी पुरेसा वेळ मिळावा या हेतुने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन १ व २ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जास्त जास्त युवक-युवतीनी मोठया संख्येने सहभागी होता यावे, यामध्ये कृषी महाविद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, अभियांत्रिकी, वैद्यकीय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महिला मंडळ, महिला बचतगट, युवकांसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, नेहरु युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) इत्यादी संस्थेतील १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभाग घेऊ शकतात. त्यांचे वय दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजीची परिगणना करण्यात येईल. युवा महोत्सवामध्ये प्रत्येक कलाप्रकारासाठी विजयी स्पर्धकांना आकर्षक रोख बक्षीस, सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर विजयी युवकांना विभागस्तरीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याचा मान मिळणार आहे.

# संविधानाची मूल्ये रुजविणे आपले प्रथम कर्तव्य असावे : पो.नि. सप्रे

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २६ नोव्हेंबर**

संविधानाने देशाला सदृढ लोकशाही दिली असून संविधान दिन हा स्वातंत्र्य भारतासाठी अत्यंत मोलाचा आहे. मानावाधिकारासह राष्ट्रीय ऐक्य, सामाजिक सलोखा जपण्यासाठी सर्वांनी नेहमी पुढाकार घेणे गरजेचे आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येकाच्या मूलभूत अधिकारांकरिता देशाला ऐतिहासिक असा पायाभूत कायदा दिला आहे. संविधानाची मूल्ये रुजविणे आपले प्रथम कर्तव्य असावे, त्यामुळेच या दिनाचा उद्देश्य साध्य होईल असे प्रतिपादन येथील पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी संविधान दिनानिमित्त येथील शासकीय विश्रामगृहामध्ये आयोजित कार्यक्रमाप्रसंगी बोलतांना केले.

यावेळी, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महामानवाला अभिवादन करण्यात आले. दरम्यान, मुंबई येथे झालेल्या २६/११ च्या भ्याड हल्ल्यातील



हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रारंभी, पत्रकार संजय कोलते यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले तर सर्व उपस्थितांकडून शपथ घेण्यात आली. यावेळी पत्रकार प्रल्हाद मस्के ,माजी नगरसेवक कैलास गोडसे ,माधव पाटील कदम ,संजय आऊलवर, अजगर हुसेन, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सूर्यकांतराव चौदंते यांनी संविधान दिनाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी सहाय्यक पोलिस निरिक्षक बी. आर. कांबळे, पो. हे.कॉ.दिलीप चक्रधर,पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते,कुणाल चौधरी,पत्रकार ईश्वर पिन्नलवार,गंगाधर डांगे, साहेबराव गागलवाड,धम्मदाता कांबळे,अब्दुल रजाक, शेख जब्बार,अतीक अहेमद, साहेबराव हौसरे, नामदेव बिचेवार ,अमोल टेकले ,हाफिस कुरेशी ,माधव गायकवाड, सुभाष चौदंते,अविनाश चौदंते,

माजी नगरसेवक चांदु बोकेफोड अविनाश झमकडे, साहेबराव चव्हाण, संजय उर्फ पप्पू सोनटक्के, सचिन चंद्रे महावितरण चे यंत्रचालक जनार्दन लेंडेवाड, मेंडका येथील माजी सरपंच लक्ष्मणराव ईजळकर, उपसरपंच नारायण निखाते मुजीब पठाण, राजरत्न क्षीरसागर, अशोक पाटील मुंगल इजळीकर, आदित्य कोलते, यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन पत्रकार संघाचे माजी जिल्हा सहसचिव संजय कोलते यांनी केले तर आभार तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते यांनी मानले.

# आनंद पाटील बोंढारकर यांचा अटीतटीच्या लढतीत मोठा विजय

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २६ नोव्हेंबर**

नांदेड दक्षिण मतदार संघात महायुती व महाविकास आघाडी यांच्या अटीतटीच्या लढतीत महाविकास आघाडीच्या उमेदवार यांच्यावर विजय मिळवून दक्षिण मतदार संघ हे शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याचे सिद्ध करून दाखवत महायुती शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी दणदणीत विजय मिळवला या विजयाचे शिलेदार माजी खासदार हेमंत पाटील आहेत. त्यांच्या विजयाचा जल्लोष संपूर्ण मतदारसंघात त्यांच्या



चाहत्या कार्यकर्ते व मतदार यांच्या कडुन होत आहे.

**माजी खा.हेमंत पाटील बनले विजयाचे शिलेदार**

नांदेड विधानसभा निवडणुका २०२४ घेण्यात आलेल्या निवडणुकांचा निकाल नुकताच लागला असून या निवडणुका नुसार महाराष्ट्र राज्यसह नांदेड जिल्हा येथील प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचा सुपडा-साप करत महायुतीच्या उमेदवारांनी महाविजय मिळवत एक हाती सत्ता आणली आहे. नांदेड जिल्ह्यातील नऊ आमदारांपैकी नऊ ही आमदार महायुतीने काबीज केले आहेत. यामध्ये नांदेड दक्षिण मतदार संघातील महायुती शिवसेना शिंदे गटाचे विजयी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी अटीतटीच्या लढतीत विजयी बाजी मारली या त्यांच्या विजयाचे शिलेदार माजी खासदार हेमंत पाटील हे असल्याची चर्चा संपूर्ण मतदारसंघा चालू आहे आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या विजयाचा जल्लोष मतदारसंघात ठिकठिकाणी करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# अटीतटी नाहीच! तब्बल ३० हजारची आघाडी घेत कोहळीकर यांचा दणदणीत विजय

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २६ नोव्हेंबर**

अत्यंत चुरशीची व अटीतटीची ८४- हदगाव - हिमायतनगर विधानसभा निवडणूक होणार अशी संबंध तालुक्यात चर्चा होत असताना प्रत्यक्ष निकालाच्या दिवशी सगळेच अंदाज फोल ठरवत महायुतीचे अधिकृत उमेदवार संभाराव उर्फ बाबुराव कदम कोहळीकर यांनी अगदी निकालाच्या दिवशी अगदी पहिल्या फेरीपासून विजयाची आघाडी घेत शेवटच्या फेरीपर्यंत कायम ठेवत तब्बल ३०००० चे मताधिक्य घेत महाविकास आघाडीचे उमेदवार माधव पवार जवळगावकर यांचा पराभव करत विजय खेचून आणला.

दि.२३ नोव्हेंबर रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या



निकालावरून जनतेने एक प्रकारे स्पष्ट संदेश दिला की, आता घराणेशाहीला हदगाव-हिमायतनगर तालुक्यात जागा नाही तसेच घराणे शाहीवर जनता ही मोठ्या प्रमाणावर कंटाळली होती. अत्यंत साध्या शेतकरी कुटुंबातून व राजकीय संघर्षातून आपली राजकीय जिवनाची सुरुवात करणारे शांत, संयमी वृत्तीमुळे अख्ख्या दोन्ही तालुक्यात ओळखणारे बाबुराव कदम कोहळीकर यांनी सर्वांचे अंदाज चुकवीत आमदारकीची माळ आपल्या गळ्यात जनतेच्या सहकार्यातून घातली. लाडकी बहीण योजना, महायुती सरकारचे विकासाभिमुख राजकारण विविध योजना या सर्वांच्या नागरिकांवर चांगलाच प्रभाव पडल्याचे निकालांती दिसून येते. विजयानंतर दोन्ही तालुक्यात महायुतीच्या घटक पक्षांचा कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष मोठ्या उत्साहाने साजरा केला. यावेळी जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, माजी खा. सुभाषराव वानखेडे, गंगाधर पा. चाभरेकर, बबन कदम, मंचकराव कदम, बाबूसराव कदम, संभाजी लांडगे, अतुल राउतराव यांच्यासह महायुतीचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालकमंत्री म्हणून चिखलीकरांची नियुक्ती करण्याची यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ नोव्हेंबर**

जिल्ह्यातील सर्वात अनुभवी लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेले नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार तथा लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची संपूर्ण जिल्ह्याची सखोल माहिती व अचूक ज्ञान असलेला नेता म्हणून जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी निवड करावी अशी मागणी



स्वप्निल इंगळे पाटील यांनी मा. अजितदादा पवार यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. जिल्ह्याचा पालकमंत्री हा जिल्हा प्रशासन व राज्य सरकार मधील एक महत्वाचा दुवा म्हणून काम करतात कारण पालकांप्रमाणे ते जिल्ह्याला काय हवे नको ते बघत असतात. जिल्हा प्रशासनला ते मार्गदर्शन करतात. राज्य सरकारच्या व केंद्र सरकारच्या योजनांची प्रशासनामार्फत अमलबजावणी ते करतात. ते जिल्हा नियोजन समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ते जिल्ह्याचे प्रश्न मार्गी लावतात याबरोबरच पालकमंत्री जिल्ह्यातील विविध राज्य सरकारच्या योजना आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवतात आणि जिल्ह्याचे प्रशासन कार्यक्षमतेने कार्यरत असल्याची खात्री करतात त्यामुळे प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासारखा अनुभवी नेता व संपूर्ण जिल्हा तसेच शहराची खडाण खडा माहिती असलेला लोकप्रतिनिधी सध्या आमदारांमध्ये नाही त्यामुळे प्रतापराव पाटील चिखलीकरच हे पालकमंत्री पदाचे दावेदार आहेत असेही स्वप्निल इंगळे यांनी म्हटले आहे.

# शिवसेना राज्य ग्रंथालय सेलच्यावतीने लाडक्या बहिणींचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ नोव्हेंबर**

राज्यामध्ये महायुतीला आलेल्या यशाबद्दल तसेच शिवसेना पक्षाचे नवनिर्वाचित आमदार निवडून आल्याबद्दल शिवसेना राज्य ग्रंथालय सेल महाराष्ट्रप्रदेश आणि इंदिरा सार्वजनिक वाचनालय पौणिमानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आ. आनंदराव तिडके बोंढारकर यांना मुख्यमंत्री लाडक्या बहिणींना प्रचंड बहुमताने निवडून दिल्याबद्दल लाडक्या बहिणींचा सत्कार सोहळा दि. २५ नोव्हेंबर रोजी उत्साहात संपन्न



झाला.

या आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ, ज्योतीताई देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून आ. आनंदराव बोंढारकर यांच्या सुविद्य पत्नी सरस्वती बोंढारकर, शिवसेना राज्य ग्रंथालय सेलचे राज्यध्यक्ष बी.जी. देशमुख, माजी जि.प. सदस्य शिवाजीराव कदम, मुक्ताई तिडके, वर्षा खराणे, अनुसया मुगल, राऊत आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमामध्ये उपस्थित असलेल्या सर्व लाडक्या बहिणींचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य ग्रंथालय सेलचे शहराध्यक्ष संजय सूरनर, माधव कदम, राजेश मोरे, रमेश कांबळे, दिनेश लाकशटवार, प्रदीप भंडारी, रवी वाघमारे, गजानन देवसरकर, शिवाजी मुंडे, विश्वनाथ राऊत, .एल.आर इंगोले, सविता राऊत, मीनाताई अंबोरे, दुर्गाताई राऊत, छाया जोंधळे, संगीता रेखावार, मीणा राऊत यांच्यासह आदी जणांची उपस्थिती होती.

# भोकरचा भक्कमपणे विकास होणार : खा.अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. २६ नोव्हेंबर**

सर्व घटक पक्षातील कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली, खंबीरपणे पाठीमागे उभा राहिलात, आज सर्वांचे आभार मानण्यासाठी मी येथे आलो असून भोकरच्या विकासाला आता केंद्रातील सरकार आणि राज्यातील महायुती सरकारची साथ मिळणार असल्याने भोकरचा भक्कमपणे विकास होईल असा विश्वास माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांनी भोकर येथील आभार सभेत बोलताना व्यक्त केला.

भोकर विधानसभा मतदार संघाच्या नवनिर्वाचित आमदार ऍड.श्रीजयाताई चव्हाण ह्या एक लाख ३३ हजार १८७ मते घेऊन ५० हजार मतांची आघाडी घेऊन विजयी झाल्याने भोकर येथे दि.२४ रोजी गणराज मंगल कार्यालयात आभार सभा आयोजित करण्यात आली होती. प्रारंभी नवनिर्वाचित आमदार श्रीजयाताई चव्हाण यांचा भाजपा युवा मोर्चा, रिपाई गट, राष्ट्रवादी काँग्रेस, प्रत्येक गावाच्या ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले या आभार सभेत पुढे बोलताना माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण म्हणाले तेलंगानातील काँग्रेस नेत्यांनी भोकर मध्ये येऊन लुडबुड केली लाडक्या बहिणींची साथ मोठ्या प्रमाणावर मिळाली लोकशाही मजबूत करायची आहे नव्याने विकासाच्या कामाला लागायचं असल्याचे खा. अशोक चव्हाण म्हणाले.

या कार्यक्रमास माजी आमदार अमर राजूरकर, नरेंद्र चव्हाण, मंगाराणी आंबुलगेकर, सभापती जगदीश भोशीकर, किशोर पाटील, भगवान दंडवे, राजेश अंगरवार, विनोद चिंचाळकर, राजेश देशमुख, विशाल माने, वेणू कोंडलवार, बाबुराव अंदबोरीकर, डॉ. बालाजी बिलरवार, सरपंच संघटना अध्यक्ष मारोती भोंबे, बालाजी शानमवाड, संजय बरकमकर, कल्पनाताई भोसले, मिर्झा ताहेर बेग, डॉ.फिरोज इनामदार आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

# फडणवीस हे केराम यांना मंत्रिपद देऊन २५ वर्षांपासूनचा खाडा दूर करतील?

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.२६ नोव्हेंबर**

काँग्रेसचे स्व.उत्तमराव राठोड व भाजपाचे डी.बी.पाटील यांच्यानंतर जवळपास २५ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीपाआसून किनवट मतदारसंघास राज्याच्या मंत्रिमंडळात प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली नाही. हे पूर्वी निजामशाहीत तर आता मराठवाड्यातील आडवळणी पडलेल्या या दोन्ही तालुक्याचे फार मोठे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. गेली पंचवीस वर्षे दिर्घकाळ पडलेला मंत्रीपदाचा खाडा नवनिर्वाचित आमदार भीमराव केराम यांना नवीन राज्य मंत्रिमंडळात संधी देऊन भाजपाचे पक्षश्रेष्ठी व उपमुख्यमंत्री तथा भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दूर करतील का याकडे मतदारसंघातील तमाम भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व आ.केराम समर्थकांचे लक्ष लागले आहे.

नांदेड जिल्ह्यातील किनवट व माहूर हे दोन्ही तालुके मिळून किनवट विधानसभा मतदारसंघ म्हणून राज्यात किनवटची राजकीय ओळख तर आदिवासी बहुल मागासलेले तालुके अशी भौगोलिक दुर्दैवी ओळख पण, सुदैवाने यातील जमेची बाजू म्हणजे माहूर हे राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री रेणुकादेवीचे जागृत देवस्थान असलेले एक मूळ पीठ अशी देशात सर्वदूर भक्कम ओळख असूनही, विकासाच्या बाबतीत नकारात्मकता असल्याने ती दूर करण्यासाठी तर धार्मिकतेच्या बाबतीत सकारात्मकता असल्याने त्याच्या वाढीसाठी अशी दुहेरी गरज असतानाही स्व.उत्तमराव राठोड व डी.बी.पाटील यांच्यानंतर जवळपास २५ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीपाआसून किनवट मतदारसंघास राज्याच्या मंत्रिमंडळात प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली नाही. हे पूर्वी निजामशाहीत तर आता मराठवाड्यातील आडवळणी पडलेल्या या दोन्ही तालुक्याचे फार मोठे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.



नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या तीनही मुख्य घटक पक्षाला राज्यात छप्परफाडके असे घवघवीत अभूतपूर्व यश मिळालेले आहे. एकिकडे २७ किंवा २८ तारखेला मुख्यमंत्री ठरुन नवीन मंत्रीमंडळाची स्थापना होण्याची शक्यता आहे. तर राज्यातील प्रमुख लढतींपैकी एक लक्षवेधी लढत ठरलेल्या किनवट विधानसभेत दुसऱ्यांदा निवडून आलेले महायुतीचे भाजपाचे नवनिर्वाचित आमदार भीमराव केराम यांना यावेळी तरी राज्यमंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री अथवा निदान राज्यमंत्री पद देऊन भाजपा पक्षश्रेष्ठी या आदिवासी ग्रामीण भागातील जनतेला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करतील का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यासोबतच राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ पीठ असलेल्या माहूर तिर्थक्षेत्राचादेखील सर्वांगीण विकास करण्यासाठी आमदार भीमराव केराम यांना नामदार बनवून मंत्रीपद देऊन न्याय देतील का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तिर्थक्षेत्रासारख्या एका पवित्र भागावर भारतीय जनता पार्टीचे राज्यातील सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राजकीय दृष्ट्या या भागावर आपली पकड आणखी मजबूत करण्यासाठी महायुतीला मिळालेल्या या अभुतपूर्व यशातील आपल्या सिंहाच्या वाट्यातून केराम यांना खारीचा वाटा म्हणून आदिवासी विकास मंत्री अथवा , इतर एखाद्या खात्याचे मंत्री म्हणून संधी देतीलच अशी आशा बाळगून आहेत. महत्वाचे म्हणजे आ.केराम हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष निकटवर्तीय मानले जातात. केराम यांच्या प्रचारार्थ फडणवीस यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेत किनवटची विशाल जनसमुदाय उसळलेली जाहीर सभा गाजवून एका दणक्यात केराम यांच्या विजयावर शिक्कामोर्तब केले होते. माहरची आई श्री रेणुकामाता ही उपमुख्यमंत्री फडणवीस यांची कुलस्वामिनी असून, मातेच्या दर्शनासाठी ते व त्यांच्या सौभाग्यवती याठिकाणी आवर्जून उपस्थिती लावत असतात. अशा या प्रसिद्ध तीर्थक्षेत्रासह, आदिवासी बहुल किनवट तालुक्याचा मागील पंचवार्षिक कालावधीत करुन राहिलेला व आणखी भक्कम विकास करण्यासाठी, येथील आदिवासी समाजासोबतच अठरापगड जाती, जमाती व सर्वसमावेशक विकास करण्यासाठी आ.केराम यांना मुंबईत राज्य मंत्रिमंडळात मंत्रीपद देऊन या मागासलेल्या भागांतील जनतेला न्याय देण्यात यावा अशी इच्छा येथील महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समर्थक व सर्वसामान्य जनतेसह येथे येणाऱ्या लाखो भाविकांमधून व्यक्त केली जात आहे. गेली पंचवीस वर्षे दिर्घकाळ पडलेला मंत्रीपदाचा खाडा नवनिर्वाचित आमदार भीमराव केराम यांना नवीन राज्य मंत्रिमंडळात संधी देऊन भाजपाचे पक्षश्रेष्ठी व उपमुख्यमंत्री तथा भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दूर करतील का याकडे मतदारसंघातील तमाम भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व आ.केराम समर्थकांचे लक्ष लागले आहे.

**जाहीर प्रगटन**

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी हिमायतनगर यांच्या न्यायालयात**
**जन्म मृत्यू नोंदणी - सुधारला कायदा २०२३ मध्ये कलम ११ (३). अन्वये**
**अर्ज क्र २६७**

श्री/श्रीमती प्रल्हाद शिवराम आडगे रा. एकंबा ता. निबंधक तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय एकंबा हिमायतनगर जि. नांदेड

विषयः- जन्म मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये शिवराम दत्ता आडगे यांची मृत्यूची नोंद घेण्याकरिता अदिशीत करणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार श्री / श्रीमती प्रल्हाद शिवराम आडगे एकंबा ता हिमायतनगर यांनी त्यांचे आई/वडील शिवराम दत्ता आडगे यांची मृत्यू दिनांक २९ /१२/ २००९ मोजे मौ एकांबा यांना आदेशित करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे

ज्या अर्थी शिवराम दत्ता आडगे यांची मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालयास ता हिमायतनगर जी नांदेड येथे उपलब्ध नाही

ज्या अर्थी या जाहीर प्रगटनद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की अर्जदार यांची वडील/आई २९/१२/२००९ मृत्यूची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांक पासून ३० दिवसांमध्ये या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित मुदतीत हजर राहून अक्षय किंवा उजर न केल्यास सदरचा अर्जदार यांचे अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

**तालुका दंडाधिकारी हिमायतनगर**

लातूर
# दिनांक
लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



## राजमाता संकुलात राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि. २६ नोव्हेंबर -**

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त या अमृत महोत्सवी वर्षात विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अनुषंगाने मंगळवारी (दि. २६) संविधानदिनानिमित्त येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, राजेंद्र जायेभाये, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, समन्वयक अश्विनी केंद्रे, राजीव मुंढे, वैशाली केंद्रे, राणी केंद्रे उपस्थित होते.

भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता तसेच संविधानाची मूल्ये शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरिक यांच्यापर्यंत पोहचावीत, यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत संविधानदिनानिमित्त राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातही भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

यानिमित्त शिक्षक महेश मोटाडे, अविनाश पवार, पर्यवेक्षक सुनीता जवळे यांच्या पुढाकारातून 'संविधानाचे महत्त्व' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. यातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्या विद्यार्थ्यास पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त...



### लातूर जिल्हा बँकेत माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**लातूर दि. २६ नोव्हेंबर -**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला जिल्हा बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अॅड. प्रमोद जाधव, ट्वेंटी वन शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख, जिल्हा बँकेचे संचालक अनुप शेळके, रेणापूर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, कोंग्रेसचे तालुका अध्यक्ष सुभाष घोडके, सचिन दाताळ, जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक हणमंत जाधव उपस्थित होते.



### संविधान रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर, दि. २६ नोव्हेंबर-**

भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत संविधान दिनानिमित्त लातूर येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये नागरिक, विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे आणि समाज कल्याण प्रादेशिक उपयुक्त अविनाश देवसटवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला सुरुवात झाली. समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांच्यासह विविध पुरस्कारप्राप्त नागरिक, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यावेळी उपस्थित होते. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार आणि भारतीय संविधान उद्देशिका प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. तसेच उपस्थित सर्वांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून सुरु झालेली संविधान रॅली गुळ मार्केट, महात्मा गांधी चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर याठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून रॅलीचा समारोप झाला. श्री केशवराज माध्यमिक विद्यालय, मारवाडी राजस्थान विद्यालय, श्री देशीकेंद्र माध्यमिक विद्यालय, ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय, सरस्वती माध्यमिक विद्यालय, जिजामाता कन्या प्रशाला आणि गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी संविधान रॅलीमध्ये सहभागी झाल्या होत्या.



### जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत राज्यघटनेच्या उद्देशिकेचे वाचन

**लातूर, दि.२६ नोव्हेंबर-**

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अनुषंगाने आज संविधान दिनानिमित्त जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, पुनर्वसन उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता तसेच संविधानाची मुल्ये शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरीक यांच्यापर्यंत पोहचावीत, यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत संविधान दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय येथेही भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

### मोटार सायकल वाहनांकरिता एम.एच.२४-सीए नवीन मालिका सुरु

**लातूर, दि. २६ नोव्हेंबर-**

परिवहनेत्तर (मोटार सायकल) संवर्गातील वाहनांकरिता एम.एच.२४-सीए ही नवीन मालिका सुरु होणार आहे. या मालिकेतील आकर्षक,पसंती क्रमांक राखीव करण्यासाठी बुधवार, २७ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत, असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अशिषकुमार अय्यर यांनी कळविले आहे.

# आ. रमेश कराड यांचे रामेश्वर ग्रामस्थांकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२६ नोव्हेंबर-**

अटीतटीच्या झालेल्या लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत दणदणीत विजय संपादन केलेले भाजपाचे आमदार रमेश कराड यांचे जन्मभूमी असलेल्या लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रुई) येथे गावकऱ्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत स्वागत केले.

निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर निकालाच्या दुसऱ्या दिवशी पहिल्यांदाच रमेश कराड यांनी रामेश्वर गावातील विविध देवदेवतांचे दर्शन घेण्यासाठी आले. त्यांचा भाजपाकार्यकर्त्यांसह गावकऱ्यांनी फटाक्याची आतिषबाजी, विविध वाजंत्रीसह जल्लोषात स्वागत केले. ठिकठिकाणी लाडक्या बहिणींनी आ. रमेश कराड यांचे औक्षण करून विजयाची पताका फडकिल्याबद्दल अभिनंदन केले.

यावेळी लातूर ग्रामीणचे नवनिर्वाचित आमदार रमेश कराड आणि संजीवनी कराड यांनी रामेश्वर नगरीतील प्रभू श्रीराम मंदिर आणि संत गोपाळबुवा महाराज यांच्या मंदिरात जाऊन आरती केली व मनोभावे दर्शन घेतले. त्याचबरोबर दादाराव कराड आणि प्रयागआक्का कराड यांच्या समाधीवर पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. रामेश्वर येथील निवासस्थानी माजी सरपंच तुळशीराम कराड, प्रगतशील शेतकरी काशीराम कराड यांचे आ. रमेश कराड यांनी आशीर्वाद घेतले. यावेळी भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. ग्रामस्थांनी केलेल्या सत्कारा बद्दल आभार व्यक्त करून प्रभू श्री राम मंदिरात बोलताना नवनिर्वाचित आमदार रमेश कराड यांनी मी आमदार व्हावे यासाठी गेल्या वीस वर्षापासून मतदार संघातील असंख्य सर्वसामान्य कार्यकर्त्याबरोबरच ग्रामस्थांनीही परिश्रम घेतले, संघर्ष केला. या संघर्षाला आज प्रत्यक्षात यश आले. माझा विजय हा कार्यकर्त्यांच्या कष्टाचा मेहनतीचा



असून विजयासाठी लाडक्या बहिणींनी मला भरभरून आशीर्वाद दिले आहेत. आता सर्वांचीच मोठी जबाबदारी वाढली आहे आपल्याला आपला मतदारसंघ विकास कामाच्या माध्यमातून एक मॉडेल मतदारसंघ निर्माण करावयाचा आहे असे बोलून दाखविले.

## गावठी कट्टा बाळगणारा ताब्यात

### पोलीस ठाणे शिवाजीनगरची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि. २६ नोव्हेंबर -**

लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे स्तरावर विशेष पथके नेमून कार्यवाही करण्यात येत होती.

त्या अनुषंगाने पोलीस ठाणे शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांचे नेतृत्वात पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीचे विश्लेषण करून सदरची माहिती खरी असल्याचे निष्पन्न होताच दिनांक २४/११/२०२४ रोजी लातूर शहरातील सिताराम नगर परिसरातून एका अल्पवयीन मुलास व एका तरुणाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी कट्टा (पिस्टल) हस्तगत करण्यात आले आहे.

पोलीस ठाणे शिवाजीनगरच्या विशेष पथकाला गुप्त बातमीदार मार्फत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर इसम नामे गणेश शेंडगे, वय ३० वर्ष राहणार एलआयसी कॉलनी, लातूर. व सोबत एक अल्पवयीन मुलास ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी कट्टा जप्त करण्यात आले. याप्रकरणी पोलीस उप निरीक्षक हनुमंत कवले यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४६४/२०२४ कलम ३ ,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद झालेला असून पुढील तपास शिवाजीनगर पोलिस स्टेशनचे चे सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण हे करीत आहेत.

पोलीस ठाणे शिवाजीनगरच्या पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनात अतिशय उत्कृष्टरित्या गोपनीय माहितीचे संकलन व विश्लेषण करून करून गावठी कट्टा



बाळगणाऱ्या इसमाला ताब्यात घेतले आहे तर अल्पवयीन मुलास त्यांच्या पालकाच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे व लातूर शहर चे उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत कवले, पोलीस अमलदार रणजीत शिंदे, बालाजी कोतवाड, अमित लहाने, काकासाहेब बोचरे, सोनवणे यांनी केली आहे.

## माजी सैनिक मुलाच्या वसतिगृहात निवासी अशासकीय वसतिगृह अधीक्षक पदभरती

**लातूर, दि. २६ नोव्हेंबर-**

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या आस्थापनेवरील माजी सैनिक मुलांचे वसतिगृह, लातूर येथे निवासी अशासकीय वसतिगृह अधिक्षक पद तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन प्रतिमहा रक्कम रुपये ३१ हजार ८७५ प्रमाणे भरण्यात येणार आहे. या पदासाठी इच्छूक माजी सैनिक (फक्त जेसीओ) उमेदवारांनी आपल्या अर्ज व सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी ३ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे स्वत: उपस्थित रहावे. निवड करण्यात आलेल्या उमेदवारास तात्काळ कामावर घेण्यात येणार आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# भारतीय संविधान लोकशाहीचा आत्मा

## विश्वनाथराव मुडपे गुरुजी; जिल्ह्यात भारतीय संविधान दिन साजरा



डॉ. राधाकृष्णन प्राथमिक विद्यालयात संविधान दिनानिमित्त मार्गदर्शन करताना विश्वनाथ मुडपे गुरुजी.



लालबहादूर शास्त्री विद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक अनंतराम कोपले, राहुल नेटके.



वलांडी येथे संविधान दिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २६ नोव्हेंबर-**

भारतीय संविधान हे देशाचं वैचारिक सूत्र, सर्वांगीण स्वप्न व देशाची आन-बान-शान आहे. म्हणून भारतीय संविधान लोकशाहीचा आत्मा आहे असे राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक विश्वनाथराव मुडपे गुरुजी म्हणाले. डॉ. राधाकृष्णन प्राथमिक विद्यालयात, उदगीर व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुडपे गुरुजी यांनी सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, प्रजासत्ताक, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, एकात्मता या मूल्यांबद्दल माहिती दिली तसेच भारतीय संविधान संकल्पना विस्तार याबाबतची माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व भारतीय संविधान पुस्तिकेचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था सचिव देविदासराव नादरगे तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र अं.नि.स.शाखा उदगीरचे कार्याध्यक्ष प्राचार्य विजयकुमार पाटील,पुणे चिंचवड येथील वैष्णवी इंटरप्राईजेसचे मालक, उद्योजक विक्रम मुडपे, आनंद जाधव, सुरेश रेड्डी, वर्षा पाटील, मुख्याध्यापक ज्ञानोबा कुंडगिरे यांची उपस्थिती होती. संविधान दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली यावेळी विद्यार्थ्यांनी देशाचा प्राण भारतीय संविधान, स्त्री हक्काचा सन्मान भारतीय संविधान यासारख्या घोषणा देऊन परिसर दुमदुमून सोडला. रॅलीत अनेक विद्यार्थी वेशभूषेमध्ये उपस्थित होते. संविधानाचे वैशिष्ट्य सांगणाऱ्या फलकांचे प्रदर्शन शाळेमध्ये भरवण्यात आले होते याचे उद्घाटन विक्रम मूडपे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे विजयकुमार पाटील यांनी भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये सांगितली. अध्यक्षीय समारोप देविदासराव नादरगे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता हम होंगे कामयाब या गिताने झाली. सूत्रसंचालन प्रफुलता बोडके यांनी तर आभार ज्ञानोबा कुंडगिरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशांत पांचाळ, विठ्ठल नादरगे,शशिकुमार पाटील, गोविंद रावळे, रोहित बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

**लालबहादूर शास्त्री विद्यालय, उदगीर**

लाल बहादूर शास्त्री विद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापक अनंतराम कोपले कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णा मारावार पर्यवेक्षक किरण नेमट अभ्यास पूरक मंडळ प्रमुख आशा गौतम प्रमुख पाहुणे राहुल नेटके हे उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन व संविधान ग्रंथाचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राहुल नेटके यांनी संविधानाचे महत्त्व व संविधान कसे तयार झाले याविषयीची माहिती दिली हक्कासोबत आपल्याला कर्तव्याची जाणीव असली पाहिजे असे विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप कृष्णा मारावार यांनी केले. सूत्रसंचालन अंबिका पारसेवार यांनी केले प्रास्ताविक कार्यक्रम प्रमुख आशा कल्पे तर आभार छाया दिक्कतवार यांनी मानले.

**वलांडी**

तालुक्यातील वलांडी येथे २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनाचे औचित्य साधून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला विविध मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. १९४९ साली भारतीय संविधान सभेने संविधानाला अंतिम मान्यता दिली. यालाच संविधान स्विकृती दिन म्हणतात. जरी संविधान २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले, तरी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधानाच्या निर्मिती प्रति आदर व्यक्त करण्यासाठी केला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाला सन्मान देणे, व भारतीय संविधानाचे मुख्य शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त विलास वाघमारे यांनी केली. व संविधान दिनानिमित्त संविधान प्रताविकेचे वाचन करून संविधाना बद्ल माहीती देण्यात आली.व संविधान दिन वलांडी येथील ग्राम पंचायत कार्यालय,शाळा महाविद्यालयात पण साजरा करण्यात आला. यावेळी माजी सरपंच राम भंडारे,विलास वाघमारे,दिनेश पाटील, धनराज बनसोडे, मूस्ताक कादरी उपस्थित होते.




श्यामार्य कन्या विद्यालयात भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला.

**श्यामार्य विद्यालय, उदगीर**

श्यामार्य कन्या विद्यालयात भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्यामार्य कन्या विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक प्रवीण भोळे, शिक्षक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते. या दिनानिमित्त विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना भारतीय संविधान मूळ प्रत दाखवण्यात आली. संविधानात सरकारच्या अधिकारांची आणि मर्यादांची रूपरेषा देण्यात आली आहे. संविधानामुळे नागरिकांच्या हक्कांचे रक्षण होते. संविधानामुळे जुलूम आणि सत्तेच्या गैरवापरापासून संरक्षण होते. संविधानामुळे देशाची शासनाची चौकट निश्चित होते. संविधानामुळे नागरिकांच्या सहभागास प्रोत्साहन मिळते, असे प्रास्तविकातून इतिहास विषय विभाग प्रमुख वनमाला मुक्कावार यांनी माहिती दिली. भारतीय संविधान दिन या निमित्ताने क्रांती वाघमारे व सरस्वती कदम या मुलींनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या भारत देशात दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक प्रवीण भोळे यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी खुशी जाधव तर आभार संगीता खादीवाले यांनी व्यक्त केले.